रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १४ जुलै २०२४



# अवघे गरजे पंढरपूर

आधुनिक केसरी

**अंधश्रद्धा, दैववाद, नशीब, ढोंग, अहंकार, दुराचार, अत्याचार वाईट प्रवृत्तींना दूर लोटून आणि नैतिकता, सदाचार, समानता, दया, करुणा, क्षमा, शांती या सर्वांमध्ये ईश्वराचा अंश आहे. तो आपणाला पंढरीच्या वारी मधून वेळोवेळी प्रत्ययास येतो. प्रत्येक भक्तात सुप्त अवस्थेत परमतत्त्व असते ते भक्ती भावाने सर्वांना जागृत करते, समतेचे तत्व प्रत्येकाने आचरणात आणावे, भेदाभेद करू नये, जोपर्यंत सर्वजण एकत्रित येत नाहीत, तोपर्यंत समाजाचा, देशाचा उद्धार होत नाही हे आपल्याला या वारीतून शिकवलं जाते. म्हणून अवघे गरजे पंढरपुर। चालला नामाचा गजर।। टाळ घोष कानीं येती। ध्यानी विठ्ठलाची मूर्ती पंढरीच्या वारीला प्रत्यक्ष पांडुरंगाचा आशीर्वाद आहे. हजारो अन्नदाते वारकऱ्यांना अन्नदान करण्यासाठी आतुरतेने त्यांची वाट पाहत आहेत. वारकरी या काळात पडणाऱ्या पावसाला, उन्हाला, वादळवाऱ्याना अजिबात जुमानत नाहीत. आषाढ सरीमध्ये तो ओलाचिंब भिजवून विठ्ठलाचे गुणगान करीत पुढे जातो.**

पांडुरंग जाहलो हो। चंद्र भागा तीर मुखाने म्हणत लाखो वारकरी चालत आहेत पण एकही उपाशी राहत नाही. कोणालाही निमंत्रण नाही, हजारो गावची माणसे एकत्रित आली पण कधी भांडण, तंटा, वादविवाद नाही या रे या रे लहानथोरं। याति भलती नारी नर।। म्हणून सर्व एकत्रित येतात. जिथे भाव आहे तेथे प्रत्यक्ष देव आहे. त्या देवाला भेटण्या साठीच सर्व वारकरी एकत्रित येऊन पंढरपूरला हरिनामाचा गजर करतात. पंढरपुराकडे येणाऱ्या दहा रस्त्यातून वारकरी येत असतात. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी गावोगावी भक्तमंडळी उत्सुक असतात. जो पायाने चालतो तो प्रवास, जो




प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

भावनेने चालतो ती यात्रा व जो हृदयाने चालतो ती पंढरीची वारी असते. आठशे वर्षांपासून ही अखंड वारी आळंदी व देहू येथून चालत आहेत. 28 जून रोजी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या देहू येथून 329 दिंड्या व 29 जून रोजी संत ज्ञानोबा माऊली यांच्या आळंदी येथून 450 दिंड्या मार्गस्थ होऊन काही दिंड्या वाटेत विलीन होतात, या दोन्ही दिंड्या विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपुराकडे प्रस्थान केल्या आहेत. वेगवेगळ्या ठिकाणावरून वारकरी दिंडीत सामील झाले, ना कशाची चिंता, ना कशाबद्दल खंत सर्व एकत्र येऊन ही दिंडी समतेची, एकात्मतेची, हृदयाची भाषा जोडून सर्व धर्मीयांना सोबत घेऊन निघाली. इडा पिडा टळुनी जाती। देहाला या लाभे मुक्ती मजल दर मजल करत प्रत्येक ठिकाणी विसावा घेत दिंड्या चालत आहेत, हरिपाठ, काकड आरती, भजन, कीर्तन, भारुडे, भोपळ्या सर्व काही चालतात. हरिनामाचा गजर करतात, टाळ मृदुंगाचा आवाज कानी घुमतो, पंढरीचा पांडुरंग सर्वांना आशीर्वाद देण्यासाठी युगानुयुगे कटेवर हात ठेवून उभा आहे. म्हणून सर्वांचे दुःख, दारिद्र्य, इडा, पिडा सगळ्या टळून जातात या वारीमध्ये आणि देहाला मुक्ती मिळते, ते वारकरी मुक्त कंठाने आळवणी करतात. ही वारी जीवन सरीता असून ती नैतिक, सामाजिक जीवनमूल्ये शिकविते, या वारीतून शारीरिक, मानसिक थकवा दूर होऊन आजार नाहीसे होतात. इतराबद्दल दया, प्रेम, आपुलकी, माया मनात उत्पन्न होते. वारीमध्ये येणाऱ्या भक्ताच्या भोजना साठीच्या पंगती सर्वधर्मसमभावाची शिकवण देतात, कोण कुठून आला? कशासाठी आला? कोणाला सोबत घेऊन आला या सर्व प्रश्नांची उत्तरे वारीत मिळतात. येथे मनाला शांती मिळते. माणसाचा स्वभाव कसाही असो येथे वारीत तो सौजन्याने वागतो. ही वारी अहंकार कमी करते. जीवनाला चांगले वळण लावते. सन्मार्गाकडे घेऊन जाते. ही वारी सत्वगुणाची आहे. आपल्या घराकडील राग, द्वेष, सर्व काही ती विसरायला लावते, या वारीमुळे समाज एक संघ होतो, मनामध्ये आपले पणाची भावना तयार होते. नाम रंगी रंगलो हो। संतांचे माहेर म्हणून संत कान्होपात्रा म्हणतात, माझे माहेर पंढरी आहे, अनेक संतांनी पंढरपूरला माहेर म्हटलेले आहे, दिव्यांग, निराधार अनाथ यांना वारी आधार देते. विठुरायाच्या दर्शनासाठी स्वतः अपंगत्व विसरून जातात. आपले वय विसरून झिम्मा, फुगडी, नृत्य करताना पाऊले खेळताना वारकरी दिसतात, हाच तो आनंद येथे मिळतो. म्हणून ऐसा सुख सोहळा स्वर्गी नाही ही वारी हृदय जोडणारी वारी आहे. त्यासाठीच वारी हा एक सत्वगुणाचा सोहळा आहे.


हा सत्वगुणाचा सोहळा पंढरीकडे जाताना तो भक्ती, बंधूंभाव सात्विकता,समानता, समरसता ही जीवनमूल्ये शिकवते. सकळाशी येथे आहे अधिकार। कालीयुगी उद्धार हरीच्या नामे।। म्हणून वारीमध्ये प्रत्येक वारकरी एकमेकांच्या पाया पडतात त्यामुळे चालून चालून थकलेला जीव एका स्वरात गातात.भाग गेला शीण गेला । अवघा झाला आनंद ।। अशी त्यांच्या तोंडून आपोआप शब्द निघतात. शिस्तीने वारकरी पायी वारी करतात. वेळेचे बंधन पाळतात. नेमून दिलेले कामे चोखपणे करतात. त्यामुळे ही विठ्ठल नामाची शाळा पंढरपूरला आषाढी एकादशीला भरते. मृत्युलोकी एक नगर । त्याचे नाव पंढरपूर असे भाविकांची श्रद्धा आहे. वारकरी हे नावच वारीमुळे पडले. संतश्रेष्ठ ज्ञानदेव माऊली व जगद्गुरु



तुकाराम महाराजांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जाती-जमातीच्या लोकांना एकत्रितपणे आणून ही वारी सुरू केली. वारी हा एक आनंद सोहळा आहे. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हणतात.म्हणून सर्वच वारकरी पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान, आणिक दर्शन विठोबाचे ।। या इच्छे पोटी वारकरी वारी कधीच चुकवत नसतात. आषाढी, कार्तिकी, माघी चैत्री अशा चार मुख्य वाऱ्या असून बाकी 24 एकादशीच्या वाऱ्याही करणारे काही वारकरी आहेत. सुखी संसाराची सोडुनिया गाठ। पाऊले चालती पंढरीची वाट।। काही दिवस पंढरीची वाट संपूर्ण सुखी संसार सोडून ते वाटेने चालतात. कारण त्यामुळे आपली दुःख नाहीशी होतात. परमेश्वर हा भक्त पुंडलिका साठी उभा राहिलेला आहे, म्हणूनच भक्त पुंडलिकासाठी उभा राहिला विटेवरी । धनी मलाही दाखवा ना विठुरायाची पंढरी।। असे म्हणतात प्रत्येक वारकऱ्यांच्या पत्नीला सुद्धा वाटते की या पंढरपुरात असे काय आहे की एवढा लाखो वैष्णवांचा मेळा तेथे भरतो म्हणून मलाही तुम्ही पंढरपूरला घेऊन चला असे अंतःकरणातून आपल्या पतीला विनवणी करतात. त्यामुळे भक्ती करा, परमार्थ करा, सन्मार्गाने वागा आणि मोक्ष मिळवा अशी ही वारी आपणाला शिकवते. वारीमध्ये रिंगण सोहळा असतो पुंडलिक वर दे...असा जयघोष करीत अश्वाचे रिंगण सुरू होते. भाविकांनी टाळ्यांचा गजर केला की अश्व वेगाने पाच प्रदिक्षणा पूर्ण करतात. घोड्यांच्या टापा खालील माती कपाळी लावण्यासाठी हजारो वारकरी रिंगणात येतात. काही जण माती आपल्या गावाकडे शेतीत घेऊन जातात 'ज्ञानोबा तुकारामचा' जयघोष करून उजळलें भाग्य आतां। अवघी चिंता वारली।।.. हा संतपर अभंग म्हणून पुढे निघतात या त्यानिमित्ताने लाखो भाविक भक्त पंढरीच्या दिशेने विठुरायाचे सावळे रूप पाहण्यासाठी डोळे आतुरलेले आहेत. देव दिसे ठाई ठाई । भक्तलीन भक्तापाई हे वारकरी संतांनी सांगितलेल्या वाटेवर चालत आहेत.संतांनी माणुसकी व मानवता धर्म शिकवला. आपण सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावे, ह्दयांनी एकत्रित यावे. वैष्णवांचा मेळा भरवावा, एकजुटीने राहावे, अशी शिकवण दिली, त्यामुळे संत कार्याची आज फलश्रुती झाली आहे. 20
दिवसाच्या प्रवासामध्ये वारकरी संपूर्ण देहभान विसरून फक्त कानामध्ये टाळ, मृदुंग व वीण्याचा आवाज घुमत राहतो आणि त्यानुसार तो दिसा माशी चालत जातो. समाजधर्माची अवनती होऊ नये. संतांनी सांगितलेले उपदेश ऐकावे, म्हणून संत सावतामाळीनी कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी।। असं म्हणून विठ्ठलाला त्यांनी आपल्या मळ्यात पाहिले, खरोखरच पंढरीचा पांडुरंग या भक्तांना भेटण्या साठी त्यांच्या घरी गेले, संत चोखोबांची गुरे ओढू लागली, असा हा आगाध महिमा या पंढरीच्या पांडुरंगाचा आहे. संत जनाईला दळण दळू लागले. नाम्याची खीर चाखली, संत कान्होपात्राला मंदिरात जागा दिली असे भक्त पांडुरंगा बद्दल बोलतात, नाम्या, जनी, माळी, संत सेना, संत नरहरी, संत गोरोबा कुंभार, संत कान्होपात्रा या सगळ्यांना घेऊन ते चालले, त्याची महिमा अपार आहे, म्हणून विठू माझा लेकुरवाळा। संगे गोपाळाचा मेळा ।। असे म्हटले जाते, या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला। या संतांचा मेळा गोपाळांचा झेंडा रोविला ।। असा आवाज दुमदुमून जातो. संत हे आपल्याला उपदेश करतात नैतिकतेची जाणीव करून देतात. परमेश्वरापुढे सर्व समान आहेत. अशी भूमिका घेतात, येथे कोणत्याही जातीचा, वर्णाचा भेदभाव केला जात नाही, आपण सगळे परमेश्वराचे लेकरे आहेत म्हणून एकाच विचाराने दिंडी चालते, सुखालाही आला या हो। आनंदाचा पूर।। अवघे गरजे पंढरपुर। चालला नामाचा गजर।। आजच्या जातीय द्वेषभावनेतूनच समाजाची विभागणी होऊन शकले उडत आहेत. जो तो माझेच खरे म्हणत आहे, त्यामुळे प्रत्येकाला गर्व झाला आहे, मी पणाचा आव आणला जात आहे, थोर- वडील व्यक्तीचा आदर ठेवल्या जात नाही, आपपल्या परीने चालत आहेत, जर अशी अवस्था निर्माण झाली तर आपल्या देशावर कोणीही आक्रमण करू शकेल, असे काही होऊ नये म्हणून सर्वांनीच एकजुटीने वागावे, हृदयाची भाषा बोलावी, शांतीचा संदेश घ्यावा, हिंसा करू नये, परंतु आज दररोज पेपर उघडल्या नंतर टि. व्ही. चालू केला की जाळपोळ, अपहरण, खून, बलात्कार अनेक बेरोजगाराच्या समस्या व्यसनाधीनता, यामध्ये तरुणाई अडकली आहे, जर असे झाले तर मानवतावादी दृष्टीकोन नाहीसा होईल.दहशतवाद वाढेल, कोणाचाच विश्वास कोणावर राहणार नाही हे सर्व आपल्याला बंद करायचे असेल तर सर्वांनी आपण समतेचा झेंडा हातात घेऊ, आज अनेक झेंडे झाले आहेत. सांग विठ्ठला मी कोणता झेंडा हाती घेऊ असा प्रति प्रश्न विठ्ठलालाच विचारला जात आहे. असे न होता खरा तो धर्म मानून आपण सर्व सत्याच्या बाजूने चालू, समतेची, साक्षरतेची, जीवाभावाची मैत्रीची, ऐक्याची, शिक्षणाची ही दिंडी घेऊन चालू, तेव्हाच वारीचा उद्देश सर्वांना कळाला आणि ती आचरणात आणली असे होईल. 19 ते 20 दिवस फक्त हरिनामाचा गजर करून गावाकडे आल्यानंतर चांगल्या पद्धतीने सर्वांनीच वागावे, वर्तन ठेवावे, राग, द्वेष, मत्सर ,अहंकार या विकारा पासून दूर राहावे, म्हणून वारी हा एक सत्वगुणाचा सोहळा आहे. राम कृष्ण हरी, चला माऊली, माऊली, माऊली...





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932





आधुनिक केसरी

रवींद्रनाथांनी शांतिनिकेतनची कल्पना प्रत्यक्षात आणण्यापूर्वी त्यांचे व्यक्तिमत्व कसकसे समृद्ध होत गेले ते आपण गेल्या काही भागांपासून पाहतो आहोत. ते समजून घेतल्याशिवाय आपल्याला त्यांच्या शांतिनिकेतन मागील विचार आणि त्यांच्यातील शिक्षण विषयक भूमिकेचे आकलन होणार नाही. सुप्रसिद्ध नाटककार बर्नाड शॉने एका ठिकाणी असं म्हटलंय की माझ्या विकासाच्या आड प्रामुख्यानं काही आलं असेल तर ती म्हणजे माझी शाळा ! हे वाक्य आजही आपल्याला ऐकायला धक्कादायक वाटतं पण ते सत्य आहे. त्यांचेच समकालीन असलेल्या रवींद्रनाथ टागोरांचे विचारही असेच होते. रवींद्रनाथ म्हणतात, ' माझी शाळा संपल्यानंतरच माझे खरे शिक्षण सुरु झाले. ' आता हे सगळे वाचल्यानंतर आपला असा समज होण्याची शक्यता आहे की शाळा या आपल्या विकासाच्या आड येतात. त्यामुळे त्या बंद करायला हव्यात का ? अर्थात हा टोकाचा विचार झाला. सरसकट शाळांना दोष देण्यापेक्षा आपली जी प्रचलित शिक्षणपद्धती आहे, त्यात काही उपयुक्त सुधारणा करता येतील का ? अशा सुधारणा की ज्यातून माणूस घडेल, भारताचा भावी नागरिक सुदृढ घडेल.

## हितगुज



पुष्प
११५वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### योग्य दिशेने प्रगती

'श्री स्वामी समर्थ' या नावाचे, मंत्राचे स्मरण कसेही केले तरी ते आपले काम करतेच. शेतात बी पेरतात तेव्हा त्याचे तोंड वरच्या बाजूला आहे की नाही हे बघितल्या जात नाही. बी शेतात पडते तेव्हा, ज्या तोंडातून मोड यायचा असतो ते तोंड कोणत्यातरी एका बाजूला, खाली किंवा वरही असू शकेल. पण जेव्हा मोड बाहेर पडतो तेव्हा त्याची दिशा मुळात कोणत्याही बाजूला असली तरी तो वळण घेऊन जमिनीतून वरच येतो. तसेच, नामस्मरण कसे ही केले तरी नाम घेणार्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडेल म्हणून 'श्री स्वामी समर्थ' या नाममंत्राचे सतत स्मरण करावे. नामस्मरण करतांना कोणती बैठक असावी, किंवा कोणते आसन घालावे? असे विचारणे म्हणजे, श्वासोच्छवास करताना कोणत्या तर्हेची बैठक असावी असे विचारण्यासारखे आहे. समजा, एखाद्याला दमा झाला आहे, तर तो काय करतो? तो अशा तर्हेने बसण्याचा किंवा निजण्याचा प्रयत्न करतो की, जेणेकरून श्वासोच्छवास कष्टाशिवाय व्हायला मदत होईल. श्वासोच्छ्वास विनाकष्ट चालू ठेवणे हे त्याचे ध्येय असते, तसे नामस्मरण अखंड कसे चालेल हे आपले ध्येय असावे आणि त्याला मदत होईल, व्यत्यय येणार नाही अशा तर्हेची कोणतीही बैठक असावी. बैठकीला फार महत्व देऊ नये. समजा, आपण पद्मासन घालून नामस्मरणाला बसलो आणि काही वेळाने पाठीला कळ लागली तर आपले लक्ष नामस्मरणापेक्षा देहाकडेच लागेल म्हणजे नामस्मरण करतांना देहाचा विसर पडण्याऐवजी देहाची स्मृतीच वाढेल. भगवंताच्या नामस्मरणाचा शरीराचे कसलेही बंधन नाही हेच नामस्मरणाचे महत्व आहे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

अवतार असल्याचे त्याने सर्वांस निवेदन केले. त्या वेळीं शंकरानें मच्छिंद्रनाथास सांगितलें कीं, आम्हास पुढें अवतार घ्यावयाचा



आहे, त्या वेळीं मी निवृत्ति या नांवानें प्रसिद्धीस येईन व हा गहिनीनाथास अनुग्रह करील; यास्तव यास अनुग्रह देऊन सकल विद्यांमध्यें प्रवीण करावें. हें ऐकून मच्छिंद्रनाथानें गोरक्षनाथाकडून गहिनीनाथास लागलाच अनुग्रह देवविला. तसेंच संपूर्ण देवांच्या समक्ष त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला हा समराधनेचा समारंभ एक महिनाभर सतत चालला होता. मग गोरक्षानें कुबेरास सांगितलें कीं, तूं हा सुवर्णाचा पर्वत घेऊन जा आणि ह्याच्या मोबदला आम्हांस अमोल वस्त्रें-भूषणें दे; म्हणजे तीं सर्व मंडळीस देऊन रवाना करतां येईल. हें भाषण ऐकून कुबेरानें येथील धन येथेंच असूं द्या. आज्ञा कराल त्याप्रमाणें वस्त्रालंकार मी घेऊन येतों. मग त्यानें वस्त्रांचीं दिंडें व तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ अलंकार आणून दिले. तीं वस्त्रें भूषणें सर्वांना दिलीं; याचकांना द्रव्य देऊन त्या सर्वांच्या इच्छा तृप्त केल्या व मोठया सन्मानानें सर्वांची रवानगी करून दिली. समारंभ झाल्यावर उपरिक्ष वसूसमागमें मीननाथास सिंहलद्वीपास त्याच्या तिलोत्तमा मातोश्रीकडे पाठवून दिलें. त्यानें मीननाथास तिलोत्तमेच्या स्वाधीन केलें व मच्छिंद्रनाथाचा सारा वृत्तांत तिला सांगितला. तेव्हां मच्छिंद्रनाथाच्या भेटीची निराशा झाल्यामुळें तिच्या डोळ्यांस पाणी आले. तें पाहून एक वेळ तुला मच्छिंद्रनाथ भेटेल, तूं कांहीं चिंता करुं नको, असें सांगून उपरिक्षवासु आपल्या स्थानीं गेला. मग ती मुलावर प्रीति करून आनंदानें राहिली. इकडे गर्भाद्रिपर्वतावर गहिनीनाथास अभ्यास करविण्याकरितां गोरक्ष व मच्छिंद्रनाथ राहिले. उमाकांतहि तेथेंच होते. त्या सुवर्ण पर्वतावर अदृश्यास्त्राची योजना करून कुबेर आपल्या स्थानीं गेला. अदृश्यास्त्राच्या योगानें सुवर्णाचा वर्ण झांकून गेला; परंतु त्या पर्वतावर शंकर राहिले. ते अद्यापि तेथेंच आहेत. त्यास 'म्हातारदेव' असें म्हणतात. त्याच्या पश्चिमेस कानिफनाथ राहिला; त्यानें त्या गांवाचें नांव मढी असें ठेविलें. त्याच्या दक्षिणेस मच्छिंद्रनाथानें वसति स्थान केलें. त्याच्या पूर्वेस जालंदरनाथ राहिला. त्याच पर्वताच्या पलीकडे वडवानळ गांवीं नागनाथानें वस्ती केली. विटे गांवांत रेवणसिद्ध राहिला. गर्भाद्रिपर्वतावर वामतीर्थी गोरक्षनाथ राहिला. त्यानें तेथेंच गहिनीनाथाकडून विद्याभ्यास करविला. एका वर्षांत तो सर्व विद्येंत निपुण झाला. नंतर त्यास मधुब्राह्मणांकडे पाठवून दिलें. पुढें त्या ठिकाणीं बहुत दिवसपर्यंत राहून शके दहाशें या वर्षीं त्यांनीं समाधि घेतल्या. कबरीच्या घाटाच्या समाधी बांधण्याचा मुख्य मुद्दा हाच होता की, पुढें यवनराजाकडून उपद्रव होऊ नये. एकदां औरंगजेबबादशहाने ह्या समाधी कोणाच्या आहेत म्हणून विचारल्यावरून लोकांनीं त्यास सांगितले कीं, तुमच्या पूर्वजांच्या आहेत.



आधुनिक केसरी

### तोच हा पाडवा | नित्यानंद ||


सत्कर्म उभारी | मांगल्याची गुढी ||
विनम्रता जोडी | पितांबर ||१||
सात्त्विक विचार | शोभे शुभ्र हार ||
चारित्र्य सुंदर | निष्कलंक ||२||
गोडवा गुळाचा | वाणीत रूजावा ||
औषध तो व्हावा | कडु लिंब ||३||
आभ्यासे करावे | खंडण मंडण ||
उगाच भांडण | करू नये ||४||
संतांशी संवाद | मौनात साधावा ||
तोच हा पाडवा | नित्यानंद ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

शीतल शशि की ज्योति में,
मानो ऊगे भान ।
अकथ अलौकिक रुप है, अनुभव में
पहिचान ।।४५।।(स्वर्वेद प्रथम मण्डल
षष्ठ अध्याय) ०१/०६/४५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
चंद्राच्या शीतल प्रकाशात सूर्याचा उदय व्हावा त्याप्रमाणे निःशब्द चेतन महामंडलात सहज शांती तथा शीतल प्रकाशाचा उदय होतो, जो वाणीने सांगता येत नाही. या अलौकिक स्वरूपाला विहंगम योगाच्या अंतिम भूमित योगीजन प्रत्यक्ष अनुभव करतात. याच परम तत्त्वाला प्राप्त करून आत्मास सहज शांती आणि अमृत परमानंद प्राप्त होतो, ज्यामुळे योगी मधुमान होऊन पूर्णानंदात निमग्न होऊन जातो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संदेहवारण

आधुनिक केसरी

नमस्कार ब्रम्ह व ब्रम्हांड व्यापक आहे. ते आता सांगते. मी अनेक व्हावे अशी ब्रम्हाने इच्छा व्यक्त केली. त्याने तप केले. व सारी सृष्टी निर्माण केली. व या सृष्टीचा तो जनक ठरला. याचाच अर्थ असा की ब्रम्ह व्यापक तर ब्रम्हांड व्याप्य आहे. एका ब्रम्हा खेरीज दुसरे अस्तित्व नाही. जे जे काही आहे ते ते सर्व ब्रम्ह आहे. संपूर्ण विश्वामध्ये आपल्याला जे जे दिसते ते ते सर्व ब्रम्हातूनचं निर्माण होते. ब्रम्हा पासुन निर्माण होते व शेवटी ब्रम्हातचं लिप्त होते. विरून जाते. किंवा एकरूप होते. यासाठी मी म्हणेन ब्रम्हांडात जितक्या विभूती तितकी रूपे तुझी देखा. असे असून देखील विश्व निर्माण करून त्यामध्ये ब्रह शिरले असे श्रृति सांगते. विश्व ज्या स्वरूपात आपल्याला दिसते त्यासारखे /ब्रम्ह नाही. म्हणून वेगवेगळ्या दोन दृष्टीकोनातून आपली दिशा ठरते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## गगनगिरी महाराज


आधुनिक केसरी

महाराजांच्या तेजाने प्रभावित होऊन कोल्हापूरचे महाराज बालयोगी (गगनगिरी महाराज) यांना कोल्हापूरला घेऊन आले. पुढे त्यांनी दाजीपूर येथे अनेक वर्षे तप केले. सुरुवातीला महाराज एका धनगरवाड्याच्या कडेला थोड्या अंतरावर झोपडी बांधून राहिले.

## सद्गुरु सांगेल त्याप्रमाणे वागावे

आधुनिक केसरी

शुद्ध भावना म्हणजे मोबदला न घेण्याची किंवा फलाशा सोडण्याची इच्छा. भक्ती ही अशी निरपेक्ष असावी. देवालये बांधली, देवांचे पूजन-अर्चन केले, म्हणजे भक्ती निरपेक्ष केली असे नव्हे. देवाचे करीत असताना, जप करीत असताना, त्यापासून काही हवे आहे असे न वाटले पाहिजे. तुम्ही सर्व लोक भजन-पूजन करता, परंतु हे सर्व कसे होऊन बसले आहे ? जसे भांडे कुठे ठेवावे, पळीताम्हन कुठे ठेवावे, वगैरे जे शास्त्रात लिहिलेले असते ते सर्व, माणूस तोंडाने म्हणत असतो आणि करीत असतो; कारण, त्यामुळे त्याला कृती करणे सोपे जाते. तसे आपण देवाचे करतो, परंतु ते केवळ केले पाहिजे म्हणून, ती आपल्या घरातली एक प्रथा आहे म्हणून; आपल्याला देव आवडतो म्हणून नव्हे. एक मुलगा होता, त्याला त्याच्या वडिलांची पत्रे येत असत. तो पत्र वाची आणि देव्हाऱ्यात ठेवून देई. दुसरे पत्र आले की ते वाची, आणि मागले पत्र काढून टाकी. एकदा वडिलांनी पंचवीस रुपये मागितले. मुलाने ते



पत्र वाचले आणि नेहमीप्रमाणे पूजेत नेऊन ठेवले. नंतर काही दिवसांनी वडिलांकडून एक गृहस्थ आला आणि म्हणाला, " तुला तुझ्या वडिलांचे पत्र मिळाले का ? " त्यावर तो म्हणाला, " हो ", " अरे, मग पैसे का नाही पाठविलेस वडिलांना ? " त्या गृहस्थाने विचारले. त्यावर तो म्हणाला, " तेवढेच राहिले बघा ! " तसे आपले होते. आपण कृती करतो, पूज्यभाव वगैरे ठेवतो, परंतु सद्गुरूने सांगितलेले तेवढे करीत नाही. त्यामुळेच आपली सत्कर्मे ही आपला अहंकार कमी व्हायला कारणीभूत न होता, उलट अहंपणा वाढवायलाच मदत करतात. म्हणून सद्गुरूने सांगितलेले साधनच आपण प्रामाणिकपणे, संशयरहित होऊन करावे. त्याकरिता व्यवहार सोडण्याची जरूर नाही. आपण व्यवहाराला सोडू नये, पण व्यवहारात गुंतू नये. युद्धात सारथ्याच्या हाती सर्व काही असते. तो लगाम हाती घेऊन जागृतपणे उभा असतो, आणि योग्य वाटेल तेथे रथ नेऊन उभा करतो. युद्धकर्त्याचे काम, फक्त बाण अचूक दिशेला किंवा व्यक्तीवर सोडणे. त्याप्रमाणे, आपले सर्व जीवन एकदा सद्गुरूच्या ताब्यात दिल्यावर, तो सांगेल त्याप्रमाणे वागणे हेच आपले कर्तव्य ठरते. ज्याने जगाची आस टाकली त्याचे तेज पडणारच हे लक्षात ठेवावे. एखादा रुपया आपण उचलला तर त्याच्या दोन्ही बाजू जशा एकदमच हाती येतात, त्याप्रमाणे आपण प्रपंचात पडलो की आपल्याला परमार्थ हा पाहिजेच. परमार्थात भगवंताची गरज असते. ही भगवंताची गरज, सद्गुरू त्याचे 'नाम' देऊन भागवितात. आपण हे नाम निरंतर आणि श्रद्धेने घेणे आवश्यक आहे. अशा रीतीने नामात अखंड राहिले तर परमार्थ साधतो, भगवंताची गरज भासते, प्रपंचात समाधान मिळते, आणि जन्माला आल्याचे सार्थक होते.

**१९४. गुरूवर विश्वास ठेवून चिकाटीने व आवडीने नाम घ्यावे.**

रविवार, १४ जुलै २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३०८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 14 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-308 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# मराठा समाजाचा रोष परवडणार नाही : जरांगे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचा शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथे समारोप झाला. तसेच मराठा आरक्षणासाठी सरकारला दिलेला अल्टिमेटम देखील शनिवारी संपला. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर निशाणा साधला आहे. मराठा समाजाला न्याय द्या, मराठा समाजाचा रोष परवडणार नाही, सरकारला सावध करतो की, आरक्षणाबाबत निर्णय न घेतल्यास तुमचे 288 उमेदवार पाडू, असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला.**



मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सरकारला सत्तेवर मराठ्यांनीच बसवले आहे. आता विधानपरिषदेत जे निवडून आलेत त्यांना मराठ्यांच्या आमदारांनीच मतदान केले आहे. आमच्यावर अन्याय झाला तर या आमदारांना पुन्हा लोक निवडून देणार नाहीत. मराठ्यांच्या जीवावर काल आमदार झाले. ज्यांनी या आमदारांना मतदान केले त्यांची जबाबदारी आहे, आता जातीयवाद होऊ नये. विरोधकांनी आरक्षणासंबंधी बैठकीला जायला हवे होते. विरोधक बैठकीला आले नाहीत म्हणून चालढकल करणे योग्य नाही. तुम्ही सरकार आहात, तुम्ही आरक्षण द्यायला हवे. तुम्ही आमच्या पोरांचे बळी घेणार का? लोक रस्त्यावर उतरत आहेत, हे तुम्हाला दिसत नाही का? सगळ्या जनतेला समान न्याय द्या. सरकारला मराठ्यांचा रोष परवडणारा नाही. आरक्षण ही आमची खदखद आहे.

> मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीला छत्रपती संभाजी नगरात प्रचंड प्रतिसाद मिळाला. शहरातील क्रांतीचौकात जणू भगवे तुफानच आल्याचे चित्र दिसून आले. जालना रोड, केंब्रिज चौक, नगर नाका, कोकणवाडी चौक, सिल्लेखाना चौक आदी रस्ते आंदोलकांनी फुलून गेले होते. एक मराठा, लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणांनी आसमंत दुमदुमला होता.

मी सरकारला सावध करतोय की आरक्षणाबाबत निर्णय न घेतल्यास 100 टक्के तुमचे 288 उमेदवार पाडू, असा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी दिला. कुणीही विरोध केला तरी सगेसोयरे अंमलबजावणी होणार आहे. आमचे आणि कुणबी समाजाचे निकष सारखेच आहेत. मराठा पोट जात म्हणून ओबीसीमध्ये घ्या. आमच्या व्हॅलिडिटी करून घ्या. मात्र मुद्दाम हे टाळले जाते. काही अधिकारी जाणूनबुजून हे देणे टाळत आहेत. मुख्यमंत्र्यांना यात लक्ष घालावे, असे आवाहन देखील मनोज जरांगे यांनी केले आहे.

# साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उषा घाटे यांना दैनिक आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील व समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**राजरत्न भोजने**

**छत्रपती संभाजीनगर :** उषःकाळ फाउंडेशनच्या उषा घाटे यांना शासकीय सेवेतील आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक आधुनिक केसरीचा आयडॉल महाराष्ट्र पुरस्कार जाहीर झाला आहे. उषा घाटे या छत्रपती संभाजीनगर येथे साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून काम करतात. त्या ग्रामीण भागातून आल्या असून घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांचे शालेय शिक्षण किनवट (जि. नांदेड) येथे झाले व पुढील शिक्षण मिलिंद महाविद्यालयात 12वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण होऊन छत्रपती संभाजीनगरमध्ये वयाच्या १९व्या वर्षीच पोलीस खात्यामध्ये नोकरी मिळवत आईवडिलांचे स्वप्न पूर्ण केले. परिस्थितीमुळे त्यांना जास्त शिक्षण घेण्याऐवजी लवकर नोकरी करावी लागली. उषा घाटे यांना लहानपणापासून समाजसेवेची आवड असल्याने समाजसेवा करण्याची त्यांची खूप इच्छा होती. म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे त्यांनी उषःकाल फाउंडेशनची स्थापना करून त्याद्वारे समाजसेवेस सुरुवात केली. नंतर वृद्धाश्रमही सुरू केले. सामाजिक बांधिलकी जपत वेळोवेळी वृद्धांना त्या मदत करतात, त्यांचा आधार बनतात. त्यांना गोरगरिबांचे दुःख, कष्ट बघवत नाहीत. कित्येक वर्षांपासून त्या गोरगरीब, वीटभट्टीवरील मुलांची शिकवणी घेतात, त्यांना शालेय साहित्य वाटप करतात तसेच क्रीडा साहित्य पुरवतात, गरजूंना जेवण, पाण्याची व्यवस्था, फूटपाथवरील लोकांना कपडे वाटप, महिलांच्या समस्यांचे निराकरण करून त्यांना मार्गदर्शन करतात. झोपडपट्टीतील महिलांना राशन किट वाटल्याने त्यांना समाधान मिळते. गरिबांना शक्य होईल तेवढा मदतीचा हात देतात. जणू काय गोरगरिबांसाठी लढणाऱ्या संघर्षयोद्ध्याच आहेत. आजधकाधकीच्या काळात कोणाकडे वेळ नाही, मात्र उषा घाटे या पोलीस आयुक्तालयात नोकरी करत देशसेवा आणि समाजसेवा ही दोन्हीही कार्ये अगदी मनापासून सांभाळतात. उषःकाल फाउंडेशचे उपक्रमः वीटभट्टीवरील मुला-मुलींना शिकवणी तसेच एक हजार झाडांचे वृक्षारोपण आत्तापर्यंत करण्यात आले आहे. पाचशे मुलांना दत्तक घेऊन त्यांचा शिक्षणाचा खर्च उषःकाल फाउंडेशन करत आहे. पंधराशे महिलांना राशन किट आणि इतर साहित्य वाटप. शहरातील चाळीस हजार लोकांना आत्तापर्यंत जेवणाची व पाण्याची मदत केली आहे. या सारखे विविध उपक्रम उषःकाल फाउंडेशन राबवत आहे. त्यांचे हे सामाजिक कार्य खरोखरच अद्भुत आहे, दिव्य आहे. या गौरवशाली कार्याची दखल घेत दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उषा घाटे यांना जाहीर झाला आहे. सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.






# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाला लाच घेणे भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**पांढरकवडा :** पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले श्री प्रकाश बाबुराव भगत वय 57 वर्ष पद सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वर्ग 3 पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे कार्यरत होते.या प्रकरणातील तक्रारदार यांनी दिनांक 11 जुलै 2024 रोजी त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी व पीसीआर न घेण्यासाठी तसेच मदत करण्यासाठी पोलीस स्टेशन पांढरकवडा येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री प्रकाश भगत तक्रारदार यांना पाच हजार रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार दिली सदर तक्रारीवरून १२ जुलै 2024 रोजी पंचायत समक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांना त्यांचे विरुद्ध दाखल असलेले गुन्हे असलेल्या गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी व पीसीआर न घेण्यासाठी तसेच मदत करण्यासाठी पाच हजार रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले. त्याकरिता आज दिनांक 13 जुलै 2024 रोजी सापळा रचण्यात आला. पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या बाजूला वसंतराव नाईक चौकामध्ये कारवाही दरम्यान पंचा समक्ष सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री प्रकाश भगत यांनी पाच हजार रुपये लाच रक्कम स्वीकारल्याने त्यांना रंग यात पकडण्यात आले आहे नमूद आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन पांढरकवडा यवतमाळ येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे सदरची कार्यवाही माननीय श्री मारुती जगताप पोलीस अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो अमरावती परीक्षेत अमरावती श्री अनिल पवार अप्पर पोलीस अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र श्री मिलिंद कुमार बहाकर पोलीस उपअधीक्षक लाच लुपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपाधीक्षक श्री मंगेश मोहोळ पोलीस अंमलदार शैलेश कडू आशिष जांभळे राजेश मेटकर अब्दुल वसीम सुरज मेश्राम होऊनी प्रदीप बारबुदे यांनी पार पाडली नागरिकांनी अशा प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.





प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# खासगीकरण, उच्च शिक्षण आणि संशोधन

आधुनिक केसरी

**शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणामुळेच समाजातील व्यक्तींना सुसंस्कृत, साक्षर आणि आत्मनिर्भर होण्याची संधी मिळते. पण गेल्या काही दशकांत शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचे वारे वाहू लागल्यामुळे शिक्षण क्षेत्रावर अनेक नकारात्मक परिणाम झाले आहेत. खाजगीकरणामुळे शिक्षणातील असमानता प्रचंड प्रमाणात वाढली आहे. सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा खालावला असून खाजगी शाळा आणि कॉलेजांमध्ये शिक्षण घेणे महागडे झाले आहे. परिणामी, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण देणे कठीण झाले आहे. यामुळे समाजातील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील अंतर वाढत आहे.**



## क्षितिजापल्याड

खाजगी शिक्षण संस्थांनी शिक्षणाला व्यापाराचे स्वरूप दिले. त्यांनी शिक्षण हे एक वस्तू म्हणून पाहायला सुरुवात केली. फक्त नफा मिळवणे हा त्यांचा मुख्य उद्देश झाला आहे. परिणामी शिक्षणाची गुणवत्ता कमी झाली. विद्यार्थ्यांना फक्त परीक्षेत उत्तीर्ण होण्यापुरते शिक्षण दिले जात आहे, त्यांना ज्ञान मिळवण्याची संधी दिली जात नाही. खाजगीकरणामुळे शिक्षकांची गुणवत्ता आणि त्यांचे मानधन या दोन्हींवर परिणाम झाला आहे. अनेक खाजगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकांना योग्य वेतन मिळत नाही. त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण टाकला जातो. परिणामी, शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण होतो आणि शिक्षणाच्या गुणवत्तेत घट होते. खाजगीकरणामुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक ताण येतो. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त शुल्क वसूल केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांवर शैक्षणिक ताण येतो. परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रचंड अभ्यास करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. खाजगीकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील संशोधनावरही विपरीत परिणाम झाला आहे. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन दिले जात नाही. यामुळे नव्या ज्ञानाची निर्मिती होत नाही. शासकीय शिक्षण संस्थांमध्ये संशोधनासाठी आवश्यक निधी कमी केला जातो, ज्यामुळे संशोधनाचे प्रमाण घटते. उच्च शिक्षण हे कोणत्याही देशाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विशिष्ट ज्ञान, कौशल्ये आणि विचार करण्याची क्षमता मिळते. यामध्ये संशोधनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन हे नव्या ज्ञानाची निर्मिती करते आणि समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रगती घडवून आणते. संशोधन हे नव्या ज्ञानाची निर्मिती करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील अद्ययावत माहिती मिळते. उदाहरणार्थ, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र अशा अनेक क्षेत्रांमध्ये संशोधनाच्या माध्यमातून नव्या संकल्पना आणि तंत्रे विकसित केली जातात. संशोधनामुळे आर्थिक प्रगती घडवून आणता येते. संशोधनाच्या माध्यमातून नवनवीन उत्पादने, सेवा आणि तंत्रज्ञान विकसित केले जाते, ज्यामुळे उद्योगधंद्यांना आणि व्यवसायांना नवीन दिशा मिळते. यामुळे रोजगारनिर्मिती होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास होतो. उदाहरणार्थ, आयटी, बायोटेक्नोलॉजी, औषधनिर्माण उद्योगांमध्ये संशोधनाच्या माध्यमातून मोठी प्रगती झालेली आहे. संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचे निराकरण करता येते. उच्च शिक्षण संस्थांमध्ये समाजातील विविध समस्यांवर संशोधन केले जाते. उदाहरणार्थ, गरिबी, बेरोजगारी, पर्यावरणीय समस्या, आरोग्य समस्या, शिक्षणातील अडचणी या सर्व समस्यांचे निराकरण संशोधनाच्या माध्यमातून शक्य आहे. समाजातील विविध घटकांचे जीवनमान सुधारण्यासाठी संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. संशोधनामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होते. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाच्या माध्यमातून नवीन शिक्षण पद्धती, अध्ययन- अध्यापन तंत्रे, आणि मूल्यांकन प्रणाली विकसित केली जातात. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सखोल आणि अद्ययावत शिक्षण मिळते. शिक्षणाच्या प्रक्रियेत सातत्याने बदल आणि सुधारणा घडवून आणण्यासाठी संशोधन हे अत्यंत आवश्यक आहे. उच्च शिक्षणातील संशोधनामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मकता वाढते. संशोधनाच्या माध्यमातून विकसित केलेले नवे तंत्रज्ञान आणि ज्ञान आंतरराष्ट्रीय बाजारात देशाला स्पर्धात्मक बनवतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास येण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये उच्च दर्जाचे संशोधन होणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय समस्यांच्या निराकरणासाठी नवनवीन तंत्रज्ञान आणि उपाय शोधण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन केले जाते. उदाहरणार्थ, जलसंवर्धन, वायुप्रदूषण, जैवविविधता संरक्षण, हरित ऊर्जा या क्षेत्रांमध्ये संशोधनाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचे उपाय शोधता येतात. संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांमध्ये तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे ते कोणत्याही समस्येचा योग्य पद्धतीने विचार करून निराकरण करू शकतात. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे समाजात विचारशीलता आणि प्रगतीशीलता वाढते. संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सतत ज्ञानार्जन करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये सतत नवीन माहिती, नवीन तंत्रे आणि नवीन संकल्पना शिकण्याची



संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले विविध कौशल्ये मिळतात. भारतातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाची स्थिती गेल्या काही वर्षांत सुधारली आहे. देशात आयआयटी, आयआयएम, आयआयएससी, एनआयटी आणि इतर प्रमुख संस्थांमध्ये संशोधनावर मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. तरीही, जागतिक पातळीवर भारतीय संशोधनाची गुणवत्ता आणि परिणामकारकता अद्यापही काहीशी मागे आहे. २०२३ च्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताने जगातील उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये पाच शीर्ष ५०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवले आहे, परंतु अमेरिका, युरोप, चीन आणि इतर विकसित देशांच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. संशोधनात प्रगती करण्यासाठी आणि उत्कृष्टता साध्य करण्यासाठी पुरेसा निधी आवश्यक आहे. भारतातील उच्च शिक्षण संस्थांना संशोधनासाठी पुरेसा निधी मिळत नाही. सरकारी अनुदान कमी असल्यामुळे संशोधन प्रकल्प पूर्ण करणे कठीण होते. परिणामी, भारतीय संशोधन जागतिक स्तरावर मागे पडते. त्यामुळे, संशोधनासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. प्रश्न केवळ निधीचा नसून समाजातील नवनवीन संशोधक त्यांच्या नवनवीन कल्पनांसह प्रवाहात आले पाहिजेत. त्यासाठी विद्यापीठांनी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. एकीकडे संशोधन वाढले पाहिजे असे आपण म्हणतो आणि त्याचवेळी मार्गदर्शकांची संख्या अत्यल्प कशी राहील याची तजवीज करतो. हे अत्यंत विसंगत धोरण संशोधन क्षेत्रासाठी मारक ठरणार आहे. शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचे अनेक नकारात्मक परिणाम झाले आहेत. शिक्षणातील असमानता वाढली आहे, शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे, शिक्षकांची गुणवत्ता कमी झाली आहे, विद्यार्थ्यांवर मानसिक ताण आला आहे, संशोधनावर परिणाम झाला आहे, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव जाणवतो, संस्कृती आणि भाषा यांचा अभाव निर्माण झाला आहे आणि समाजिकीकरणावर परिणाम झाला आहे. या सर्व गोष्टींमुळे शिक्षण क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी शासकीय शिक्षण संस्थांचा दर्जा सुधारण्याची गरज आहे. शासकीय शिक्षण संस्थांना पुरेसा निधी उपलब्ध करून देऊन त्यांची गुणवत्ता वाढवावी. तसेच खाजगी शिक्षण संस्थांवर योग्य नियंत्रण ठेवून शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवावे. यामुळे शिक्षण क्षेत्रात समता आणि गुणवत्ता निर्माण होईल, ज्यामुळे समाजाची प्रगती होईल. उच्च शिक्षणातील संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नव्या ज्ञानाची निर्मिती, आर्थिक प्रगती, सामाजिक समस्यांचे निराकरण, शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता, पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि ज्ञानार्जनाची प्रवृत्ती या सर्व गोष्टींसाठी संशोधन अत्यंत आवश्यक आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देऊन त्याचे महत्त्व ओळखले पाहिजे. संशोधनामुळे समाजाची आणि देशाची प्रगती होते, त्यामुळे उच्च शिक्षणात संशोधनाला अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. उच्च शिक्षणातील संशोधनात भारताचे स्थान सुधारण्यासाठी अनेक गोष्टी आवश्यक आहेत. पुरेसा निधी, संशोधकांची गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय सहकार्य, नवोन्मेष, सरकारी धोरणे, खासगी क्षेत्राचे योगदान, संशोधन आणि उद्योगातील दुवा, आणि भविष्यातील संधी या सर्व घटकांवर लक्ष केंद्रित करून भारत उच्च शिक्षणातील संशोधनात जागतिक स्तरावर अग्रणी होऊ शकतो. संशोधनाच्या माध्यमातून देशाची प्रगती, आर्थिक विकास, आणि सामाजिक सुधारणा साध्य होऊ शकतात, त्यामुळे उच्च शिक्षणातील संशोधनाला अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# विनाश्रम प्रतिष्ठा निव्वळ दुर्लभ असते

आधुनिक केसरी

**प्रतिष्ठा हवी असेल तर प्रचंड मेहनत घ्यावीच लागेल विनाश्रम प्रतिष्ठा हि दुर्लभ असते. ऐश आराम सगळं हालक फुलक अगदी सगळ्याच क्षेत्रात बाबतीत कमी वेळेत कमी कष्टात सगळं काही उपलब्ध होण्यासाठी तंत्रज्ञान विकसित होऊन प्रगती करत आहे हे अगदी कौतुकास्पद आहे पण याच बरोबर आपली कार्य शक्ति देखिल वाढली पाहिजे पण दुर्दैव असं आहे कि कौतुकास्पद प्रगती होत असताना आपली कार्य शक्ति मात्र दिवसेंदिवस घटत चालली आहे त्यामुळे कष्ट नको हि मनोवृत्ती उदयास येत आहे आणि हाच आलेख कायम वाढत राहिला तर मग मात्र कठिण परिस्थिती अनुभवायला येईल या मध्ये काही शंका नाही.**

कारण कष्ट नको हि मनोवृत्ती मुळात घातक असल्याने या मनोवृत्ती चा विस्तार आणि विकास भविष्यात घातक ठरेल. जगात फुकट काहिच मिळत नाही हे वास्तव आहे. आपल्याला आपल्या जीवनात जे काही मिळवायच आहे त्यानुसार आपल्या श्रमाच स्वरूप ठरत असतं. आपलं उच्चतम धेय्य आणि श्रम याच योग्य गणित जुळल तर मग यश आपल्या पासुन दुर नसतं.श्रम नको आहेत पण ऐश आराम हवा आहे प्रतिष्ठा हवी आहे आता विनाश्रम प्रतिष्ठा कशी मिळणार हाच खुप मोठा आणि खरया अर्थाने गहन प्रश्न आहे.सहजासहजी या जगात काहीच मिळत नाही पण सध्या सगळीकडे सगळं काही सहज मिळविण्याची मनोवृत्ती बळावत चालली आहे.आयुष्य आणि भविष्य बदलण्याची ताकत फक्त कष्टात असते.हेच कष्ट करण्याची मनोवृत्ती हळूहळू लोप पावत चालली आहे.खडतर संघर्ष दैदिप्यमान इच्छा शक्ती आणि अहोरात्र धडपडत मेहनत कष्ट करण्याची मानसिकता असली तरच अशक्यप्राय गोष्ट सुद्धा शक्य होते.कष्ट मेहनत करण्याची मनोवृत्ती मानसिकता हि उत्तरोत्तर कमी होत चालली आहे.यश सगळ्यांना संपादन करायचं आहे.पण त्या साठी कष्ट मेहनत घेण्याची प्रबळ इच्छा शक्ती पाहिजे तितक्या प्रमाणात वाढयला पाहिजे ती न वाढता कमी होत चालली आहे.यश प्रगती ,हि प्रत्येकाला अपेक्षित आहे.यश नको आहे असं कोणीही शोधून सापडणार नाही. मग यश मिळण्यासाठी मेहनत कष्ट तर करावेच लागतील पण नेमकं हेच बहुतांश लोकांना नको नको झालं आहे. तरुण पिढी तर या मध्ये अग्रेसर आहे.जीवनात कष्ट मेहनत हे फक्त प्रगतीसाठीच नाही तर मानसिक शारिरीक स्वास्थ्य व्यवस्थित राहण्यासाठी सुद्धा आवश्यक आहे. पण हेच गुणकारी लाभकारी कष्ट बहुतांश लोकांना नको आहे.सध्या सगळ्याच क्षेत्रात दिवसेंदिवस कष्ट करण्याची मानसिकता कमी होत चालली आहे हि सचित्र वस्तू स्थिती आहे.तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती यशोशिखरावर पोहोचली असुन रोज नवनवीन शोध लागत आहेत हे सगळं कौतुकास्पद अभिनंदनीय असलं तरी कष्ट करण्याची मानसिकता मनोवृत्ती हि दिवसेंदिवस कमी होत चालली आहे हि भविष्यातील पिढी साठी धोक्याची घंटा आहे.आरामदायी वातानुकूलित जीवनशैली हि जरी रूढ होत चालली असून तरी हिच जीवनशैली प्रत्येकाला अपेक्षित आहे व प्रत्येकाला नको असलेलं कष्ट मेहनत हिच भविष्यातील



सगळ्यात मोठी चिंता समस्या आहे.जीवनात कष्ट मेहनत ला पर्याय नसतो.त्या शिवाय कोणीही यशोशिखरावर गाठु शकत नाही.मात्र हाच प्रगतीच मंत्र सगळ्यांना नकोसा झाला आहे. दिवसेंदिवस दिवस शरिर प्रकृती हि नैसर्गिक रित्या कमजोर होत चालली आहे.त्या मध्ये आपण सुद्धा खुप मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत.आपण शरीराला जास्तीत जास्त कमी कष्ट मेहनत कशी होईल यासाठी प्रयत्नशील आहेत.मग शरीर प्रकृती मजबूत कशी होईल.तसंच कष्ट न करण्याची मनोवृत्ती हि दिवसेंदिवस वाढत जाण हे सुद्धा स्वतःच्या विकासा सोबतच सामाजिक विकासासाठी घातक आहे.मुळात आपलं शरीर व्यवस्थित राहण्या बरोबरच जीवनाच्या विविध टप्प्यांवर आपलं कष्ट मेहनत हेच आपल्याला लाभकारी असतं पण बहुतांश लोक कमीत कमी कष्टात पुढे जाण्यासाठी धडपडत आहेत हिच बाब धोक्याची घंटा ठरतं आहे.आपल शरिर व्यवस्थित राहण्यासाठी शरिराला एक मर्यादे पर्यंत कार्य आवश्यक आहे. तितक कार्य नसेल तर मग झोप न लागणे,वजन वाढणे,अनेक आजारांना निमंत्रण विविध शारिरीक व्याधी अशा अनेक समस्या कारण नसताना देखील आपल्या मागे लागतात.महणजे कष्ट मेहनत न करण अथवा हि मनोवृत्ती बळावत जाण काल आज उद्या साठी सुद्धा घातक आहे.याकडे कोणाचेही लक्ष नाही. जास्तीत जास्त आराम किती करता येईल याकडे जास्तीत जास्त लोकांचा कल दिसून येतो.हिच आरामदायी मनोवृत्ती मानसिकता बळावत जाण हे हितकारक नसल्याने हि मानसिकता संपुष्टात आणली पाहिजे आणि सदैव मेहनत कष्ट करण्याची मानसिकता तयारी मनोवृत्ती वाढली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पालिकेच्या प्राथमिक शाळेला १.३१ कोटींचा निधी

## आ. डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** येथील नगरपरिषद संलग्नित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मराठी प्राथमिक शाळेच्या इमारतीसाठी राज्य शासनाने १.३१ कोटींचा निधी दिला असून सदर इमारतीच्या बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहे. शासन स्तरावर निविदा जाहीर करण्यात आल्या असून आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश आले आहे. या संदर्भात शहराध्यक्ष कवीश जिंतूरकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे सदर माहिती दिली आहे.

शहरातील मराठी प्राथमिक शाळा क्रमांक १ चे जीर्ण इमारत मागील वर्षी जुलै महिन्यात पाडण्यात आली होती. सदर इमारतीसाठी सुमारे तीन कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात



आला असताना तांत्रिक अडचणीमुळे सदर प्रस्ताव रखडला होता. यादरम्यान शाळेच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पर्यायी इमारतीची व्यवस्था म्हणून मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी तातडीने लिलाव भवन च्या इमारतीत तात्पुरते स्थानांतरित केले. सदर शाळेच्या इमारती साठीच्या प्रस्तावाला निधी देण्यात यावा म्हणून आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी सातत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व शिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला. निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर केल्या. त्यांच्या या पाठपुराव्यानंतर शासनाच्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मराठी प्राथमिक शाळे च्या दहा वर्ग खोल्या साठी नुकतेच १.३१ कोटी ५२ लाख ५२५ रुपयांच्या निधी संबंधित विभागाला प्राप्त झाला आहे.वनिविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून प्रत्यक्षात शाळा इमारतीच्या बांधकामाला लवकरच सुरुवात होणार आहे. एक वर्षापूर्वी पाळण्यात आलेल्या शाळा इमारतीच्या रखडलेल्या प्रस्तावासाठी शासनाकडून निधी खेचून आणण्यात आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांना यश आले आहे.



# सर्व ग्रामपंचायतीमध्ये माझी बहीण लाडकी योजनेचे फॉर्म भरून घेण्याचे आदेश द्यावेत

## धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामदे गोळेगावकर**

**उमरी :** राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागातर्फे २८ जूनपासून लागू झाली आहे. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची मदत मिळणार आहे. योजनेची उमरी तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, लाभार्थी महिलांची फरपट होऊ नये, यासाठी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यलयामध्ये माझी बहिण लाडकी योजनेचे फॉर्म भरून घेण्याचे आदेश द्यावेत अशा आशयाचे निवेदन धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे तालुका अध्यक्ष मनोज पाटील गोळेगावकर यांनी पंचायत समिती कार्यालय उमरी येथे गटविकास अधिकारी यांना दिले. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे विद्यार्थी सेना तालुका अध्यक्ष बालाजी मजरे पाटील, योगेश पाटील पवळे तालुका कार्याध्यक्ष आदी तालुक्यातील बांधव उपस्थित होते.



आधुनिक केसरी

**मुखेड शहर अंतर्गत गायत्री मंदिर सुशोभीकरणासाठी आ.डॉ. तुषार राठोड यांच्या स्थानिक निधीतून मंजूर कामाचे भूमिपूजन करताना माजी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खुशाल पाटील उमरदरीकर, उत्तम बनसोडे, गोविंद घोघरे, संजय रावणगावकर, सावकार, किशोरसिहं चौहान, शिवा बेळीकर, राजू गजलवाड, करण रोडगे, ज्ञानेश्वर डोईजड, विनोद दंडलवाड, शिवा समराळे, आदी गायत्री गल्लीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.**

# वसुंधरेचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य : प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्दिकी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** अलीकडच्या काळात पर्यावरण संतुलन ढासळले असून शुद्ध हवा आणि शुद्ध पाणी मिळण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करणे गरजेचे आहे, तसेच वसुंधरेचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्दिकी यांनी केले.

नगर तालुक्यातील जेऊर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री संतुकनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच पर्यावरण संवर्धन आणि वृक्षवाटपाचा कार्यक्रम जेऊर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे नियोजन पर्यावरण प्रेमी प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्दिकी यांच्या मार्गदर्शनाखाली जेऊर येथील आठवडा बाजारात करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सिद्दिकी यांनी पर्यावरण संवर्धन आणि वसुंधरा संरक्षणाविषयी विद्यार्थी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून भेट दिलेल्या रोपांचे आपल्या परिसरात रोपण करून त्याचे संरक्षण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी इयत्ता बारावी वर्गातील



विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून आठवडे बाजारात पर्यावरण जनजागृतीचा संदेश दिला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सिद्दिकी यांच्यावतीने व हस्ते आठवडे बाजारातील ग्रामस्थांना वड, पिंपळ, चिंच, करंजी, आवळा सरबत आदी वृक्षांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यालयातील शिक्षकांसह जेऊर गावातील ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धावत्या ट्रेनवर जमावाची दगडफेक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये ट्रेनमधील प्रवाशी भीतीनं एकमेकांना खिडक्या लावून घ्यायची विनंती करताना ऐकू येत आहेत. एका महिलेचाही आवाज येत असून दगडफेक चालू झाली आहे.. अरे बापरे.. काका खिडकी खाली करा ना लवकर, असं सदर महिला एका सहप्रवाशाला सांगत असल्याचंही व्हिडीओमध्ये ऐकू येत आहे. ट्रेनच्या खिडकीमधून बाहेरचं दृश्य दिसत असून माणसांचा एक मोठा घोळका जमा झाल्याचं दिसून येत आहे. याच घोळक्यातल्या काहींनी रेल्वेवर अचानक दगडफेक सुरू केली आणि आतल्या प्रवाशांची धावपळ झाली. दगडांपासून स्वतःचं संरक्षण करण्यासाठी रेल्वेच्या डब्यातल्या प्रवाशांनी तातडीने इतरांना खिडक्या बंद करण्यास सांगितलं. दरम्यान, हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर घडला प्रकार उघड झाला. यासंदर्भात अद्याप कोणत्याही प्रवाशाने तक्रार दाखल केलेली नसून रेल्वे पोलिसांनी स्वतःहून या प्रकाराची दखल घेतल्याची माहिती समोर आली आहे. रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या बैठकींचा धडाका सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बागलाण तालुक्यात नगरपरिषद प्रांताधिकारी कृषी अधिकारी आरोग्य विभाग यांच्यासह घेतली विविध विभागांची बैठक संपन्न झाली. धुळे लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी आढावा बैठकांच्या जोरदार धडाका सुरू केला आहे. शुक्रवारी सटाणा येथील नगरपरिषद येते आढावा बैठक घेण्यात आली. विकास कामांची माहिती जाणून घेतली तसेच सटाणा (बागलाण) या ठिकाणी विविध विकास कामांना गती देऊन ते लवकरात लवकर पूर्ण करा असे सूचना व आदेश खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी आढावा बैठकीत केला

शुक्रवारी धुळे लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी सटाणा बागलाण या ठिकाणी नगरपरिषद, प्रांत कार्यालय, पोलीस अधिकारी यांची आढावा बैठक घेतली या बैठकीत पाणीपुरवठा, भुयारी गटारी योजना, स्वच्छता, शाळा महाविद्यालय, आरोग्य तसेच रुग्णालय व कृषी याविषयी चर्चा करण्यात आली. सटाणा शहरासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम झाले आहे,




मग शहराला पाणीटंचाई का भासली? असं सवाल आजी माझी लोकप्रतिनिधींकडून उपस्थित झाल्याने खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी पाणीपुरवठा योजना समजून घेत निधी कमी पडत असल्यास पुनद योजनेचे काही कामे बाकी असल्याचे उत्तर ठेकेदाराने दिल्याने खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी संता प व्यक्त करून शहरवासींना पाणी मिळवण्यासाठी शासनाच्या निधीची वाट बघायची का? असे सांगून महिनाभराचे आत योजनेचे काम पूर्ण करून सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करा 15 ऑगस्ट पर्यंत शहरवासीयांना पाणी द्या असा स्पष्ट आदेश ठेकेदार व पालिका प्रशासनाला खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी दिला.पावसाचे दिवस सुरू असल्याने शहरातील सर्वोच्च उपनगर मध्ये डास निर्मूलन फवारणी वारंवार करा गटारी नियमित स्वच्छ करा पावसात रस्त्यावर कचरा साचणार नाही याची खबरदारी घ्या, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे वेळोवेळी लक्ष देण्याच्या सूचना संबंधित विभाग प्रमुखांना खासदार बच्छाव यांनी दिल्यात.सटाणा शहरात देवमामलेदार यशवंतराव महाराजांचे सुजय स्मारक होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे स्वतंत्र बैठक घेऊन नियोजित कामास गती देऊ यावेळी शहरातून जाणाऱ्या महामार्गाच्या रखडलेल्या कामाविषयी जिल्हाधिकारी व ठेकेदारण समवेत चर्चा करून कामास गती देऊ असे आश्वासन खासदार बच्छाव यांनी उपस्थित नागरिकांना दिले. सटाणा बागलाण पोलीस अधिकाऱ्यांशी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत सटाणा व बागलाण शहरातील पोलीस निरीक्षकांकडून सटाणा व बागलाण शहराची कायदा व सुव्यवस्थ, ट्राफिक,पोलीस स्टेशन, पोलीस अधिकारी,कर्मचारी यांची समस्या जाणून घेतली तसेच सटाणा व बागलाण शहरातील स्वयंचलित सिग्नल्स सुरू करा असे आदेश खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी दिले. यावेळी त्यांच्या समवेत माजी आमदार दीपिका चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत भोसले, काँग्रेसचे नेते प्रल्हाद पाटील, प्राध्यापक अनिल पाटील, किशोर कदम, गजेंद्र चव्हाण, लालचंद सोनवणे राहुल पाटील प्रकाश देवरे छोटू सोनवणे मुन्ना शेख उषा भामरे सुरेखा बच्छाव कैलाश बोरसे आबा बच्छाव राजू खानकरी तसेच नगरपरिषदेतील सर्व अधिकारी उपस्थित होते.

# क्रिकेटप्रेमी बेरोजगारीसाठी रस्त्यावर उतरणार का ?



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**भारतीय क्रिकेट संघाने-२० विश्वचषक जिंकल्यानंत राजधानीत म्हणजे दिल्लीत क्रिकेट संघ पोहोचला. त्यावेळी भारताचे प्रधानमंत्री यांनी त्यांचे स्वागत केले. संवाद साधला. दिल्लीहून भारतीय क्रिकेट संघ मुंबईत येणार असल्याच्या बातम्या टी.व्ही.वर झळकत होत्या. त्या बातम्या मुंबईतील अनेक तरुणांच्या कानावर आढळत होत्या. बातम्यातही दुसऱ्या बातम्या काहीच नव्हत्या. क्रिकेट एक क्रिकेट. नाहितरी पत्रकारांना एखादी बातमी मिळाली की दिवसभर तीच बातमी पाहता पाहता बातम्या पाहणाऱ्यांचे डोके गुंग होते. त्या बातम्या पाहून, ऐकुन मुंबईतली तरुणाई ( मुलं आणि मुली ) म्हणजेच क्रिकेटप्रेमी विमानतळ ,नरिमन पॉईंट व क्रिकेटचे वानखेडे स्टेडियम कडे धावत सुटली.**

जिथे तिथे प्रचंड लोक एकत्र जमा झाले. विजेत्या भारतीय खेळाडूंना पाहण्यासाठी, त्यांचं स्वागत करण्यासाठी मोठी जंगी गर्दी केली. अनेक गाड्याही रस्त्यावर थांबल्या. माणसं भरगच्च दिसत होती. टी.व्ही. वाले आपापल्या कॅमेरात हे सारं दृश्य टिपत होती. जिकडे तिकडे नाच गाणे, उत्साह, आनंद आणि आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर व ओसांडून वाहताना दिसत होता. क्रिकेट संघाचे स्वागत करण्यासाठी सारे जण सज्ज झाले होते. टी.व्ही. वाले पत्रकार बातम्या देता देता दमछाक होत होते. दृश्य दाखवून तेही आनंदात सहभागी होत होते.राजकारण करणारे राजकारणी मतांचे राजकारण करत होते. तसं तेही राजकारणातल्या मतासाठी कुठलीही संधी सोडत नाहीत. हाथरस चेंगराचेंगरी चे प्रकरण भयानक घडले असल्यामुळे पोलिसांनाही सूचना दिल्या होत्या.हे सारं खरं आहे. भारतीय क्रिकेट खेळाडूंचं अभिनंदन करायलाच हवं. देशाविषयी आपल्याला अभिमान असायलाच हवा पण आजची तरुण पिढी आपल्या भविष्याविषयी, देशाविषयी, सामाजिक प्रश्नाविषयी, स्वातंत्र्यविषयी, महागाई विषयी, बेरोजगारीविषयी व इतर प्रश्नाविषयी किती जागरूक आहे ? हा गंभीर प्रश्न आहे. देशातील तरुणांना शिक्षण घेऊनही नोकऱ्या नाहीत, एमपीएससी परीक्षा पास होऊनही ऑर्डर नाही, परीक्षेत विविध घोटाळे होत आहेत, अनेक तरुण आत्महत्या करत आहेत, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, महागाई गगनाला भीडली आहे,याविषयी मात्र आजचा तरुण शांत आहे. गाढ निद्रित आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा लढणाऱ्या सैनिका विषयी, शूरवीरांविषयी, शहिदांविषयी, समाजसुधारका विषयी, महापुरुषाविषयी किती जाणकार आहे ? महापुरुषांच्या अपमानाविषयी तरुण पिढीला काहीच जाणीव नाही. त्यांच्या कार्यकर्तुत्वाविषयी आम्हाला काहीच माहिती नाही. त्यांच्याविषयी आम्हाला काहीच देणे घेणे नाही. ही आजच्या तरुणांमधील वस्तुस्थिती आहे. खरे तर आपल्या हुतात्म्यांनी भारतवासीयांचे जीवन सुखी करण्यासाठी, त्यांना गुलामीतून बाहेर काढण्यासाठी, पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी काय काय हाल सोसले, स्वतःच्या संसाराची राख रांगोळी केली अन् भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या सर्वांची जाणीव आजच्या तरुणात दिसत नाही.



परंतु क्रिकेट खेळणारा खेळाडू स्वतःसाठी लाखो,कोटी रुपये कमवत असतो. राजकारणी त्यांचे भांडवल करत असतात. त्याच क्रिकेट प्रेमीसाठी आणि राजकारण्यांसाठी आजचा तरुण जीव मुठीत घेऊन गर्दीत जाण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. आज देशातला तरुण वर्ग, सुशिक्षित वर्ग, स्त्रिया मोठ्या प्रमाणात विविध संकटात सापडले आहेत. शिक्षण घेऊन अनेक तरुणांना नोकरी नाही. त्या नोकरीच्या जागा भरल्या जात नाहीत. देश आर्थिक संकटात सापडला आहे असे म्हणून अग्निवीर योजना, कॉन्ट्रॅक्ट पद्धत जाणून बुजून या देशात राबविली जात आहे. इकडून तिकडून घ्यायच्या म्हणून विविध परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा होणार म्हटले की तरुण खुश होतात. आपले भविष्य घडविण्यासाठी सज्ज होतात. परंतु त्या परीक्षा घेण्यासाठी हजारो रुपये फी या तरुणांकडून घेतली जाते. तरुण अभ्यास करून त्या परीक्षा देतात पण परीक्षेत घोटाळा होतो नव्हे केला जातो अन् आमच्या तरुणांच्या आयुष्याचा चुराडा होतो. याचे दुःख त्या क्रिकेट पटुंना किंवा राजकारणातील राज्यकर्त्यांना आहे का? याविषयी ते कधी चकार शब्दही काढत नाहीत पण क्रिकेट प्रेमीसाठी त्यांच्या आनंदात सरकार बरोबर सामील होण्यासाठी लाखो लोकसंख्येने रस्त्यावर उतरणारा तरुण या परीक्षेविषयी मूग गिळून गप्प असतो. म्हणावा तेवढा मोठ्या प्रमाणावर साधा निषेधही नोंदवत नाही. अन्याय अत्याचाराविरुद्ध लढायला एवढ्या मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर एकत्र येत नाही ही या देशाची फार मोठी शोकांतिका आहे. जर हा तरुण आपल्या भविष्यासाठी, समाजासाठी, देशाच्या उन्नतीसाठी रस्त्यावर एकत्र आला तर समाजाचे,देशाचे चित्र पालटून गेल्याशिवाय राहणार नाही पण तसे होताना दिसत नाही. आजचा तरुण वास्तव जाणून घ्यायला किंवा त्या पद्धतीचा अभ्यास करताना दिसत नाही. व्हाट्सअप विद्यापीठातील वरवरची माहिती घेऊन तो आपले मत, विचार बनवताना दिसतो आहे. खरे तर असे म्हणतात की, शेतकरी आपल्या शेताची पेरणी करताना, नांगरणी किंवा कोळपणी करताना लाखो रन काढत असतो. काबाडकष्ट करून शेतात माल पिकवून देशातील जनतेला जगवत असतो. त्याच शेतकऱ्याचे बेहाल या देशात होतात. त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. ते मात्र आजच्या तरुणांना दिसत नाही. त्या शेतकऱ्याच्या दुःखाविषयी आजचा तरुण बोलत नाही. रस्त्यावर येताना दिसत नाही. खरंतर तरुणांनी याविषयी जागरूक असायला हवे कारण तरुण हा देशाचा आधारस्तंभ असतो. या देशाला मजबूत बनवायचे असेल, महासत्ता बनवायचे असेल, देशाची प्रगती साधायची असेल, भारतीय लोकशाहीचे रक्षण करायचे असेल तर तरुणाजवळ ज्ञान असायला हवे. ज्ञान देणारी संस्कार केंद्रे म्हणजे शाळा,महाविद्यालये आहेत. याच शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेऊन विद्यार्थी विविध प्रकारचे ज्ञान मिळवत असतो. त्या ज्ञानाच्या माध्यमातूनच सामाजिक, वैचारिक, शैक्षणिक, राजकीय, वैज्ञानिक व विविध प्रकारचा विकास साधत असतो.तेच शाळा, महाविद्यालये आज बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. तिथे शिक्षक नाहीत .सुविधा दिल्या जात नाहीत. तीच शिक्षण व्यवस्था खाजगीकरणाच्या माध्यमातून आज मोडकळीस आली आहे. उध्वस्त करण्याच्या वाटेवर आहे. कौशल्यावर आधारित शिक्षण या नावाखाली तरुणांना अज्ञानात टाकून ज्ञानापासून वंचित ठेवले जात आहे. गरिबांना, खेड्यातील जनतेला, वाड्या वस्तीतील गरिबांना शिक्षण महाग केले जात आहे. अजून आदिवासी पाड्यावर शिक्षण पोहोचले नाही.त्याबाबत आमच्या आजच्या तरुणांना काहीच वाटत नाही. आजचा तरुण जसा क्रिकेटविषयी प्रेम दाखवतो तसा या प्रश्नाविषयी का दाखवत नाही. जागरूक का होत नाही. नव्हे हे सारे प्रश्न त्याला पद्धतशीरपणे या व्यवस्थेकडून कळू दिले जात नाहीत. त्या तरुणाला मात्र जात, धर्म, पंथ आशा विविध भावनिक गोष्टीत अडकवले जात आहे. तरुणही आशा बाबींना मोठ्या प्रमाणावर बळी पडताना दिसतो आहे. यामध्ये राजकारणी, भोंदू बाबा आपले उद्देश साध्य करून घेताना दिसत आहेत.

आजच्या तरुणांनी आजच्या या परिस्थितीत खडबडून जागं होणे, या साऱ्या गोष्टी समजून घेणे फार महत्त्वाच्या आहेत. देशातील आपल्या बांधवांची, शेजाऱ्या पाजाऱ्यांची, भाऊ बहिणींची, वडीलधाऱ्या मंडळींची विविध प्रकारच्या माध्यमातून जी गळचेपी केली जात आहे. क्रिकेट संघाला सरकारने प्रत्येकाला एक एक कोटी म्हणजे अकरा कोटी रुपये बक्षीस देऊन स्वतःला मिरवून त्या संदर्भात राजकारण करून मतावर डोळा ठेवला आहे. इकडे तरुणांना नोकऱ्या नाहीत, नोकरदारांना जुनी पेन्शन योजना नाही, पेट्रोल डिझेलचे भाव कमी होत नाहीत, खेड्यापाड्यात रस्ता नाही, वीज नाही, पाणी आरोग्याच्या सोयी नाहीत. याची जाण तरुणांना का नाही?आपलेच आयुष्य आपल्या डोळ्यात देखत संपवून टाकले जात आहे. आयुष्याची राख रांगोळी केली जात आहे. याविषयी धीर गंभीर होणे गरजेचे आहे. कुणाचेही जंगी स्वागत करण्यापेक्षा प्रश्नांची जाण असणं हेही महत्त्वाचं आहे. खरे तर क्रिकेट प्रेमींना इतकी गर्दी झाली म्हणून कुणाच्या पोटात दुखण्याचे काही कारण नाही पण आजच्या तरुणांनी भावनिक न होता वास्तविकही व्हायला हवे. त्यांच्यात सामाजिक जाण भान यायला हवे. एवढेच या निमित्ताने मला सांगावेसे वाटते.

# अंगाईगीते : भारतीय व जागतिक दस्तऐवज



डॉ. शरद दुधाट
9834132138

आधुनिक केसरी

**लोकगीत हा लोकसंस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. प्रत्येक प्रगत राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा तेथील लोकवाङ्ग्याने जतन करून ठेवला आहे. लोकगीतातील विविध प्रकारचे स्त्रीगीते मराठीत आहेत. यात लहान मुलांसाठी म्हटली जाणारी अंगाईगीते हा स्वतंत्र वर्ग करता येईल. स्त्रीमनाचा उत्कट व सहज उत्स्फूर्त अविष्कार आणि स्त्रीच्या भावभावनांचे प्रतिबिंब म्हणजे अंगाईगीत. अंगाईगीतातील लोकसंकेत, लोकसमज, लोकजीवन व अंगाईगीताची भाषा हे सर्व ग्रामीण पर्यावरणाशी संबंधित आहेत. अंगाईगीत हा केवळ मराठी माणसाचा आणि मराठी भाषेचा सांस्कृतिक दस्तऐवज नसून तो संपूर्ण जगातील जनमाणसांचा आणि त्यांच्या भाषेचा तो दस्तऐवज आहे.**

या सांस्कृतिक लोकगीताचा जगातील विविध देशातील सांस्कृतिक परंपरेचा वारसा अंगाईगीताच्या माध्यमातून अक्षर वाङ्मयच्या विशेषअंकात व्यक्त झाला आहे. संपादक डॉ. नानासाहेब सूर्यवंशी यांच्या अक्षर वाङ्मय नियतकालिकाची ही अप्रतिम साहित्यमूल्य आणि सांस्कृतिक वारसा जतन करणारी निर्मिती आहे. चौदाव्या वर्षातील हा पहिला ७९१ पानांचा जुलै २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतील जोडअंक जागतिक पातळीवरील अनेक संशोधक, अभ्यासकांनी अंगाईगीत या विषयावर केंद्रित झालेली वैशिष्ट्यपूर्ण सृजनशीलता आहे. अंक म्हणजे जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण लेखनाविष्कार आहे. अंगाईगीत हा विशेषांक विविध संदर्भ मूल्यांची खाण आहे. संपादक आणि अक्षर वाङ्मय यांचा हा महत्त्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आहे. चौदा वर्षाच्या वाटचालीत अंक एक ते तीन मधील संपादक डॉ. नानासाहेब सूर्यवंशी यांनी 'अंगाईगीते : भारतीय आणि जागतिक विशेषांक' या शीर्षकाखाली महाकाय विशेषांक मार्च २०२४ मध्ये प्रकाशित केलेला आहे. या अंकाच्या निर्मिती कार्यामध्ये संपादक, संपादक मंडळ यांच्या अमूल्य योगदानाबरोबर अतिथी संपादक डॉ. अरुण प्रभुणे यांचे अनमोल मार्गदर्शन आणि सहकार्य लाभलेले आहे. लोकसाहित्यात अंगाईगीताचा समावेश असला तरी त्याच्या सर्वच पैलूंचा सविस्तर अभ्यास झालेला नाही. म्हणूनच अंगाईगीतांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा यशस्वी प्रयत्न अक्षर वाङ्मयच्या या विशेष अंकातून केलेला आहे. मराठी चित्रपटातील आणि मराठी भाषेतील अंगाईगीते आपणास बालविश्वात घेऊन जातात.

निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई,
आज माझ्या पाडसाला झोप का ग येत नाही....

हे 'बाळा गाऊ कशी अंगाई' या मराठी चित्रपटातील प्रथितयश कवी मधुसूदन कालेलकरांचे अंगाईगीत बालपणाची आठवण करून देते. बाळाविषयीची आपुलकी, काळजी या गीतातून व्यक्त होते. आई आणि मूल यांचे भावनिक सहसंबंध अंगाईगीतामुळे सक्षम होतात. या गीतामुळे बाळाच्या मेंदूचा आणि देह बुद्धीचा विकास होतो. मातृवात्सल्य प्रेम या भावनिक बंधनाचा अविष्कार व्यक्त होणे, हा अक्षर वाङ्मयच्या कार्यामागील विचार आहे. भारत देशासमवेत जगात अन्य देशात संस्कृतीत आणि भाषांत अंगाईगीताची स्थिती काय आहे? अंगाईगीताचा अभ्यास लोकसाहित्य बरोबर अन्य अभ्यास शाखांमध्ये रुची घेऊन होतो का? अंगाईगीताचे पैलू जागतिक अभ्यासकांना कसे वाटतात? अंगाईगीतावर काही नवे संशोधन होत आहे का? या सर्व प्रश्नांना केंद्र मानून संपादक आणि अक्षर वाङ्मयने हा नाविन्यपूर्ण लेखनप्रपंच मांडला आहे. जागतिक पातळीवर असे नाविन्यपूर्ण वैचारिक लेखनप्रपंच मांडताना हा अंक अक्षर वाङ्मयला तसा नवीन नाही. यापूर्वी २०१२-१३ मध्ये 'अक्षर वाङ्मय : नाट्य विशेषांक- प्रायोगिक नाटकः भारतीय आणि जागतिक' हा संदर्भमूल्य विशेष अंक प्रकाशित केलेला आहे. या जागतिक विशेषांकाबरोबरच वा. ल. कुलकर्णी विशेषांक ( २०१२ ), प्रा. सतीश बहादूर विशेषांक- चित्रपट भाषा अंक ( २०१६ ), किताबे नवरस विशेषांक ( २०१७ ), आनंद यादव विशेषांक ( २०१७ ) ही सर्वच विशेषांक साहित्यमूल्ये आणि संदर्भमूल्यांनी वैशिष्ट्यपूर्ण




आहेत.

या विशेषांकातील जगातील अनेक देशातील संस्कृती आणि भाषांनी समृद्ध अंगाईगीतावरील संशोधकांचा अभ्यास हा या अंगाईगीताचा अमूल्य वैचारिक सांस्कृतिक ठेवा आहे. हा ठेवा जतन करण्याचे काम जागतिक पातळीवर अक्षर वाङ्मयने केले आहे. जगातील अनेक संस्कृतीतून आणि भाषांतून जन्मलेली ३२१ अंगाईगीते व त्यांचे मराठी अनुवाद, अनेक संशोधक, अभ्यासक, गायक आणि संगीतकारांचा महत्त्वपूर्ण सहभाग, त्यांची लेखाच्या रूपाने, मुलाखतीच्या रूपाने प्रकटलेली विचारधारा, स्थलदर्शक नकाशे, अंगाईगीताची अर्थपूर्णता वर्धित करणारी संदर्भ चित्रे, फोटो यामुळेच या अंकाचे वेगळेपण आहे. हा अंक एक बृहत अंक आहे. कदाचित मराठी नियतकालिकांच्या इतिहासात हा पहिलाच बृहद अंक असावा.

या विशेषांकाच्या चार हजार वर्षांपूर्वीच्या सुमेर भाषेत अक्षर वाङ्मय ही अक्षरे छापली असल्यामुळे या अंकाचे आणि मुखपृष्ठाचे महत्व अधोरेखित होते. या कार्यात अमेरिकेतील उदय प्रभुणे यांची योगदान मोलाचे आहे. उषा प्रभुणे यांनी अनेक अंगाईगीतांचा मराठीत केलेला अनुवाद तेवढाच महत्वपूर्ण आहे. जगभरातील अंगाईगीतांच्या वैचारिक लेखनाचा हा साहित्यरुपी ठेवा संकलित करून ठेवणे ही एवढी सोपी बाब नाही; परंतु संपादक हा लेखनप्रपंच संकलित करण्यात लीलया यशस्वी झाली आहेत. जागतिक स्तरावरील अंगाईगीताविषयीचा हा वैचारिक लेखनाचा अलौकिक ठेवा आहे. हा अमूल्य साहित्यरुपी ठेवा अक्षर वाङ्मयमध्ये कायमचा शब्दबद्ध झाला आहे. जागतिक अभ्यासक, संशोधक यांच्या इंग्रजी लेखनातील हे विचार, मराठीतील अनुवाद या दोन्ही भाषेतील संयुक्त विचारमूल्यांचा अविष्कार म्हणजे अंगाईगीतांचा लेखनप्रपंच आहे. अंगाईगीतातील लेखनातून काव्यात्माचा शोध, अंगाईगीताचे स्वरूप आणि प्रवृत्ती यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. अंगाईगीत ऐकण्याचा परिणाम बाळाच्या मनावर आणि शरीरावर कसा होतो? याची चर्चा कॅनडा येथील डॉ. लॉरा सिरेली यांनी केली आहे. महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध बोलीतील हा अविष्कार व्यक्त झाला आहे. झाडीपट्टीतल्या अंगाईगीतातून समाज जीवनावर टाकलेला प्रकाश, अंगाईगीत म्हणजे मातेकडून बाळावर होणारा काव्यमय, लयबद्ध संस्कार हा भावनिक नातेसंबंधातील सेतू आहे. अंगाईगीताची ओळख पौराणिक काव्यातील संदर्भातूनही होते.

या विशेषांकात उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, आफ्रिका आणि आशिया या सहा खंडातील अभ्यासक आणि संशोधकांची ही विचारमूल्ये आहेत. जगभरातील एकूण २५ देशातील प्रतिष्ठित संस्था, विद्वानांनी, कलाकारांनी, संगीतकारांनी यात आपले योगदान दिलेले आहे. विद्वत्तापूर्ण २७ लेख आणि २९ मान्यवरांच्या मुलाखतीमुळे हा अंक साहित्यमूल्यांनी समृद्ध झालेला आहे. नामशेष होण्याच्या भाषांसह जगभरातील ३८ भाषातील अंगाईगीते अनुवादासह नवचैतन्य निर्माण करणारी आहेत. ऋग्वेदातील अंगाईगीत सदृश्य सूक्त, मेसोपोटेमियम मातीच्या भांड्यावरील जगातील प्राचीनतम अंगाईगीते, अंगाईगीताची माहिती देणारी मुलाखत, चार हजार वर्षांपूर्वीच्या अक्काडियन अंगाईगीतातील काव्यात्मकतेचा शोध घेणारा लेख, लंडनच्या तुरुंगातील कैद्यांनी लिहिलेली अंगाईगीते, निर्वासित छावण्यातील लिहिलेली अंगाईगीते, लुप्तप्राय होणारी अंगाईगीते, शोक अंगाईगीते अशा विविधांगी मौलिक संदर्भसामग्री आणि मूल्यांनी हा शब्दरूपी अमृतमय ठेवा या विशेषांकातून वाचकांना वैचारिक, भावनिक मेजवानीसाठी उपलब्ध आहे. या विशेषांकाचा हा अमूल्य दस्तऐवज संपादकांनी अक्षर वाङ्मयच्या वेबसाईटवर जतन करून ठेवला आहे. संपादकांचा हा मोठेपणा वाखाणण्याजोगा आहे. या विशेषांकातील संपादक, अतिथी संपादक आणि अनेकांचे विविधांगी योगदान आणि परिश्रमाला कोणतीही सीमा नाही. म्हणून हा विषय अंक साहित्य क्षेत्रातील अंगाईगीतांचा दस्तऐवज ठरला आहे. हा अंक जागतिक साहित्य क्षेत्रातील वाचक, अभ्यासक आणि संशोधक यांच्या कायम स्मरणात राहील असाच झाला आहे.

# फ्रान्समधील निवडणूक निकालाचा अन्वयार्थ



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**फ्रान्समधील झालेल्या निवडणुकीत जबरदस्त धक्कादायक निकाल समोर आले. जल्लोष करणाऱ्यांना थांबावे लागले आणि थांबणाऱ्यांना मित्रांचे बोट हाती धरून अवघड वाट चोखाळावी लागेल. हे पॉलिटिकल ट्विस्ट कुठल्या वळणावर कसे घडून आले, या धक्कातंत्राचा अर्थ काय असे अनेक प्रश्न पडतात. त्याची उकल येथे केली आहे. फ्रान्स या देशाला केवळ युरोपचीच नव्हे तर सबंध जगाची राजकीय प्रयोगशाळा असे मानले जाते. फ्रेंच राज्यक्रांती १७८९ पासून आतापर्यंत फ्रान्सने लोकशाहीच्या यशस्वितेसाठी जेवढे प्रयोग केले आहेत तेवढे जगाच्या कुठल्याही देशात झाले नसतील.**

परंतु स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय हा फ्रेंच राज्यक्रांतीचा संदेश फ्रान्सने आपल्या राजकीय जीवनामध्ये कृतीत आणला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत युरोपिय संसदेची जेव्हा निवडणूक झाली तेव्हा फ्रान्सने उजवीकडे कौल दिला होता. तो युरोपातील सर्वसाधारण कौल जसा होता तसाच होता. परंतु इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी घेतलेल्या स्नॅप पोल मध्ये म्हणजे अचानक घेतलेल्या निवडणुकांमध्ये मात्र एकीकडे जल्लोष आणि दुसरीकडे धक्का असे अद्‌भुत चित्र दिसून आले. प्रथमतः उजव्यांना वाटत होते की, आपली सरशी होत आहे. परंतु काही क्षणातच दुसऱ्या फेरीत पुन्हा डावे समोर आले. कोणत्याही एका गटाला किंवा पक्षाला संसदेमध्ये पूर्ण बहुमत मिळू शकले नाही. त्यामुळे आता त्रिशंकू अवस्थेत असलेल्या फ्रान्सला एकमेकांना समजून घेऊन आघाडी सरकार करण्यावाचून दुसरा मार्ग उरलेला नाही. एकीकडे ब्रिटनमध्ये चार सो पार कृतीत आणून मजूर पक्षाने सत्ता मिळविली तर दुसरीकडे फ्रान्समध्ये मात्र आघाडी सरकारची नवी बिघाडी समोर आली आहे.

**अनपेक्षित आणि धक्कादायकः** अलिकडे एक्झिट पोलचे अंदाज सुद्धा खोटे ठरतात. कारण हे हितसंबंधांशी निगडीत असतात. प्रत्यक्षात लोक काय कौल देतात याचा अंदाज या प्रकारच्या सांख्यिकीय गणनेनुसार येतोच असे नाही. कोणालाही अपेक्षा नव्हती असा धक्कादायक निकाल समोर येणे म्हणजे हे केवळ राजकीय नाट्य नव्हे, तर ती एक अद्‌भुत फ्रेंच कार्यप्रणाली म्हटली पाहिजे. सर्वात मोठ्या फ्रान्समधील टी. व्ही. चॅनेलवर ग्राफिक्स चमकू लागले. तेव्हा मरीन ले पेन आणि तिचे तरुण पंतप्रधान प्रतिक्षेत असलेल्या जॉर्डन बार्डेला विजयाच्या वाटेवर असताना काय घडले ? खरेतर, ते फारसे दीर्घकाळ टिकले नाहीत. दुसऱ्या फेरीत डाव्यांनी पुन्हा यू टर्न घेतला आणि ते जिंकण्याच्या मार्गावर आले आणि इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मध्यवर्ती एन्सेम्बल अलायन्स अनपेक्षितपणे पुनरागमन करू लागले. त्यामुळे अत्यंत उजव्या विचाराच्या नॅशनल रॅली आघाडीला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले गेले. जीन ल्यूक मेलेंचॉन हे अनुभवी डाव्या विचारसरणीचे फायरब्रँड नेते आहेत. त्यांच्या समीक्षकांनी त्यांच्याकडे अतिरेकी विचाराचे म्हणून पाहिले होते. विजयाची घोषणा करण्यात कोणालाही निश्चित खात्री नव्हती. आता राष्ट्रपतींनी नवीन पॉप्युलर फ्रंटला राज्य करण्यासाठी बोलविले पाहिजे असे त्यांनी स्टॅलीनग्राड चौकातील आपल्या समर्थकांसमोर दिलेल्या भाषणात सांगितले. श्री. मॅक्रॉनने ते आणि त्यांची युती हरली हे ओळखले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. अध्यक्ष मॅक्रॉन यांच्या आश्चर्यचकित करणाऱ्या निवडणुकीसाठी घाईघाईने तयार केलेल्या त्यांच्या युतीमध्ये ग्रीन्स, समाजवादी आणि कम्युनिस्ट तसेच अगदी तरूण डाव्या युवक गटांचाही समावेश होता. पण त्यांचा विजय हा वज्रलेप ठरण्याएवढा मोठा राहिला नाही. म्हणजेच त्यांना एकहाती बहुमत प्राप्त झाले नाही. **आता त्रिशंकू सरकारः** फ्रान्समध्ये त्रिशंकू संसद असणार आहे. कारण ५७७ सदस्य असलेल्या संसदेमध्ये २९९ जागांवर ३ गटांपैकी एकालाही पूर्ण बहुमत मिळू शकले नाही. डाव्या आघाडीने सर्वाधिक जागा जिंकल्यानंतर फ्रान्सला त्रिशंकू संसदेच्या गतिरोधाचा सामना करावा लागणार आहे. मॅक्रॉन हे आपला विजय साजरा करण्यासाठी ८००० लोकांच्या उपस्थितीत रिपब्लिकन चौकामध्ये गेले व तेथे त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. नॅशनल रॅलीच्या समर्थकांपैकी काही प्रमुख म्होरक्या नेत्यांनी निसर्गरम्य जंगलात जाऊन तेथे चिंतन केले. फक्त एका आठवड्यापूर्वी सर्व चर्चा उजव्यांच्या संभाव्य विजयी बहुमताची होती आणि एक्झिट पोलमध्येही असे सांगितले जात होते. मग त्यांचा पोपट कसा झाला? मरीन ले पेन आणि जॉर्डन बार्डेला मतदानाच्या काही दिवस अगोदर त्यांच्या विजयाच्या शक्यतेबद्दल आत्मविश्वासाने बोलत होते. संकेत देत होते. मरीन ले पेनने एक धाडसी वक्तव्य केले होते. दोन वर्षापूर्वी आमचे फक्त ७ खासदार होते. आता आज रात्री आरएन हा फ्रान्समधील खासदारांच्या संख्येच्या बाबतीत पहिला पक्ष आहे असा त्यांचा विश्वास आहे. गेल्या संसदेमध्ये त्यांचे ८८ खासदार होते. आता १४० पेक्षा जास्त आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे बरोबर होते आणि इतर कोणत्याही पक्षाकडे १०० पेक्षा जास्त खासदार नाहीत. कारण मॅक्रोनिस्ट आणि पॉप्युलर फ्रंट हे दोन्ही युतीमध्ये आहेत. जॉर्डन बार्डेला यांनी तशी नाखुषी व्यक्त केली आहे की, त्यांचा पक्ष अनैसर्गिक अपमानाच्या युतीद्वारे अयशस्वी झाला. मॅक्रॉन आणि डाव्यांनी बनलेल्या एकल पक्षाने आपले स्थान बनविले. अनैसर्गिक युतीबद्दल ते चुकीचे नव्हते. परंतु ही केवळ गरज होती असे त्यांना वाटले.



**पुन्हा आघाडी सरकारः** न्यू पॉप्युलर फ्रंटमध्ये एन्सेम्बल व नॅशनल रॅली यांचा समावेश होता. आता अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन हे न्यू पॉप्युलर फ्रंटबरोबर आघाडी करून सरकार बनवू शकतात. परंतु त्यासाठी बऱ्याच कसरती कराव्या लागतील. तसेच निवृत्तीचे वय ६४ असावे या वादाच्या मुद्यावर माघार घेऊन त्यांना निवृत्तीचे वय ६२ असावे असे म्हणणाऱ्या गटाबरोबर तडजोड करावी लागेल. मतभेदाचे विषय बाजूला ठेवून जो गट किमान समान कार्यक्रम तयार करेल व कालबद्ध अंमलबजावणीची आखणी करेल तोच सत्तेच्या बोहल्यावर चढू शकेल. स्नॅप पोलमध्ये जे घडले त्याचा डाव्यांना फायदा झाला असे म्हणावे लागेल. परंतु उजवे आणि डावे यांच्या संघर्षात कुठल्याही पक्षाला बहुमत नसल्यामुळे फ्रान्सला आता त्रिशंकू अवस्थेतून जावे लागेल आणि प्रत्येक निर्णय काळजीपूर्वक घ्यावा लागेल. दूधाने तोंड पोळले तर ताकही फुंकून प्यावे लागते या पद्धतीचा सावध कारभार या त्रिशंकू सरकारला करावा लागेल.

**पीळ कशामुळे पडला?** यावेळच्या संसदीय निवडणुकीचे वर्णन बहुतेक प्रसार माध्यमांनी पोलिटिकल ट्रिस्ट असे केले आहे. केंब्रीज शब्दकोशामध्ये ट्रिस्ट या शब्दाचा अर्थ एक मैल पुढे जाऊन पुन्हा मागे येणे असा दिला आहे. मराठी भाषेत सुंभ जळला तरी पीळ जात नाही, तो कायम असतो अशी म्हण आहे. हा पीळ म्हणजे फ्रान्सच्या अद्‌भुत राजकीय प्रकृतीचे उदाहरण होय. उजव्या व डाव्या विचारांच्या हिंदोळ्यावर असलेल्या फ्रान्सने नवा झोका घेतला आणि आता मिश्र सरकारला सत्ता स्थापनेचा मोका दिला आहे. हा प्रयोग किती काळ टिकेल, या काळात फ्रान्सला कोणती राजकीय, सामाजिक व आर्थिक धोरणे सुनिश्चित करावी लागतील, किमान कार्यक्रमाचा आराखडा जनमताचा कौल लक्षात घेऊन तयार करावा लागेल. मॅक्रॉन तसे डावे असले तरी मध्यम मार्गाकडे झुकू शकतात. त्यामुळे अशा कोणत्याही लवचिक गटाबरोबर मांडीला मांडी लावून बसण्याची त्यांची तयारी असेल. मुख्यतः स्थलांतरीत घुसखोरांचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनी मिळून बहुमताने काही धोरण ठरवावे लागेल. प्रश्न निवृत्तीच्या वयाचा असो की, स्थलांतरीत घुसखोरांचा असो, फ्रान्सला आता तारेवरची कसरत करावी लागेल.

**अस्थैर्यातील स्थैर्यः** आघाडी सरकार जेव्हा असते तेव्हा कोणताही अतिरेकी निर्णय घेता येत नाही. उजव्या, डाव्या, मध्यम मार्गी सर्वांकडे पाहून हास्य करावे लागते. प्रत्येक गटाच्या रागलोभाचा विचार करावा लागतो. जनादेश आघाडी सरकारचा असेल तर सर्वांनी मिळून गुण्यागोविंदाने, सामोपचाराने कारभार करणे आणि जनतेच्या विश्वासाला पात्र राहणे हाच पर्याय उरतो. त्यामुळे भांड्याला भांडे लागले की आवाज असे करून चालत नाही. एकाने दुसऱ्याला समजून घ्यावे, दुसऱ्याने तिसऱ्याची मर्जी संपादन करावी असा आघाडीचा समन्वयाचा पवित्रा असतो. सहमतीचे राजकारण हा आघाडी सरकारचा जणू आत्माच असतो. आजवरच्या राजकीय हालचालीतील कठीण व दोलायमान अशा परिस्थितीत फ्रान्सला जावे लागत आहे. डोंबाऱ्याने दोरीवरचा खेळ करावा तसा प्रत्येक क्षणी समतोल व संतुलन साधत पुढील वाट चोखाळावी लागेल. 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा' या संतवचनाप्रमाणे ऊस वाकडा असला तरी त्याचा रस हा गोडच असतो. उजव्या डाव्या पक्षांचे दावे-प्रतिदावे आता थंडावले आहेत. तापलेले राजकीय वातावरण शांत होत आहे. अशावेळी फ्रान्सला अस्थैर्यातील स्थैर्य अनुभवावे लागणार आहे.

हा फ्रान्सच्या लोकशाही जीवनातील आणखी एक नवा राजकीय प्रयोग म्हटला पाहिजे. इंडोनेशियात १९७१ साली जगातील पहिले आघाडी सरकार स्थापन झाले, भारतामध्ये उत्तरेतील ५ घटक राज्यात संयुक्त विधायक दलाची सरकारे स्थापन झाली होती. कोणा एकाचे स्पष्ट बहुमत नसताना त्यांनी जनतेच्या कल्याणाचे काम चोखपणे बजावले. आघाडी सरकारमध्ये रुसवे फुगवे, रागलोभाचे प्रसंग येत असतात. परंतु आघाडी ही गुळाची ढेप असते. सत्तेला मुंगळे जसे चिकटावेत, तसे आघाडीतील पक्ष तिच्यात बिघाडी होऊ देत नाहीत. कारण ते युतीचा धर्म पाळतात. फ्रान्सला आता अशा कसोटीच्या काळात एक नवा राजकीय प्रयोग यशस्वी करून दाखवावयाचा आहे. संशयकल्लोळाचा अंक संपून आता नवे नाटक साकारत आहे. प्रश्न कितीही बिकट असो, आयफेल टॉवरवरचे राजकीय घड्याळ बंद पडणार नाही एवढे मात्र खरे. फ्रान्सच्या इतिहासातील हा क्षण शाश्वत आहे. चिरंतन आहे. तेवढाच तो गतिमानही आहे यात शंका नाही. हाच फ्रान्समधील निवडणुकीच्या निकालाचा अन्वयार्थ म्हणावा लागेल.

# समरस वारीला सर्वधर्मसमभावाची वारी होऊ द्यायची का ?



अशोक राणे, अकोला
संपर्क क्र. 9423658385

आधुनिक केसरी

**पंढरपूरची वारी व आषाढी एकादशीचे व्रत महाराष्ट्रातील सामाजिक समरसतेचा सर्वात मोठा सणउत्सव असून वेदशास्त्र माहेर विठ्ठल हे सर्व सामान्य माणसाचे दैवत आहे आहे त्यामुळे आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर वारी मध्ये वैष्णवांचा मोठा जनसागर आपल्या दैवताच रूप पाहण्यासाठी उपस्थित होतो पंढरपूरच्या वारी उत्सवाला कोणालाही निमंत्रण नसते किंवा "चलो पंढरपूर"अशी सुविधा सुध्दा कोणी करीत नसते. फक्त कालदर्शिकेच्या तिथीप्रमाणे देशाच्या विविध भागामधून ग्रामीण, शहरी शेतकरी ते जमीनदा व श्रीमंत ते सामान्य माणूस स्वखर्चाने स्वतःला विठ्ठल भक्त म्हणत व विठ्ठलास मायबाप म्हणत पंढरपूरच्या दिशेने पायी चालत निघतो.**

दशमीच्या दिवशी पंढरपुरात विसावा घेत विठ्ठलाच्या दर्शनाची आस लावतो दशमी ते पौर्णिमा पाच दिवस पंढरपुरात विठ्ठल भक्ताचा जनसागर उसळतो सामाजिक समरसता व एकतेचा मोठया उत्सवाचे दर्शन तेथे घडते हिंदुत्वाच्या एकतेचे विशाल स्वरूप असलेल्या वारी मधील समरसता,बंधुभाव काही समाज विघातक टोळ्याच्या आणि संघटना संस्थांच्या डोळ्यात सतत खुपत आहे त्यामुळे त्यांनी पंढरपूरच्या वारी मध्ये प्रवेश करून वारकरी बंधूची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालविला आहे तसेच सामाजिक समरसतेचा कणा मोडण्यासाठी त्यांनी मीडिया द्वारे काही छुपे प्रयोग करणे सुद्धा सुरू केले पावसाळ्यात ज्या प्रमाणे जागोजागी कुत्र्याच्या छत्र्या उभ्या राहतात किंवा पावसात जिकडे तिकडे बेंडकाची पैदास पहावयास मिळते त्याच प्रमाणे हिंदूत्व विरोधी विघातक मंडळी हिंदू सणउत्सव असलेल्या वारी दरम्यानच बिळां मधुन पटापट बाहेर पडून समाज विरोधी डराव डराव करीत असतात आता ह्या डराव डराव करणाऱ्या स्वतःला नास्तिक म्हणणाऱ्या टोळ्या मुळातच सहिष्णू असलेल्या " वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ" या समरस आणि बंधुभाव विचाराच्या वारीला सर्वधर्मसमभावाची वारी करण्यासाठी आटापिटा करीत आहेत आषाढी एकादशी साठी महाराष्ट्राच्या गावागावा मधून हजारो पालख्या,दिंड्या लाखो वारकरी पंढरपूर दिशेने पायी निघत असतात आणि अशा दिंड्या मध्ये नास्तिक मंडळी नकली वारकरी बनून वावरत आहेत आपण वारकरी असल्याचा बनाव करीत आहेत तसेच काही हिंदूत्व विरोधी डावे पत्रकार लेखक सुध्दा घुसले आहेत व ते वारी मधील चुकीचे वार्तांकन करून संभ्रम निर्माण करीत आहेत तसेच काही राजकीय पक्षाचे नेते सुध्दा वारी मध्ये सामील होऊन किंवा दिल्ली मधील राजकीय नेत्यास सामील होण्याचे निमंत्रण देऊन राजकारण करीत असल्याचे दिसत आहे. वारी मध्ये कोणीही येऊ शकते वारी ही सर्वांची आहे विठ्ठल सुध्दा सर्व वैष्णवांचा त्यामुळे वारी व विठ्ठलावर कोणाचीही मक्तेदारी नाही हे सत्य आहे पण वारी मध्ये सामील होण्याचा हेतू शुध्द असला पाहिजे तुकोबांनी "शुध्द बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी" म्हटले आहेच आता वारी मध्ये काही पत्रकार मंडळी,तथाकथित समाजसेवक,राजकीय मंडळी घुसल्या आहेत त्यांचा वारी मध्ये सामील होण्याचा हेतू शुध्द नसल्याचे लक्षात येत आहे तुकोबांनी "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म" हा विचार मांडलेल्या वारीत श्रमिक मुक्ती आंदोलनाचे भारत पाटणकर( दिवंगत गेल ओम्हवेट यांचे पती ) हे विठ्ठल विष्णूचे अवतार नाहीत असे अनेक वाद सतत निर्माण करतात मुंबई मध्ये बसून काही पत्रकार वारी मधील काही घटनांना वर्तमान पत्रा



मध्ये अवास्तव प्रसिद्ध देत आहे तसेच ख्रिश्चन मिशनरीचे धर्म प्रसारक पत्रके,बायबलच्या प्रती वाटप करण्याचे काम पध्दतशीर करीत आहेत एकूणच वारीला समाज विघातक मंडळीनी चारी बाजूंनी घेरले असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे

पंढरपूर वारीचा विचार केल्यास पूर्वी बबनराव पाचपुते एक वारकरी म्हणून वारीमध्ये सामील व्हायचे त्यांनी कधी वारी मध्ये राजकारण केल्याची किंवा वारकरी संप्रदाय मध्ये संभ्रम निर्माण करण्याची नोंद नाही परंतु आता च्या वारी मधील चित्र आश्चर्यकारक आहे कारण काही वर्षा पूर्वी हिंदू देवदेवता,हिंदू सणउत्सव,ज्ञानेश्वर माऊलीची टिंगलटवाळी करणाऱ्या सुषमा अंधारे यांनी वारीत प्रवेश केला आहे त्यांचे व्ही.डी.ओ.सोशल मीडिया मध्ये फिरत आहेत किंवा जाणीवपूर्वक फिरविले जात आहेत तसेच शरदपवार यांचे काही समर्थक सुद्धा वारीत घुसले आहेत त्यांनी तर शरद पवार व त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांची विठ्ठलरुखमाई सोबत तुलना केली आहे वास्तविक पाहता मी तुमच्या देवाचा बाप आहे असे म्हणत हिंदू देवदेवतांची खिल्ली उडवणाऱ्या शरद पवार यांची विठ्ठला सोबत तुलना कितपत योग्य आहे ? ज्यांनी आयुष्यभर पुरोगामी असण्याचा टेंभा मिरवून सतत मुस्लिम अनुनय केला सत्यनारायण पूजेला विरोध व इफ्तार मध्ये शिरखुर्मावर ताव मारला, पूजा घरात आणि नमाज रस्त्यावर अशा दुटप्पी विचाराचे समर्थन करणाऱ्यांची तुलना विठ्ठला सोबत करतांना लाज कशी वाटत नाही ? त्यामुळे अशा दुटप्पी व बेगड्या नास्तिक मंडळीचे वारी मधील हजेरी वर प्रश्नचिन्ह होत असून त्यांचे वारी मध्ये काय काम आहे ? असा प्रश्न सामान्य वारकरी उपस्थित करीत आहेत व वारकऱ्यानी उपस्थित केलेल्या प्रश्नावर विचार करण्याची गरज आहे वारी मधील प्रकार कुठे तरी थांबविण्याची वेळ सुद्धा आहे अन्यथा येणाऱ्या पाच दहा वर्षात बेगडी नास्तिक व पुरोगामी मंडळी पंढरपूरच्या वारीची वीण विस्कळीत केल्या शिवाय राहणार नाहीत. पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या वारी मध्ये काही ठिकाणी आक्षेपार्ह घटना सुध्दा प्रकर्षाने दिसत आहेत मुस्लिम समाज वारकरी बंधूंना पाणी वाटप करीत आहेत अल्पोहर देऊन मुस्लिम दर्ग्यात वारीचे स्वागत करीत आहेत त्यामुळे या घटना कडे गंभीरतेने लक्ष देण्याची गरज आहे कारण ही मंडळी साध्या भोळ्या वारकरी बंधू मध्ये चांगुलपणाचां देखावा करून आपले लव्ह जिहाद पासून धर्मांतरणाचा अजेंडा राबविणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे तमाशा कलावंतानी वारीत वारकरी बंधूं समोर लावणी सादर करणे आणि अशा घटनांना प्रसिध्दी माध्यमात अवास्तव प्रसिद्ध देणे हे प्रकार सुद्धा वारी मध्ये संभ्रम निर्माण करण्याचे षडयंत्र असल्याचे विदारक सत्य लक्षात येत आहे त्यामुळे अनेक शतका पासून "भेदा भेद भ्रम अमंगळ" हा विचार घेऊन पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या वारीला सर्वधर्मसमभावाची वारी करण्याचा जो प्रयत्न समाज विघातक मंडळी द्वारा चालविला जात आहे किंवा थट्टा केली जात आहे तो प्रकार थांबविण्याची नितांत आवश्यकता आहे. मशिदी समोरून दिंडी पालखी वाजत गेली तर त्याचा विरोध करणारी मंडळी वारी पालखीचे स्वागत का करीत आहेत?

# गोड तुझे रूप गोड तुझे नाम | देई मज प्रेम सर्व काळ




तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**जीवन जगत असताना प्रत्येक जण नाव आणि रूप यामध्ये अडकून जातो आणि संत सांगतात नाव आणि रुपामुळे जगत तयार होते. दैनंदिन जीवनातील प्रत्येक जीव नाव लौकिकासाठी धडपडत असतो. स्वतःच्या पोट भरीच्या ज्ञानाला सत्य मानतो आणि देहभाव वृत्तीत अडकून जातो. परंतु भगवंताची वारी देहभाव विसरायला लावते. हा वारीचा अनुभव घेत असताना प्रत्येक जीव स्वतःला विसरून जातो आणि भगवंत नाममध्ये रममाण होतो. ही वारी पंढरपूर च्या दिशेने जस जशी पुढे जाईल तसं तसे संपूर्ण जग विठ्ठलमय होऊन जाते.**

यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात,
**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेदभ्रम अमंगळ || आईका जी तुम्ही भक्त भागवत | कराल तें हित सत्य करा || कोणाही जीवाचा न घडावा मत्सर | वर्म सर्वेश्वरपूजनाचे || तुका म्हणे एका देहाचे अवयव | सुख दुःख जीव भोग पावे ||** प्रत्येक जीवाला ही पंधरा दिवसांची वारी समजते, कळते, भावते परंतु जी खंडपणे २१६०० वेळा वारी नित्याची सुरू आहे हे समजत नाही. कारण मानवी जीव ऐकून ऐकत नाही. कळतंय पण वळत नाही असा जीवन जगत असतो. तसं पाहता देह ही पंढरी आणि आत्मा हा विठ्ठल आहे परंतु संतावर विश्वास नाही. मी पणाचा अहंकार हा अतिशय घातक असतो पण इंद्रिय बळकट आहेत तो पर्यंत जीव 'मी' पणा सोडत नाही, साठ वर्षांनी सोडल्यावर त्याचा उपयोग नाही. यालाच संत म्हणतात आपण वयाच्या साठाव्या वर्षी डॉक्टर झालो तर आपण स्वतःवर उपचार करणार की इतरांवर? म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात,
आपुलिया हिता जो असे जागता | धन्य मातापिता तयाचिया || कुळीं कन्या पुत्र होती जी सात्विक | तयाचा हरीख वाटे देवा ||
प्रत्येक जीव हा फक्त सुखासाठीच धडपडत आहे परंतु सुख मिळत नाही. काहीजण घरी आहेत ते वारी चा विचार करत आहेत आणि जे वारी मध्ये आहेत त्यांना काही अंशी घरचा विचार आहे. म्हणजेच आपण जिथे आहोत तिथे 100 % प्रेझेंट राहत नाही. आपण भूतकाळात रमतो किंव्हा भविष्यकाळाची चिंता करतो. परंतु संत सांगतात तू वर्तमान काळात जग. प्रत्येक गोष्टीचा सूक्ष्म विचार कर, विवेक आणि संयम सतत जागृत राहू दे म्हणजेच जीवाची जीव दशा पूर्ण होईल. त्यासाठी देव, संत, नाम यांची संगत लाभली पाहिजे. तेंव्हा संत तुकाराम महाराज म्हणतात,
**सुख पाहता जवापाडे | दुःख पर्वताएवढे || धरी धरी आठवण | मानी संतांचे वचन ||** यालाच संत पण सांगतात, 'एक नाम तरी बाकी सर्व दुकानदारी'. एका नामावर संतांवर आपला विश्वास असायला हवा. जेव्हा संतांवर विश्वास असतो तेव्हा जीवनामध्ये घडणाऱ्या सर्व गोष्टी प्रत्येक जीव आनंदाने स्वीकारत असतो. आणि प्रत्येक कृती करत असताना देखील ती आनंदासाठी न करता आनंदाने करतो. तेव्हा मानवाचे जीवन सुखकारक होतं. जसं सुखव्हावं, भगवंताची भेट व्हावी, भगवंताचा दर्शन व्हावं, आपल्या काही मनोकामना असतील त्या पूर्ण व्हाव्यात किंवा डोळे भरून मी माझ्या भगवंताला पाहावं हीच काय ती अपेक्षा ठेवून प्रत्येक जण वारीमध्ये जात असतो. पण जेव्हा आपण वारीमध्ये असतो तेव्हा ऊन वारा पाऊस थंडी प्रत्येक गोष्टींचा मारा हा सहजतेने स्वीकार करत असतो. आणि जेव्हा एक क्षण का होईना त्या भगवंताचे दर्शन होतं आणि झालेल्या सर्व कष्टाचा त्या जीवाला विसर पडतो. परंतु हा आनंद मात्र चिरकालासाठी टिकून राहत नाही. कारण आपण जसा देव तसा भाव या वृत्तीने आचरण करत असतो. देखल्या देवा दंडवत करत असतो. ही संपूर्ण चराचरसृष्टी त्या भगवंतांनीच निर्माण केलेली आहे. याला संत सांगतात, "भरला घनदाट हरी दिसे". प्रत्येक जीवांमध्ये प्रत्येक सजीव निर्जीवांमध्ये प्रत्येक द्वेत अद्वेतामध्ये जर तो भगवंत भरलेला असेल तर आपली त्याला पाहण्याची दृष्टी सुद्धा तेवढेच व्यापक असायला हवी. जोपर्यंत हा पामर जीव व्यापक दृष्टीने भगवंताकडे जात नाही तोपर्यंत जीवभाव नाहीसा होऊ शकत नाही. आणि ह्या जीवाला उपाधीला अहंकाराला जेवढं अधिक महत्त्व देऊ तेवढे मानवाच्या जीवनामध्ये अधिक दुःख पेरले जात असतं. म्हणून संत म्हणतात जैसे कर्म केले तसे फळासी आले उपजले मेले ऐसे किती।। आपण जीवन जगत असताना प्रत्येक गोष्ट विचाराने करायला हवी. माझ्या आचार विचाराने, मी जे काही पेरणार आहे त्यातच फलित म्हणून ते उगवणार आहे. मग मी आचरण करत असताना जर संतांच्या विचाराचा विचार होत असेल, संतांच्या सांगण्याप्रमाणे माझा आचरण होत असेल तर मात्र माणूस स्वर्ग सुखामध्ये जीवन जगत असेल. स्वर्ग सुख म्हणजे स्व मध्ये कर्क असेल आणि जेव्हा स्व पासून तो बाजूला होतो विषयांमध्ये अडकतो तेव्हा तो भगवंताच्या मंदिरात बसलेला असताना सुद्धा नरक यातना भोगतो. आपण जेवढा विषयांमध्ये अधिकाधिक रममान होऊ तेवढा आपण सुखापासून लांब जाऊ. यालाच माऊली सांगतात, **पाहे पा दूध पवित्र आणि गोड | पाशी त्वचेचीया पदरा आड | ते अव्हेरुनी गोचीड न सेवती काय ||** दूध आणि रक्त याच्यामध्ये फक्त एकच पडदा असतो. परंतु गोचीड दूध सेवन न करता रक्ताच सेवन करत असतो अगदी तद्वतच मानव सुद्धा शुद्ध तत्त्वज्ञान न घेता विषयांच्या मागे लागतो. विषय गोड वाटायला लागतात आणि स्वतः स्वतःच दुःख ओढवून घेत असतो. याला संत म्हणतात, विषय विषयाचा पडे पाडू | गोड परमार्थ लागे कडू || जसा प्रत्येक जीव पंढरपूरमध्ये दाखल होतो तेव्हा एका स्त्रीला जसं माहेरी आल्यानंतर जो आनंदाचा अनमोल ठेवा मिळतो, अगदी त्याचप्रमाणे प्रत्येक जीव हा भगवंताच्या दारामध्ये शांत होत असतो,. यालाच संत तुकाराम महाराज असे म्हणतात ,आपल्या माहेरा जाईन मी आता **| निरोप या संता हाती आला || सुखदुःख माझे आईकले कानी | कळवळा मनी करुणेचा || करुनी सिद्ध मूळ साउले भातुके | येती दिसे एके न्यावयासी ||त्याची पंथी माझे लागलेचे चित्त |वाट पाहे नित्य माहेराची | तुका म्हणे आता येतील न्यावया |अंगे आपल्या मायबाप ||**
संत भगवंत हे उदार कृपाळू दयाळू मायाळू आहेत भगवंताची मान्यता आहे. म्हणून आपण जीवन जगत आहोत आपल्या मान्यतेमुळे भगवंत नाही हे जेव्हा आपल्या लक्षात येईल त्यावेळी आपला प्रत्येक क्षण क्षण हा आनंद सोहळा असेल. हा जीव आनंदाचा सागरामध्ये नाहून निघत असेल. कारण देह तर हा जड आहे मूड आहे देहाच्या संबंधाने आकार विकार प्रकार आहे संबंध आहे संग्रह आहे. त्यामुळे उपाधी मध्ये मग्न न होता आपण भगवंताला समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संपूर्ण चराचरसृष्टीमध्ये त्या एका भगवंताचे सत्ता आहे. मग प्रत्येक जण कोणी संत म्हणतात, कोणी भगवंत म्हणतात ,कोणी निसर्ग म्हणतात ,कोणी काही कैवल्य म्हणतात, उपाधीने अनेक नावे दिली तरी तो भगवंत मात्र एकच आहे. जसं आईला कुणी आई म्हणतात ,आई म्हणतात, बाई म्हणत, काकी म्हणत, परंतु आई मात्र प्रेम तेवढेच करत असते. आपण काय हाक मारतो ,काय म्हणून समजतो याला महत्त्व नाही तर आपण कोणता भाव ठेवून आवाज येतो आपल्या मनामध्ये किती श्रद्धा आहे यावरून आपल्याला भगवंताचे प्रेम ठरतं. मग संतही सांगतात, "एक प्रेम भाव चाहिये दुजा कष्ट अपार" प्रेमासाठी सगळा अट्टाहास केलेला असतो. आणि तेच जर मिळत नसेल याचा अर्थ आपले रीत चुकलेले आहे. म्हणून संत सांगतात आपल्याला जर परमार्थ करायचा असेल तर तो परमार्थ रितीचा आहे. रीतीने केलं तर सर्व सुख सोयी आहेच आहे. रिटब चुकली तर मात्र पुन्हा आपल्याला उभारी घेता येत नाही. मनाला स्थिरता प्राप्त होत नाही. मन स्थिर होण्यासाठी आपण रीतीने जाणं अगदी आवश्यक आहे. म्हणून संत सांगतात परमार्थ हा रितीचा आहे. जसं दुधामध्ये तूप आहेच आहे फक्त रीत चुकली तर दुधातून तूप कधीच निघू शकत नाही. रीत जर बरोबर असेल तर दुधामधून शुद्ध तूप निघाल्याशिवाय राहणार नाही. पण त्या ठिकाणी आपण सावध असलं पाहिजे. स्वहितासाठी जागत असायला पाहिजे. आपल्या जीवाचा उद्धार होण्यासाठी आपण प्रयत्न करायला पाहिजे. त्यासाठी गुरुकृपा शास्त्र कृपा अंतकरण कृपा स्पर्श कृपा ही असायलाच हवी म्हणून संत आणि भगवंत नाम ह्या काही वेगळ्या गोष्टी नसून तीनही गोष्टी एकच आहेत. फक्त आपल्या मनामध्ये शरण जाण्याचा भाव असला पाहिजे. आपण नम्र व्हायला शिकलो पाहिजे. तेव्हा तुकाराम महाराज म्हणतात **"जाणते लेकरू | माता लागे दूर धरू || तैसे न करी कृपावंते | पांडुरंग माझे माते | |नाही मुक्ता फळा |भेटी मागोती त्या || जळा तुका म्हणे लोणी |ताकसांडे निवडुनी ||**
म्हणून संत सांगतात खरी गोडी ही भगवंत नामामध्ये आहे. खरं हे साजिरे गोजिर रूप हे फक्त भगवंताचच आहे. मग त्यास भगवंताला आपण मनोभावे विनवणी केली पाहिजे. त्याला शरण गेलं पाहिजे. त्याचं रूप पाहण्यासाठी जीवाने ध्यास घ्यायला हवा.कारण संत सांगतात, छंद नाही नामाचा, देह काय कामाचा .छंद लागला टिटविला तिने समुद्र आटविला. तसा ध्यास मनाने घ्यायला हवा. आपल्याला भाव कळाला तर तो भगवंत भावतीत कसा आहे हे आपल्याला कळेल . म्हणून एकदा सगुण कळालं की निर्गुणही कळेल आणि मग सगुन आणि निर्गुण या दोन्हींना प्रकाशित करणारा तो भगवंत हा मात्र नामा निराळा आहे. सगुण म्हणजे ही तो नाही आणि निर्गुण म्हणजे हे तो नाही. हा भाव जेव्हा तयार होईल तेव्हा प्रत्येक जीव हा भगवंत स्वरूप झालेला असेल. पण त्यासाठी त्याला स्वतःच्या चर्मदृष्टीने न पाहता तत्त्वदृष्टीने चराचर व्यापक सृष्टी पाहता आले पाहिजे. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात, **सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती | रखुमाईच्या पती सोयरिया || गोड तुझे रूप गोड तुझे नाम | देई मज प्रेम सर्वकाळ || विठू माऊलीये हाचि वर देई | संचारोनी राही ह्रदया माजी || तुका म्हणे काही न मागे आणिक | तुझे पायी सुख सर्व आहे ||**



संत साहित्यातील तत्त्वज्ञान भाग -१५

# यशाला कष्ट हा एकच पर्याय



शशिकांत बारकुल
8208141958

आधुनिक केसरी

**क्षेत्र कोणतं ही असो जसं की वर्षा न वर्ष स्पर्धा परिक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांला यश मिळतं नाही.आणि त्यांच्या कानावर अशी बातमी येते पहिल्यांदाच तयारी करणारा ईथे लागला तिथे लागला .अश्या दुसऱ्याच्या बातम्या ऐकून तो व्यक्ती विद्यार्थी आपण केला संघर्ष रात्र दिवस अभ्यास आठवत बसतो कुठे कमी पडलो म्हणून नशीबास दोष देत नैराश्यात रमून जातो.**

आजचे युग हे स्पर्धेचे युग हे अनेक वर्ष जाहिरात निघत नाही निघाली तर रिक्त जागांचा अभाव. लाखो उमेदवार रिंगणात असतात त्यात पेपर फुटी सारख्या घटना घडून.त्या परीक्षा वर आक्षेप घेतं सदर परीक्षा वर स्टे येतो आणि निकाल लांबणीवर पडतो. या सगळ्यांत वाढतं वय नातेवाईक यांचे टोमणे अशा विद्यार्थ्यांना मिळतं असतात. या सगळ्या चक्रव्यूहात तो विद्यार्थी दिवस काढत असतो .मन लावून त्याने केलेला अभ्यास केलेली तयारी याचा कुठेतरी फायदा झाला नाही असे त्याला वाटतं राहते. शेजारील परिसरातला आप्तेष्ट नातेवाईक मधील एखादा कमी वयाचा विद्यार्थी लागतो आणि त्याच्या यशाची सगळीकडे चर्चा होते. वर्षा न वर्ष अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणी समजून घेत नाही.या सगळ्या नैराश्यात तो विद्यार्थी प्रसंगी आत्महत्येचा प्रयत्न करतो. अशा घटना घडल्या सुद्धा आहेत माय बापाचा एक सहारा असणारा तो विद्यार्थी, मुलाने अपयश आणि नैराश्य मध्ये आपले जीवन संपवले आहे. पण क्षेत्र कोणतं ही असो हजार वेळा अपयश आले तरी निराश होऊ नका. स्वतःवर विश्वास ठेवा.प्रयत्नांची पराकाष्ठा चालूच ठेवा एक नाही हजार वेळा जरी पराभव स्वीकारावा लागला तरी हार माणू नका यश .तुमचा आजचा संघर्ष हे तुमच्या उद्याच्या यशाचे अस्तित्व आहे .ज्याला यश मिळतं तो नशीबवान नसतो फक्त मागे पुढे होऊन एखाद्या कमी वयांत लवकर यश संपादन करतो .पण निराश न होता जिद्दीने संयमाने प्रयत्न करत राहा .उशीराने मिळालेले आपल्यावर जगाचं लक्ष वेधून घेतं असतो .पेरलेले कधीचं वाया जातं नाही तुमची तयारी कष्ट कधीचं वाया जात नाही.म्हणून नैराश्यात येऊन कधीचं आत्महत्येचा प्रयत्न करू नका. आई, वडिलांनी काबाडकष्ट करून आपल्याला शिक्षण दिलेलं असतं या जगात अनेक उद्योग धंदे, व्यवसाय, अनेक चांगले मार्ग आहेत आपण ते करुन एक चांगल्या प्रकारचे जीवन जगू शकतो. आत्महत्या करणे हा शेवटचा पर्याय नाही. चांगल्या लोकांच्या संपर्कात राहा, चांगले विचार ठेवा चांगली पुस्तके वाचा संघर्षातून कोणी ही सुटला नाही. त्यामुळे स्वतःला कधीचं कमी समजू नका प्रामाणिकपणे कष्ट करतं राहा .आजचा संघर्ष उद्या यशा धिंगाणा घालतं असो त्यामुळे स्वतःवर विश्वास ठेवा.. यश कोणत्या न कोणत्या मार्गाने तुमच्या आयुष्यात येतेच फक्त प्रयत्न करायला कमी पडू नका...



# 'गंभीर' पर्वास सुरुवात

आधुनिक केसरी

वेस्ट इंडिज मध्ये झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत विजय मिळवून देताच भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. वास्तविक राहुल द्रविड यांचा प्रशिक्षक पदाचा कार्यकाळ मागील वर्षीच संपला होता मात्र टी २० विश्वचषकापर्यंत त्यांना प्रशिक्षकपदी कायम ठेवण्यात आले होते. त्यांनीही देशाला विश्वविजयी करून त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवला. राहुल द्रविड यांच्या नंतर भारतीय संघाचे प्रशिक्षक कोण असतील याची चर्चा क्रिकेट वर्तुळात रंगली. अर्थात प्रशिक्षकपदासाठी गौतम गंभीर यांचेच नाव चर्चेत होते आणि अपेक्षेप्रमाणे त्यांचीच या पदासाठी निवड झाली. यावर्षी कोलकाता नाईट रायडर्स संघाने आयपीएलची विजेतेपद पटकवताच गौतम गंभीर यांच्या नावाची चर्चा प्रशिक्षकपदासाठी होऊ लागली कारण ते प्रशिक्षक असलेल्या संघांनी सलग दोन वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले. मागील वर्षी गुजरात टायटन या संघाने विजेतेपद पटकावले त्या संघाचे गौतम गंभीर हे प्रशिक्षक होते यावर्षी कोलकाता संघाने विजेतेपद पटकावले या संघाचे प्रशिक्षकही गौतम गंभीर हेच होते. गौतम गंभीर यांनी आखलेल्या रणनीती मुळेच हे संघ आयपीएलचे विजेतेपद पटकावू शकले. शिवाय ते कोलकाता संघाचे कर्णधार असताना या संघाने दोनदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले होते. या विजेतेपदात गौतम गंभीर यांचा मोलाचा वाटा होता. त्यांना जर भारतीय संघाचे प्रशिक्षक बनवले तर त्याचा भारतीय संघाला मोठा फायदा होईल असा विचार करून बीसीसीआयने त्याची भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी निवड केली. अर्थात गंभीर या पदासाठी सर्वार्थाने योग्य आहेत. वयाच्या दहाव्या वर्षापासून गौतम गंभीर यांनी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केल्याने वयाच्या २२ व्या वर्षीच त्यांची भारतीय क्रिकेट संघात निवड करण्यात आली. भारतीय संघात निवड होताच अल्पावधीतच त्यांनी सलामीचा भरवशाचा फलंदाज म्हणून नाव लौकीक मिळवला. वीरेंद्र सेहवाग सोबत त्यांची सलामीची जोडी जमली की प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या तोंडाला फेस येत असे. गौतम गंभीरने भारताला दोन विश्वचषक मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्यांनी फटकावलेल्या ९७ धावामुळेच भारत विश्वविजेता बनू शकला. विशेष म्हणजे सचिन, सेहवाग ही सलामीची जोडी स्वस्तात बाद झाल्यावर त्यांनी जी संयमी खेळी केली त्याला तोड नाही. त्यांनी कर्णधार महेंद्रसिंग धोनी सोबत केलेली भागीदारी निर्णायक ठरली. २००७ साली झालेल्या टी २० चा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही गौतम गंभीरने सर्वाधिक ७५ धावा करून भारताला विश्वविजय मिळवून दिला होता. त्यांच्या या दोन्ही खेळ्या क्रिकेट रसिकांच्या मनात कोरल्या गेल्या आहेत. २०१८ साली वयाच्या ३७ व्या वर्षी त्यांनी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. त्यांना आपली क्रिकेट कारकीर्द आणखी वाढवता आली असती परंतु नवीन खेळाडूंच्या मार्गात आपण अडथळा ठरू नये म्हणून त्यांनी निवृत्ती स्वीकारली. गौतम गंभीर हे एक संवेदनशील मनाचे गृहस्थ आहेत. केवळ क्रिकेटपटू म्हणूनच नव्हे तर व्यक्ती म्हणूनही ते महान आहेत त्यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या मुलांच्या शिक्षणाचा भार ते सांभाळीत आहेत. गोरगरिबांच्या मुलांना मोफत अन्न मिळावे यासाठी त्यांनी दिल्लीत अन्नछत्र चालू केले असून तिथे शेकडो गोरगरीब आपली भूक भागवतात.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२१५

# फडणवीसांचा नाद करायचा नाय ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**ब्राह्मण जातीचा माणुस म्हणुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राजकिय वर्तुळात टार्गेट केले जाते. कर्तृत्व आणि कार्यक्षमता कमालीची असलेला हा नेता भल्या भल्याला पुरून उरला. शरदचंद्र पवारांच्या उभ्या राजकिय आयुष्यात तोड देणारा नेता कुणी भेटला नसेल. पण फडणवीसांनी अनेकदा त्यांना हिसका दाखवत महाराष्ट्र काबुत ठेवला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर फडणवीस जादु संपली अशा प्रकारचा आविर्भाव महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणला. मी पुन्हा येईन या वाक्याचा राजकिय चमत्कारही त्यांनी घडवुन दाखवताना ते पुन्हा आलेच. पण त्यांचं येणं जातीय द्वेषाच्या आधारावर आम्हाला सहन होत नाही.**

वेगवेगळ्या सामाजिक समीकरणाच्या आडुन त्यांना जाळ्यात टाकण्याचे कामही बारामतीच्या करामती वाल्यांकडून अधुनमधुन होतं. पण तुम्ही काहीही करा जातीपेक्षा कर्तृत्व श्रेष्ठ यातुन हम भी कुछ कम नही असं म्हणत त्यांनी कालच्या विधान परिषद निवडणुकीत विरोधकांना चांगलाच हिसका दाखवला. काँग्रेस आमदार फुटले तर शरद पवारांचा उमेदवार जयंत पाटलांचा पराभव केला. यापेक्षा आणखीन काय असु शकतं? विधानसभा निवडणुक तोंडावर महायुतीची भक्कम ताकद दाखवुन देताना 2024 नंतर पुन्हा ट्रिपल इंजिन सरकार अर्थात शिंदे-फडणवीस-पवार सत्तेत येणार याचं ट्रेलर म्हणजेच कालची विधान परिषद निवडणुक. देवेंद्र फडणवीस संयमी, शांत आणि मनमिळावु नेतृत्व म्हणुन ओळखल्या जातं. 2014 नंतर पाच वर्षे मुख्यमंत्री पद त्यांनी सांभाळलं. विकासाचं व्हिजन आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आणि त्यातुन सर्वांगिण विकास, पारदर्शी कारभार आणि भ्रष्टाचारमुक्त सरकार आदी सद्गुण त्यांच्या अंगी असल्याने दमदार नेतृत्वाची प्रचिती मागच्या पंधरा वर्षापासुन जनता पहाते. तळातला कार्यकर्ता म्हणुन त्यांची विशेष ओळख. नागपुरी नगर सेवक ते महापौर पक्षात प्रदेश अध्यक्ष, विरोधी पक्षनेता आणि सत्तास्थानी. विविध भुमिका निभावत असताना महाराष्ट्र भाजप ज्यांच्या नेतृत्वाखाली यश मिळवत आलं, त्या फडणवीसांना केवळ ब्राह्मण म्हणुन सामाजिकीकरणात टिकेचे लक्ष्य केल्या जाते. या महाराष्ट्रात फडणवीसांनी समाजकल्याणाचे असे काही निर्णय घेतले की यापुर्वी कुठल्याही सरकारने घेतले नाहीत. वंचित, उपेक्षित, दीनदलित, गोरगरिब, शेतकरी, कष्टकरी यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांचे निर्णय कामी येतात. या राज्यात प्रस्थापित पुढाऱ्यांचं राजकारण संपवण्याचं कामही त्यांनी केलं. सामान्य लोकांच्या हातात सत्ता जावी यातुन काम करताना शरद पवारांनी केवळ जातीय द्वेषातुन त्यांच्यावर अनेकदा टिका केली. पेशव्याकडुन पदव्या घेण्याची



वेळ आमच्यावर आली असंही ते बोलुन गेले. पगडीचाही उल्लेख जातीय द्वेषातुन त्यांनी केला होता. एक ब्राह्मण बिचारा तो सहन होईना डोळ्याला असा सामाजिक संघर्षाला अधुनमधुन फडणवीसांना सामोरे जावे लागते. 2019 च्या निवडणुकीत तत्कालीन काळात महायुतीला जनादेश सत्ता स्थापनेसाठी जनतेने दिला होता. मात्र उद्धव ठाकरेंनी केवळ मुख्यमंत्री पदासाठी गद्दारी करत भाजपाला धोका दिला आणि सिल्वर बंगला गाठुन काँग्रेसला सोबत घेत राज्यात सत्ता स्थापन केली. आम्ही पुन्हा येणार या त्यांच्या दाव्याची शरद पवारांच्या लोकांनी खिल्ली उडवली. पण महाविकास आघाडीच्या कंबरात लाथ घालुन ठाकरेंनाही त्यांची जागा दाखवत फडणवीस पुन्हा सत्तेत आले अर्थात एक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाकरे शिवसेनेतुन 40 आमदार घेवुन बाहेर पडले आणि राज्यात शिंदे-फडणवीस सरकार 2022 ला स्थापन झालं. तसं पाहता शरद पवारांनी व्यक्तिद्वेषातुन फडणवीसांना नेहमीच टार्गेट केलं. पण मै कच्चा गुरू का चेला नही. कारण स्व.गोपीनाथराव मुंडे हे त्यांचे राजकिय गुरू. त्यांनी शरद पवारांची राष्ट्रवादीच फोडली. अजितदादा पवार 40 आमदार घेवुन बाहेर पडले आणि राज्यात ट्रिपल इंजिन सरकार सत्तेवर आहे. यासाठी वेगवेगळे डावपेच, चाणाक्ष बुद्धी, चाणक्य निती या सर्व गोष्टी त्यांच्याकडे जमाच आहेत. देशात लोकसभा निवडणुका पार पडल्या. महाराष्ट्रात भाजपाला यश मिळालं नाही. त्याचं कारण विरोधकांनी भाजपा विरोधात निर्माण केलेला नरेटिव्ह उदा.भाजपा संविधान संपविणार आणि दुसरी गोष्ट जातीपातीचा आधार. काही निर्णय लोकसभा जागा वाटपात भाजपाचेही चुकले. परिणाम केवळ 09 जागा आल्या. पण जनमतातली गुणवत्ता एखाद्या टक्याने मागे राहिली. ठाकरे गट उद्धवस्त झाला असता पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कुबड्यामुळे थोड्या फार जागा त्यांना मिळाल्या. मात्र त्यांचा राजकिय रंग भगवा राहिला नाही. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या यशानंतर ही मंडळी हुरळुन गेली. जणु काही आता देवेंद्र फडणवीस यांचं नेतृत्व संपलं. एव्हाना फडणवीस केंद्रात जाणार अशा वल्गना विरोधकांनी सुरू केल्या. खा.अमोल कोल्हेसारख्यांनी स्वतःच्या भाकरी भाजायच्या सोडून भाजपात आल्यासारखं भाकरी भाजायला चालु केल्या. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे देवेंद्र फडणवीस म्हणजे नाद करायचा नाय. काल झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत त्यांनी विरोधकांच्या दांड्या उडवल्या. शेकापाचे जयंत पाटील हे उमेदवार शरदचंद्र पवार यांच्या गटातुन होते. मात्र केवळ त्यांना बारा मते मिळाली. इथे देखील एखादं मत शरद पवारांना विचार करायला लावणारं ठरलं. महायुतीच्या जागा 09 त्यात भाजपाच्या 05 सर्वच्या सर्व जागा प्रचंड मतांनी विजयी झाल्या. 23 चा कोटा असताना 04 उमेदवारांना 26 मते मिळाली. हा चमत्कार केवळ देवेंद्र फडणवीसांच्या जादुई राजकारणाचा म्हणावा लागेल. निवडुन आलेले सदाभाऊ खोत यांना विजयाची खात्री नव्हती. मात्र निकालाआधीच फडणवीसांनी तुम्ही जिंकलेले आहात अशा प्रकारचा आशावादी शब्द त्यांना दिला होता. महायुतीच्या तिन्ही पक्षाची एकही मतं फुटले नाहीत उलट अजित पवारांनी देखील 42 आकड्यावरून 47 शी गाठली. अर्थात काँग्रेस पक्षाची 07-08 मते फुटली. ती कोण आहेत? याची चौकशी आता पक्षांतर्गत सुरू म्हणावी लागेल. सांगायचं एवढंच आहे की, महायुतीचं नेतृत्व करताना फडणवीसांनी केलेली व्युहरचना अगदी विश्वचषक सामन्यात सुर्यानं झेल घ्यावा तशीच म्हणावी लागेल. राज्यात तर्क वितर्क अनेकांनी काढले होते. संजय राऊत महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार निवडुन येण्याचा दावा करत होते. मात्र मनसुबे उधळुन फडणवीसांनी शरद पवारांसह काँग्रेसवाल्यांना त्यांची जागा दाखवुन दिली. भविष्यकाळ पाहिलं तर उद्धव ठाकरेंनाही आत्मपरीक्षण करायला लावणारा हा निकाल म्हणावा लागेल. मिलिंद नार्वेकरला मिळालेली मतं याचं श्रेय उद्धव ठाकरेंकडे जावु शकत नाही. कदाचित नार्वेकर स्वहिंमतीने विजयी झाले असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. लोकसभा निवडणुकीते अपयश आणि संभाव्य विधानसभा निवडणुक या सर्व राजकिय पार्श्वभुमीवर विधान परिषद फडणवीसांच्यासाठी आवाहन होते. मात्र महायुतीच्या सर्व नेत्यांनी एकत्रित येवुन हम भी कुछ कम नही विरोधकांना दाखवुन दिलं. काँग्रेस पक्षाच्या फुटलेल्या आमदारांना कदाचित महायुतीत प्रवेश मिळु शकतो. पण त्याहुन अधिक अजुन महाविकास आघाडीच्या राजकिय चिंधड्या निश्चित होवु शकतात. एक मात्र नक्की की देवेंद्र फडणवीसांनी आमचा नाद करायचा नाय हे विरोधकांना दाखवुन दिलं.

# देह आणि देहसंबंधे निंदावी । इतरे वंदावी श्वानशूकरे ॥




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काळाने तुकारामांना झोडपले आणि तुकोबांनी काळाला दणादण ठोकले! काळाने कुणालाच सोडले नाही. नित्य काळ प्रत्येकाचीच परीक्षा घेत असतो. जे काळाला घाबरून पळून जातात किंवा शरण जातात त्यांची काळ खिल्ली उडवत असतो. त्यांच्या शरणांगत अवस्थेकडे पाहून काळ फिदीफिदी दात विचकत असतो. त्याच्या चेहऱ्यावर विजयी अविर्भाव ओसंडून वहात असतात. दुसरीकडे जे काळाच्या मुंडक्यावर पाय रोवून त्याचा धोरोदात्तपणे सामना करतात त्यांना काळ टरकून राहतो. त्यांना घाबरतो आणि शेपूट घालून, नमस्कार करून निमुटपणे तेथून काढता पाय घेतो. आपले तुकोबा दुसऱ्या प्रकारात मोडतात.**

यामुळेच तरूण, अभ्यासक, विविध स्पर्धांची तयारी करणारे, शेतकरी, गृहिणी, नव्याने संसाराला लागलेल्या संसारीकांना तुकोबा आपले निकटतम सहचर, पथदर्शी वाटतात. त्यामुळे मित्रहो, आत्तापर्यंत आपण जर तुकोबा वाचले नसतील तर आत्ता तरी लक्ष लावून वाचा आणि मजबूत, खंबीर बना! काळाने अनेकवेळा तुकोबांना एकाकी पाडले. प्रचंड दुष्काळ, संसार कोलमडला, घरातील जिवलगांचे निधन झाले, भाऊ घर सोडून गेला इत्यादी आघात तुकोबांवर सातत्याने झाले. त्यात काही काळ तुकोबा तुटलेही असतील, परंतु तेवढ्याच प्रतिकार शक्तीने त्या त्या प्रसंगांना तोंड देवून ते पुन्हा संसारात आणि परमार्थात उफाळून बाहेर येवून खंबीरपणे उभे राहिले. काळाला पाठीमागे सारत आपला शब्द लोकमानसात रुजवतांना भोवताल सजग, सावध करत सर्वांना धीर देत राहिले. याचा परिपाक म्हणजे लोकांना तुकोबा आपले वाटायला लागले. भजन-कीर्तन करतांना निरपेक्ष भाव, प्रचंड जिव्हाळा, अस्था, लोकांच्या दुःखाप्रती असणारी प्रचंड कणव हेच तुकोबांचे खरे भांडवल! आपल्या गरीबीचे, संसारिक यातनांचे भांडवल करून तुकोबांनी कधीच भिक मागितली नाही. आपली देहू-आळंदी पंचक्रोशीसोडून तुकोबा कुठेही बोंबलत, भिक मागत कीर्तन करत फिरले नाहीत. त्यामुळे त्यांना प्रवासाला पैसा लागला नाही. कुणाचे आदरातिथ्य घ्यायची वेळ आली नाही. घरची भाकर खाऊन लोकांच्या आग्रहाखातर विनम्रपणे प्रबोधन करण्याचा त्यांचा कार्यक्रम नित्य सुरूच होता. परिणामी शेतकरी, कष्टकरी लोक त्यांना मनोमन आपला जिवलग मित्र, सहकारी मानू लागले. त्यांच्या शब्दांचा समाजात खोलवर प्रभाव जाणवू लागला. लोक सन्मार्गाला लागले. लोकांनी भांडण-तंटा, व्यसनं, षड्विकार सोडले आणि सज्जन, शांत होऊ लागले. घरघरात तुकोबांच्या कीर्तन-भजनाचा प्रभाव जाणवू लागला. ल्योक माय-बापाची काळजी घेऊ लागला. पती आपल्या पत्नीला सन्मान देऊ लागला. रयतेचे राजे छत्रपती शिवराय या अद्भुत लोक शक्तीकडे सहजच आकर्षित झाले नसते तर नवल! त्यांनी तुकोबांना आपले गुरु मानले. शिवबा कीर्तनाला बसू लागले. मावळे कीर्तन ऐकून आपल्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी सिद्ध होऊ लागले. प्राण पणाला लावण्याची ताकद लोकांमध्ये सहजच निर्माण झाली. एखादा सरळ, साधा, स्वच्छ मनाचा आणि विचारांचा माणूसच खऱ्या अर्थाने समाजात मुलगामी क्रांती घडवून आणू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सतराव्या शतकातील थोर समाजसुधारक संत तुकाराम!

यामुळे तुकोबांना मी तुमच्या संगतीने नित्य सोबत घेऊन फिरतोय, त्यांना बोलत बोलत त्यांच्यावर लिहितोय, नव्हे नव्हे, स्वतः तुकोबाराय माझ्याकडून हे सर्व लिहून घेताहेत! माय-बाबा-दादा-गुरु-साहेब यांच्याबरोबरीने तुकोबांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. एखाद्या व्यक्तीकडे सर्व संसाधने आहेत, परंतु त्याचा विनियोग कसा करावा? याचे त्याला ज्ञान नसेल तर ती सर्व संसाधने कुचकामी ठरतात; तसे आपल्याकडे शिक्षण आहे, लिहिता येते, सर्व कळते परंतु वळत नसेल तर त्या शिक्षण-ज्ञानाचा काय उपयोग? त्यासाठी तुकोबा मला नित्य प्रवृत्त करतात. माझ्या संगतीने सतत माझी पाठराखण करतात. मला धीर देतात. कधी निराश झालो तर माझ्या खांद्यावर हात टाकून मला लढायला बळ देतात! आणि मग मी पुन्हा लिहायला-बोलायला उभा राहतो. तयार होतो. मस्तपैकी हसत-खेळत संसाराचे सर्व दुःखे, चढ-उतार हृदयाच्या एका कप्प्यात बंदिस्त करून पुन्हा लिहित राहतो, बोलत, चालत राहतो. यामुळे मी यांच्या ऋणातून कधीच उत्तराई होऊ शकत नाही. परिणामी आपला कृतज्ञ भाव तुकाराम नीतीच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा माझा हा मोडका-तोडका प्रयत्न चालूच आहे. याला वाचकही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत आहेत, ही मोठी आनंदाची बाब!




**माय-बाप वाचकहो, तुकोबा आपला एकेक खडतर अनुभव आपल्या अभंगातून मांडत आहेत. तुकोबांचे**

**देह आणि देहसंबंधे निंदावी । इतरे वंदावी श्वानशूकरे ॥१॥ येणे नावे जाला मी माझ्याचा झाडा । मोह नावे खोडा गर्भवास ॥धृ॥ गृह आणि वित्त स्वदेहा विटावे । इतरा भेटावे श्वापदाझाडा ॥२॥ तुका म्हणे मी हे माझे न यो वाचे । येणे नावे साचे साधुजन ॥३॥ (१२९३)**

हे असे अभंग अनुभव किती मोलाचे आहेत? जरा वाचा ना हा अभंग! किती हा समता भाव? किती हा महान विचार? आपल्याकडे माझ्यासारखे अनेक विद्वान आणि मोठमोठ्या डिग्रीचे धांडोळे घेऊन फिरणाऱ्यांचा अजून वर्ण, जात आणि संपत्तीचा अहं गेलाच नाही! यापेक्षा शिक्षणाचे दुर्दैव ते काय? ज्ञान असून अज्ञान! तुकोबांनी देह आणि त्या संबंधाने सर्व उपाध्या झिडकारून टाकल्या. एखादा कुत्रा किंवा घाणीत भरलेलं डुक्कर आणि नीटनेटके कपडे परिधान केलेला माणूस यात कोणताच भेद तुकोबाराय मानत नाहीत. हे सगळे पाहून मी माझ्यातील मी पणाला झिडकारून दिले. मी ला वगळून मी जगायला सुरुवात केली आहे. तुकोबाराय हळूहळू वानप्रस्थाकडे जाताहेत. किती सोप्पं आणि तेवढंच अवघड! घर, संपत्ती आणि शरीर हे पण नकोसं व्हावं. त्यापासून फारकत घ्यायला हवी. हे सर्व सोडून बाहेर निसर्गाच्या सानिध्यात जावे. आपल्या षड्विकारी भोवतालापेक्षा बाहेर निखळ निसर्ग दोन्ही हातांनी आनंदाची उधळण करतोय. कोकीळ, मोर सुमधुर गाताहेत. झाडाझाडातून थंड-मंद झुळूक वाहतांना झाडे आपल्याला साद घालताहेत. त्यांच्याकडे जात, धर्म, ज्ञान, शिक्षण, श्रेष्ठ, कनिष्ठ, आपला, परका, भाऊ बंद इत्यादी कोणताही संकुचित भाव नाही. त्यांना तोडायला आलेल्यांनासुद्धा ते आपल्या सावलीत बसून निवांत जेवू आणि झोपू देतात. त्यांना सावली देतात आणि शेवटी जाळायला सुद्धा तेच कामी येतात. तुकोबाराय लोकांतातून एकांतात, निसर्गाच्या सानिध्यात रममाण होतात. त्यांना माणसांना बोलण्यात रस राहिला नव्हता. वृक्ष, वेली, पक्षी, फुलं, गायी, जंगलातील प्राणी त्यांना आपले सगे सोयरे आणि सज्जन सन्मित्र वाटू लागतात. यात आजही काही बदल झालेला नाही. आज पोटच्या लेकराला माय-बाप मारताहेत, पोटचे लेकरू माय-बापाचा जीव घेत आहे! सख्खा भाऊ भावाचा वैरी झालाय! बहिणीने साडी चोळीसाठी भावाला कोर्टात खेचले आहे. सगळं काही भयंकर आहे! यापेक्षा झाडं, प्राणी कितीही बरे! ते काहीच परत मागत नाहीत. त्यांच्या सानिध्यात वेळ घालवतांना तुकोबा सुखावतात. यामुळे त्यांना कित्येक दिवस डोंगरावरून गावात यायला नकोसे झाले. स्वतः अनुभव घेतल्यानंतर लिहितांना तुकोबांचे लेखन आपल्या मनाची भाषा बोलते. आज सुद्धा तुकोबांचा एकेक शब्द आपल्या जीवनाला तंतोतंत जुळतो आहे. तेंव्हा काय आणि आज काय? माणूस एकच आहे. दिवसेंदिवस तो माणूस कमी आणि अमानुष जास्त होत चाललाय! त्यासाठी प्रत्येकाला तुकोबांच्या गाथा औषधाची नितांत गरज आहे. तुकोबांच्या अभंगांचे आणखी एक महत्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे ते आपल्या अभंगाचा शेवट मोठा प्रभावकारी करतात. शेवटची ओळ ही संपूर्ण अभंगच काय अगदी मानवी जीवनाचे सारतत्व सांगून जाते. आजच्या अभंगातही तुकोबाराय स्वतत्वाचा पूर्णतः त्याग करून परतत्व स्पर्श करतात. माझं, मी वगैरे माझ्या तोंडाला येवू नये, असा विचार जो करतो तोच खरा साधू! साधू म्हणजे ज्याने आपल्यातील षड्विकार धुवून तो निरहंकारी, निर्वैर, निश्चल, निवांत बसला आहे तो साधू. संसारात सुद्धा बरीच माणसं अशी आढळून येतील त्यांच्याकडे, समोर सर्वकाही असतांना त्यांना त्याचे काहीच वाटत नाही. निरपेक्षता पूर्णतः अंगात भिनलेली असते. झेन तत्वज्ञान हेच प्रतिपादन करते. सर्वकाही असतांना स्वतःला शून्य समजणे ही फार मोठी अवस्था! त्या अवस्थेला जाऊन तुकोबाराय जगतात, लिहितात आणि बोलतात सुद्धा! प्रिय वाचक माय-बापहो, आपल्याला या अवस्थेला जरी जाता आले नाही तरी आपण या मार्गाने जाण्यासाठी आपल्यात निरपेक्षता, स्थितप्रज्ञता, निर्मोह, संयम, शांती, समाधान इत्यादी मुलभूत गुण अंगी बानावे लागतील. यासाठी आपल्याला महान लोकांच्या आचार-विचार संगतीत काळ व्यतीत करावा लागेल. त्यांची अनमोल संगती आपल्यासारख्या पामर जीवांना आपल्या उंचीवर घेऊन जाईल. असे झाले म्हणजे समाधानाने जगण्याचा आणि अनंताचा प्रवास सुकर आणि सुखकर होईल. शेवटी डोळे मिटतांना मनात कोणतेही किंतु-परंतु नाहीत, कुठलीही अभिलाषा नाही, निरपेक्षतेने गुडबाय, मन-शरीर आनंदाने ओतप्रोत असले की; कायमचे डोळे मिटायला आपण आनंदाने तयार असू! असो, चला तुकोबाराय संगतीला घेऊन खडतर असलेला संसार सुखकर करत जातांना मनोमन एकमेकांप्रती कृतज्ञ भाव जागृत ठेवूया! असे होणे म्हणजे वर्तमान आनंदी होणे होय! जय तुकोबाराय!



# तरुणांनी व्यवसायातून प्रगती साधावी

आधुनिक केसरी

आजची तरुण पिढी पदवी आणि पदवीधर शिक्षणानंतर लगेच नोकरीच्या मागे धावताना दिसत आहे. यामध्ये सर्वांनाच यश मिळते असे नाही. त्यातून नाराज न होता तरुण पिढीने नोकरी शोधण्याच्या मागे लागून वेळ वाया न घालवता वेळेत आपल्या स्वतंत्र व्यवसायला प्राधान्य द्यावे आणि स्वयं व्यवसायातून प्रगती साधावी. कोणत्याही व्यवसायाची निवड करताना योग्य पद्धतीने आणि विचारपूर्वक करणे गरजेचे असते. त्या व्यवसाया बाबत आपल्याला नेमकी काय माहिती आहे किंवा त्या व्यवसायाचे योग्य प्रशिक्षण आपण घेतले आहे का याचाही विचार तरुणाने करावा. व्यवसाय सुरू केला तर आपल्याबरोबर इतरांचीही प्रगती साधता येईल. तरुणांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करताना आई विचार प्राधान्याने करणे गरजेचे आहे की नोकरीमध्ये द्यावे लागणारा वेळ जर आपण आपल्या स्वतंत्र व्यवसायात दिला तर त्यामध्ये आपल्याला जास्त वेळही देत आहे व त्यातून मिळणारे उत्पन्न हे नक्कीच जास्त मिळू शकेल. जर तरुण पिढीने नोकरीच्या मागे न लागता योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन स्वतंत्रपणे व्यवसाय उभे केले तर त्यांना आपल्याबरोबर इतरांची प्रगती तर साधता येईल शिवाय नोकरीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न मिळेल आणि त्यातून स्वसमाधानी ही मिळेल त्यातून दुसऱ्यासाठी ही रोजगार निर्मिती करून देता येईल असे झाले तर आपल्याबरोबर इतरांनाही रोजगार मिळाल्याने आपल्या हातून सामाजिक बांधिलकी जपली जाईल त्याचबरोबर समाजाला एक प्रकारे मानसन्मान वाढीस लागेल. यातूनच समाजसेवेच्या माध्यमातून आपल्या माणसासाठी नवनिर्मितीचा ध्यास घेता येईल व त्याबरोबर तरुण पिढीकडून समाज उभारणीसाठी हातभार लागेल आणि त्यातून देशाची प्रगती साधता येईल. प्रत्येकाने नोकरीच्या मागे न लागता तरुणाने नवीन व्यवसाय सुरू करून त्यामध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

सुनील पुजारी सोलापूर
99 230 26 230

# अहंकार...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 57

'अहंकाराचा वारा न लागो माझी या राजसा' अहंकाराचा वारा सुद्धा माझ्या लेकराला लागू नये याची काळजी आई घेत असते. "मी"पणा माणसाला माणसापासून दूर नेतो. खूप कष्टाने यशाच्या शिखरावर पोहोचावं आणि अहंकाराचा वारा डोक्यात जावा. परिणाम काय होणार..?कितीही बुद्धिवान असा, श्रीमंत असा अहंकार असेल तर बुद्धी आणि श्रीमंतीला काहीच अर्थ राहत नाही. असा अहंकार असेल तर प्रेमळ माणसं आपल्या सावली जवळ सुद्धा येत नाही. आपण दिसल्यावर आपल्याशी बोलणं टाळतात. आपल्याला पाहून रस्ता बदलतात. का? तर तुमचा अहंकार... अहंकार का होतो कळत नाही. श्रीमंतीचा अहंकार फार लवकर होतो .ती श्रीमंती कधी आणि कोणत्या रूपात दगा देईल ते कळणार सुद्धा नाही .मग मुंगीच्या मदतीची सुद्धा गरज पडू शकते. हे लक्षात येऊन सुद्धा काही उपयोग होणार नाही. वेळ निघून गेलेली असेल.अहंकारी माणसाजवळ यायला लोक घाबरतात, कारण त्याच्या जिभेवर साखर कधी नसतेच. पण कडू कारलं कायम असतं .पैशाने तो सारं जग विकत घेऊ शकतो ही त्याची भाषा असते. पण पैशाने सारंच विकत नाही मिळत .भाकरी मिळते भूक नाही मिळत औषध मिळते झोप नाही मिळत.माणसं मिळतात नाती नाही मिळत. सुख मिळेल प्रेम नाही मिळत. माणूस म्हणजे भगवंताची निर्मिती आहे .त्यांना जसं निर्माण केलं तसं तो नष्टही करू शकतो. केव्हाही.. मग हा अहंकार का कशासाठी..? माडीची झोपडी, झोपडीची माडी हे चक्र समान चालू राहते तेव्हा श्रीमंती आली तर माजू नये, गरिबी आली तर लाजू नये. जसं आहे तसं साधं जीवन जगावं. कोणाच्या डोळ्यात खूपेल असं वागणं नसावं. अहंकार नसावा. मी केलं..मी केलं.. माझ्यामुळे झालं...कशाला हा "मी"पणा ..? चार गाड्या ,पाच बंगले, शेतीवाडी, नोकर चाकर, करोडोची श्रीमंती.आणि सकाळी कुत्र्या मागे पळतो.याच्या हातात कुत्र्याचा पट्टा.म्हणून याला कोणी बोलत पण नाही. उलट चार हात दूर राहतात. काय कामाची तुझी करोडोची श्रीमंती.? तुझ्या घरात यायला लोक घाबरतात, तुझ्या कुत्र्याला आणि तुझ्या अहंकाराला..गरिबाच्या झोपडीत सहज कोणीही जातं .कारण तिथं अहंकार नाही. भुंकणारा कुत्रा नाही. अर्ध्या हळकुंडात पिवळे असणारे लोक अहंकाराची शाल पांघरून बसतात .डोळ्यावर अहंकाराचा चष्मा लावतात. जिभेवर अहंकाराचं कारलं असतं. नसानसात अहंकार भरलेला असतो. अहंकाराचा चष्मा उतरतो तेव्हा जगापासून तो खूप लांब आलेला असतो. एकटा अगदी एकटा...

# 'भगवद्गीता' दैनंदिन जीवन जगण्याचा एक अतुलनीय ग्रंथ


आधुनिक केसरी

**सध्याचे जग हे एक अतिशय धकाधकीच आणि त्यामुळेच ताण- तणावाच झालेला आहे. या धकाधकीच्या आणि ताण-तणावाच्या जीवनामध्ये प्रत्येक जण मला जास्तीत जास्त सुख कसे मिळेल यासाठी धडपडत असतो आणि त्यासाठी तो वाटेल ते करायला तयार असतो. किंबहुना या पृथ्वीतलावर आलेल्या प्रत्येकालाच आपल्या वाट्याला सुखी समाधानी आणि संपन्न असं जीवन यावं असं सातत्याने वाटत असतं. परंतु, आयुष्य म्हटलं की सुख आणि दुःख या दोन्ही गोष्टी सोबत येतच असतात. एका गीताच्या ओळीमध्ये असं म्हटलंच आहे की, एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे , जरतारी हे वस्त्र मानसा तुझ्या आयुष्याचे...**



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

या गाण्याच्या दोन ओळीमध्येच आयुष्याचे सर्व सार यात सांगितले आज. परंतु असे असताना सुद्धा आपण सगळेजण आपल्या वाट्याला सुख जास्तीत जास्त कसे येईल यासाठी प्रयत्न करत असतो आणि हे सुख मिळविण्यासाठी हे समाधान मिळविण्यासाठी जर या पृथ्वीतलावर एक चांगला ग्रंथ असेल तर तो ग्रंथ आहे भगवद्गीता . होय आजच्या 21 व्या शतकात सुद्धा भगवद्गीता हा आजही आयुष्याला , जीवन जगण्याला एक नवा दृष्टिकोन देणारा असा मौलिक ग्रंथ आहे असे म्हंटल्यास ते अतिशयोक्ती ठरू नये. थेट कुरुक्षेत्रामध्येच भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेला उपदेश म्हणजे भगवद्गीता हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे . परंतु या ठिकाणी अर्जुन हे एक माध्यम असून भगवंताला हे ज्ञान या पृथ्वीतलावरील सगळ्यांनाच द्यायचं होतं आणि म्हणून भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन संवाद यातून संपूर्ण जगाला जीवन जगण्यासाठी दिलेला एक मार्ग म्हणजे भगवद्गीता आहे असं म्हणता येईल . ज्याच्याशी युद्ध करावे लागणार आहेत ते सगळे माझेच लोक आहेत हे पाहून गर्भगळीत झालेल्या आणि प्रेम, वात्सल्य, माया, जिवलग लोक यांच्या मोहात अडकलेल्या अर्जुनाला धर्म आणि अधर्म यातील फरक कळावा व अधर्माच्या विरुद्ध तुला लढावे लागेल हे सांगायसाठ भगवान श्रीकृष्ण यांनी हा उपदेश केलेला आहे अर्जुनाला. या भगवद्गीतेमध्ये एकूण 700 श्लोक आहेत. यापैकी श्रीकृष्णांनी 574 श्लोक सांगितले असून अर्जुनाने यात 84 श्लोक बोलले आहेत . या भगवद्गीतेची सुरुवात धृतराष्ट्राने म्हंटलेल्या एकाच श्लोकाने झालेली आहे .संपूर्ण भगवद्गीतेमध्ये धृतराष्ट्राने केवळ एक श्लोक म्हटलेला आहे . आणि या भगवद्गीतेमध्ये धृतराष्ट्राला संजयने 41 श्लोकांच्या माध्यमातून जी माहिती दिली त्याचाही उल्लेख आलेला आहे . भगवद्गीतेच्या माध्यमातून अर्जुनाने श्रीकृष्ण ला तब्बल 41 प्रश्न विचारलेले आहेत . मोहमायाने गळीत झालेला अर्जुन आपल्याच सगे सोयरे , नातेवाईक , गुरुवर्य यांच्याविरुद्ध कस लढायचं हा प्रश्न घेऊन श्रीकृष्णा समोर गर्भगळीत अवस्थेत उभा असतो. हतबल झालेल्या अर्जुनाला अर्जुनाच्या म्हणण्यानुसार भगवान श्रीकृष्ण त्यांचा रथ दोन्ही सैन्याच्या मध्ये नेऊन उभे करतात. वास्तविक पाहता अर्जुनाने श्रीकृष्णाला असे म्हटले होते की माझा रथ दोन्ही सैन्याच्यामध्ये घेऊन चला आणि भगवान श्रीकृष्णाने मात्र दोन्ही सैन्यांच्या मध्ये हा रथ नेत असताना हा रथ ज्या ठिकाणी उभा केला हे ठिकाण अत्यंत महत्त्वाच आहे . आणि ते ठिकाण होतं भीष्म पितामह, द्रोणाचार्य, कृपाचार्य यांच्या अगदी समोर हा रथ उभा झाला आणि इथेच श्रीकृष्णाच्या चातुर्याची आपल्या सगळ्यांना कल्पना येते. अर्जुनाला लढायचा आहे ते नेमकं कोणाच्या सोबत त्याची जाणीव त्याला व्हावी आणि ते का लढायचं आहे याबद्दलही त्याला जाणीव व्हावी , हे सगळे वीर सुपुत्र आज अधर्माच्या बाजूने उभे आहेत हे अर्जुनाला कळावे म्हणून भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाचा हा रथ थेट कुरुक्षेत्रामध्ये दोन्ही सैन्याच्या मध्ये परंतु अर्जुनाच्या सगळ्यात जवळ असलेल्या लोकांच्या समोर अर्थात भीष्म पितामह , द्रोणाचार्य आणि कृपाचार्य यांच्यासमोर उभा केलेला होता .





वास्तविक पाहता आज आपण सुद्धा दैनंदिन आयुष्यामध्ये जगत असताना आयुष्याच्या या कुरुक्षेत्रामध्येच लढतो आहोत आणि आपली लढाई सुद्धा आज आपल्याच जवळच्या लोकांसोबतच आहे म्हणूनच आपल्याला सुद्धा आज याच भगवद्गीतेची नितांत गरज आहे . याचं कारण असं की भगवद्गीतेची सुरुवातच जी धृतराष्ट्राच्या श्लोकाने झालेली आहे त्यातला पहिला शब्द आहे धर्मक्षेत्र . आणि म्हणूनच तुम्ही ज्या ज्या ठिकाणी आहात , तुम्ही ज्या ज्या क्षेत्रात काम करत आहात त्या सर्व क्षेत्रांमध्ये कार्यरत असताना तुम्ही तुमच्या धर्माचं पालन हे केलंच पाहिजे हेच जणू काही श्रीकृष्णाने अर्जुनाच्या माध्यमातून आपल्या सगळ्याला सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे . वास्तविक पाहता कर्मयोग आणि ज्ञानयोग हे दोन्ही योग मोक्ष प्राप्तिकडे जातात परंतु त्यातही श्रीकृष्णांनी मात्र अर्जुनाला कर्मयोगावर जास्त लक्ष केंद्रित करायला सांगितलेला आहे . आणि म्हणूनच आपल्याला सुद्धा दैनंदिन जीवनामध्ये जगत असताना आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रामध्ये आपण आपल्या कर्मयोगाला महत्त्व देतो का ? हे पाहणं आज अत्यंत गरजेचे झालेलं आहे.

आज जगाच्या कानाकोपर्यामध्ये सर्वत्रच युद्धाचे काळे ढग पसरलेले आहेत . एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणी आता इराण इराक असो , इजराइल असो गाझापट्टी असो किंवा अफगाणिस्तान असो या सर्व क्षेत्रांमध्ये आपण पाहतो आहे की युद्धाचा भडका उडालेला आहे आणि भारत भूमी ही भूमी नेहमीच विश्वबंधुत्वाची कल्पना घेऊनच पुढे आलेले भूमी आहे . स्वामी विवेकानंद यांनी सुद्धा शिकागो येथे झालेल्या सर्व धर्म परिषदेमध्ये केलेल्या भाषणाची सुरुवात सिस्टर्स अँड ब्रदर्स असं म्हणत केलेली आहे . मातृशक्तीला सर्वप्रथम वंदन करतच त्यांनी त्यांच्या भाषणाला सुरुवात केली आणि त्यांच्या अवघ्या दोन शब्दांमध्ये त्यांनी अवघ्या विश्वाला विश्वबंधुत्वाची जाणीव करून दिली. ही शिकवण स्वामी विवेकानंदांनी आपल्याला दिलेली आहे . तीच शिकवण घेऊन आज आपण ज्या ज्या क्षेत्रात कार्य करत आहोत त्या क्षेत्रामध्ये भगवद्गीतेमध्ये सांगितलेल्या कर्मयोगाप्रमाणे आपण कार्यरत आहोत का? याचा विचार तुम्हा आम्हा सगळ्यांना करावयाचा आहे.

कौटुंबिक पातळीवर सुध्दा दैनंदिन जीवन जगत असतांना आज घराघरात सुरू असलेलं महाभारत आणि त्यातून उध्वस्त होत चाललेली कुटुंब व्यवस्था हे सगळं पाहिलं की आज भगवद्गीतेची शिकवण तुम्हा आम्हा सगळ्यांना का महत्वाची आहे ते नक्कीच पटेल. म्हणून आज परत एकदा घराघरात जमेल त्या वेळेला एकत्र येऊन भागवद्गीतेतील काही श्लोक, त्याच वाचन आणि त्यावर चर्चा खूप गरजेची झाली आहे असं मला वाटतं आणि म्हणूनच आजचा हा लेखनप्रपंच.

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी



# खानदेशी पारंपारीक डिकलं :

खानदेश, विदर्भातील काही खास पारंपारीक पदार्थ बरेच प्रसिद्ध आहेत. जसे डुबूक वड्या, कळणाच्या भाकरी, भरीत, पुरणाचे मांडे, शेव भाजी, बाजरीचे गुळ घालून बनवलेले गोडाचे दिवे, नागलीचे खिच्चे.. असे असंख्य छान छान पदार्थ बदलीच्या निमित्ताने आम्ही जळगाव जिल्ह्यातील पाचोरा गावात राहिलो होतो तेंव्हा खायला, शिकायला मिळाल्या. तिकडे भरीत पार्ट्या, डाळ बाटी पार्ट्या आणि आमरसाच्या दिवसात पुराणाचे मांडे जे खापरावर. माठ पालथा घालून त्यावर मोठ्ठे मोठ्ठे आणि अतिशय पातळ असे इतक्या कौशल्याने बनवलेले असतात की तोंडात जाताच विरघळतात त्याच्या सोबत पातळ, आंबटगोड आमरस यांची पार्टी या तर खूपच प्रसिद्ध आहेत. आधी वाटले होते हे काय कॉम्बिनेशन आहे. आमरस आणि पुरणपोळीचे.. कारण आपल्याकडे जास्त घट्ट आमरस आणि भरपूर पुरण भरलेली पोळी बनवतो ना..तिथे अशी बनवलेली खाल्ली आणि मग समजले किती सुरेख लागते ते. असाच अजून एक पारंपारीक पदार्थ आज आपण बनवू या. मलाही पाहून तो खूपच इंटरेस्टिंग वाटला होता. म्हणून खास बनवून पाहिला आणि खूप आवडला मलाही आणि मुलांनाही. पाहायचा ना मग? **साहित्य :** 1 वाटी बारीक रवा, अर्धी वाटी दही, साधारण दीड. दोन वाट्या ज्वारीचे पीठ, 1 चमचा चिलीफ्लेक्स, अर्धा चमचा मिक्सहरब्ज, चिमूटभर हिंग, चवीनुसार मीठ, तेल, हळद, चमचे हरभऱ्याची डाळ, तेल.

**कृती :** प्रथम एका बाऊल मध्ये रवा घेऊन त्यात दही घालावे . लागेल तसे पाणी घालून व्यवस्थीत मिक्स करून घट्ट झाकून थोडेसे ऊबदार जागेत ठेवावे किंवा जाड कापड लपेटावे. 7-8 तास तरी हे असे ठेवावे म्हणजे छान मुरेल. सकाळी नाश्त्याला बनवायचे असतील तर रात्रीच तयारी करावीब. हरभऱ्याची डाळ सुद्धा भिजवावी म्हणजे छान भिजते. सकाळी हे बाहेर काढून झाकण घ्यावेत. व्यवस्थित फेटावे. मग त्यात 2 चमचे तेल, मिक्स हर्बज्, चिलीफ्लेक्स, हिंग, हरभऱ्याची भिजलेली डाळ, हळद, चवीनुसार मिठ घालून सर्व छान एकत्र मिक्स करावे. मग ज्वारीचे पीठ घालून छान गोळा बनवावा. तेल लावून त्याचे छोटे छोटे गोळे बनवून घ्यावेत. आता पिंपळाची लहान.. मोठी हव्या त्या साईज मध्ये पाने घेऊन प्रत्येक गोळ्याला तेल लावून त्या पानांवर जास्तीतजास्त पातळ थापावा. म्हणजेच चिकटवावा.. चिकटवण्याला काही ठिकाणी डिकवणे असे म्हणतात. बहुतेक त्यावरूनच डिकलं हे नाव पडले असावे. गॅसवर मोदकपात्रात पाणी घालून खाली रिंग ठेवून वर चाळणीत हि पिंपळपानावर थापुन बनवलेले डिकले ठेवून 7 ते 10 मिनिटे मस्त वाफवून घ्यावेत. मग बाहेर काढून अलगद हे डिकले बाजूला काढून घ्यावेत. ते वाफवले गेल्यामुळे लगेंच सुटतात. हे गरम गरम सर्व्हिंग डिश मध्ये काढून त्यावर तेल घालून शेंगादाण्याच्या चटणी सोबत खाण्यास द्यावेत.

**वैशिष्ट्य :** हे डिकलं पिंपळपानावर थापून वाफवतात. त्यामुळे त्याला अगदी पिंपळपानाचा आकार, पातळ बनवल्यामुळे अगदी त्याच्या वरच्या शिरासुद्धा स्पष्ट दिसतात. त्यामुळे हे आकर्षक दिसते आणि नावीन्यपूर्ण, तळकट नसलेली , वजन नियंत्रणात ठेवणारी अशी जरा 'हटके ' टाईप डिश आहे हरभऱ्याची डाळसुद्धा भरपूर प्रोटीनयुक्त असते व ती भिजून मस्त वाफली जाते त्यामुळे पचायला जड नसते. अगदी पिंपळपानांसारखे हिरवे बनवण्यासाठी ज्वारीच्या पिठाबरोबर मळताना पालक प्युरी घातली तर अजून छान दिसते आणि पालकाचे गुणधर्म तर सर्वांना ठाऊक आहेतच. मुलांना तेला ऐवजी वरून बटर लावून ,चीझ खिसून घालून त्यावर केचप घातला तर नक्कीच जास्त आवडेल. चोविसतास ऑक्सिजन देणाऱ्या पिंपळाच्या पानांचे अनेक फायदे आहेत. ते सर्पदंशावर, किडनीचे कार्य व्यवस्थित करण्यासाठी, अस्थमा दूर करण्यासाठी, पोटाचे विकार दूर करून पचनसंस्था सुधारण्यासाठी, त्वचेचे आजार दूर करण्यासाठी, बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी अत्यंत गुणकारी आहे. या डिश मधून असे अनेक फायदेही आपल्याला मिळतात . म्हणूनच ही सुरेख आणि गुणकारी ,पौष्टीक डिश नक्की करून पहाच!

# चंद्रपूरच्या सहाही विधानसभा काँग्रेस लढविणार

## सुभाष धोटे : महाविकास आघाडीत बिघाडी तर होणार नाही ना?

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** नुकत्याच आलेल्या लोकसभा निवडणुकीत चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रात काँग्रेस ला मिळालेल्या घवघवीत यशानंतर चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसला अच्छे दिन आले असून त्यांचे हात आता चांगलेच मजबूत झालेले आहेत. आता विधानसभा निवडणुकी मध्ये सुद्धा ताकदीने कामाला लागण्याची शक्यता दिसत असून चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष तोटे यांनी चंद्रपुरातील सहाही विधानसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये काँग्रेसचे उमेदवार उभे राहतील असे सांगून महाविकास आघाडीत एकच खळबळ उडवून दिलेली आहे. ोकसभेच्या निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वेध पक्षाच्या अनेक नेत्यांना आणि उमेदवारीचे बाशिंग बांधून असलेल्या विविध पक्षातील अनेक उमेदवारांना सुद्धा लागले असून त्या दृष्टिकोनातून महाविकास आघाडीतील विविध घटक पक्ष असलेले अनेक इच्छुक उमेदवार आता नेमकी काय भूमिका घेतील याकडे आता राजकीय पक्षांसह चांद्रपूरकरांचे लक्ष लागलेले आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेले शिवसेना (ठाकरे) गटाने विधानसभेच्या तीन जागा मागितल्या आहेत . तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या पक्षाने बल्लारपूर विधानसभा मतदार संघासह तीन जागा पक्षाकडे मागितल्या आहेत. मात्र आता काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष



जिल्ह्यात वरोरा, बल्लारशा व चंद्रपूर या तीन जागा आम्ही मागितल्या असून बल्लारशा मधून मला पक्षाने कामाला लागण्याचे आदेश दिलेले आहेत . याबाबतीत पक्ष श्रेष्ठी योग्य निर्णय घेतील आणि त्यांचा निर्णय आम्हाला मान्य राहील . पण जिल्ह्यात तीन जागा आम्हला मिळतील असा विश्वास आहे .

**संदीप गिर्हे, जिल्हा अध्यक्ष, शिवसेना ठाकरे गट**

आमदार सुभाष धोटे यांनी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षाला एकही जागा न सोडता जिल्ह्यातील सर्व सहा जागा काँग्रेस पक्ष लढणार असे सांगत प्रदेश प्रभारी यांच्याकडे सहाही जागा काँग्रेस लढणार असा आग्रह धरल्याने आघाडीत बिघडी तर होणार नाही ना अशी शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत चंद्रपूर काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे तशी मागणी केली आहे. जिल्ह्यातील सहाही जागा काँग्रेस साठी अनुकूल असून या सर्व जागा काँग्रेस लढणार असा आग्रह सुभाष धोटे यांनी केला आहे.



आम्ही आमच्या वरिष्ठ नेत्यांकडे बल्लारशा ही एक जागा मागीतिली आहे ती आम्हाला पाहिजेच शिवाय चंद्रपूर किंवा चिमूर यापैकी एक जागा अशा दोन जागा आम्ही मागितल्या आहेत . वरच्या पातळीवर योग्य निर्णय होईल असे आम्हला वाटते . इथे सगळेच पक्ष निवडणूक वाढवितात . आम्हाला एकही जागा मिळाली नाही तर आम्ही पक्ष कसा चालवायचा ? त्यामुळे आम्हाला बल्लारशा ची जागा हवीच शिवाय आणखी एक अशा दोन जागा आम्हाला मिळतील .

**राजेंद्र वैद्य, जिल्हा अध्यक्ष,** राष्ट्रवादी (शरद पवार) गट

या बेठकीला खासदार प्रतिभा धानोरकर आणि चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे प्रामुख्याने उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या मजबूत स्थितीचा अहवाल सादर केला. जिल्हात मागीलविधानसभा निवडणुकीत काँग्रेसने सहाही जागा लढविल्या होत्या आणि त्यापैकी राजुरा, ब्रम्हपुरी व वरोरा या तीन जागी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले होते . तर सध्यास्थितीत जिल्हात काँग्रेसला अतिशय अनुकूल वातावरण आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील सहाही विधानसभा क्षेत्रात काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला मतांची आघाडी मिळाली आहे. त्यामुळे काँग्रेस पक्ष जिल्ह्यात खूप जास्त मजबूत असल्याने या सहाही विधानसभा काँग्रेसनेच लढवाव्यात अशी भक्कम भुमिका धोटे यांनी मांडली. यावर सखोल चर्चा झाल्यानंतर काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने सुभाष धोटे यांच्या भुमिकेला हिरवा झेंडा दाखविला आहे अशी माहिती जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी दिली. त्यामुळे सध्या तरी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठांच्या सूचनेनुसार चंद्रपूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचेच उमेदवार निवडणूक रिंगणात उतरणार हे निश्चित झाले असून जिल्हातील या सहाही विधानसभा मतदार संघातील काँग्रेसच्या इच्छुक उमेदवार आणि काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी केले आहे. दरम्यान आमदार धोटे यांनी सहाही विधानसभा मतदार संघातील उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश दिल्याने महाविकास आघाडीतील घटक पक्ष शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे नेते कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिर्हे यांनी बल्लारपूर मधून विधानसभेची तयारी सुरू केली आहे. तर दुसरे जिल्हा प्रमुख रवींद्र शिंदे यांनी भद्रावती – वरोरा या मतदार संघात उमेदवारीवर दावा केला आहे. शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना देखील काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राजेंद्र वैद्य हे सुद्धा आपल्या पक्षाला संधी मिळावी म्हणून प्रयत्नशील आहेत . या सर्व घडामोडींमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची दाट शक्यता आहे. चंद्रपूर विधानसभा मतदार संघावर रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) यांनी सुद्धा दावा केला आहे. या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळू खोब्रागडे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. खोब्रागडे गट हा महाविकास आघाडीतील घटक आहे. येथे काँग्रेसने खोब्रागडे यांना उमेदवारी दिली नाही तर आंबेडकरांच्या मताला मानणारा मतदार नाराज होईल. व त्याचे पडसाद जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसऱ्या बाजूला नुकतेच पोलीस विभागातून सेवानिवृत्त झालेले वादग्रस्त सेवानिवृत्त पोलिस अधिकारी अंभोरे यांनी सुद्धा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस मध्ये प्रवेश घेतला. आणि आता काँग्रेस मधीलच काही नेते अंभोरे यांचे नाव उमेदवारीसाठी समोर करीत असल्याने गेल्या अनेक वर्षापासून पक्षासाठी काम करणारे, निष्ठावंत काँग्रेसी दुखावले आहेत. त्याचाही परिणाम काँग्रेस पक्षाला विधानसभेत होईल अशीही चर्चा राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. विधानसभेचे वारे वाहू लागताच काँग्रेस ने शड्डू ठोकून हम भी है मैदान मे म्हणत आगेकूच केली असली तरी महाविकास आघाडीतील इतर सहकारी पक्ष आता नेमकी काय भूमिका घेणार ? अनेकांचे आमदारकीची स्वप्न बहरणार की बंडखोरी करत आघाडीची घडी बिघडविणार ? याकडे आता चांद्रपूरकरांचे लक्ष लागले आहे.



# वादळीवाऱ्याने सौरऊर्जा पाट्यांना फटका

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील घोंसी तांडा येथे वादळीवाऱ्यासह पाऊस झाल्याने पिकासह सौरऊर्जा पाट्याला देखील फटका बसला आहे.घोंसी तांडा नं १ येथील पुंजाराम परसराम राठोड यांच्या गट नं १९ मधील सौरऊर्जा पंप पाट्याचे नुकसान झाले असून संबंधित सौरऊर्जा कंपनीने पाहणी करुन या पाट्या दुरूस्ती करून मागणी त्यांच्या कडुन केली जात आहे.

# दानशूर, सशुल्क दर्शन घेणाऱ्या साईभक्तांना लाडू पाकीट मोफत द्या : साईराज गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथील साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातून काही कोटी साईभक्त वर्षाकाठी भेट देत असतात त्यात साईभक्तां बरोबरच दानशूर सशुल्क आरती व दर्शन घेणारे साईभक्ताची सख्या देखील वाढत आहे. यात दानशूर साईभक्तांचा सत्कार देखील केला जातो मात्र या माध्यमातून कोट्यवधी रुपये दानाच्या माध्यमातून संस्थान कडे जमा होते अशावेळी तिरुपती बालाजी देवस्थानच्या धर्तीवर एका पाकीटात लाडू पाकीट देउन साईबाबा संस्थानने सन्मान करावा अशी मागणी शिर्डी येथील साई नाईन ग्रुपचे संचालक व साईबाबाच्या समकालीन भक्त लक्ष्मीबाई शिंदे यांची पणतू साईराज अरुणराव गायकवाड यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मुंबई येथे समक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली आहे.



गायकवाड यांनी सांगितले की साईभक्तांचा सन्मान करण्यासाठी शासन वचनबद्ध असून यासाठी विधी व न्याय खात्यासह साईबाबा संस्थानच्या त्रिस्तरीय समितीला सुचना करुन सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे आश्वासन देण्यात आले आहे अशी माहिती साईराज गायकवाड यांनी दिली आहे.

साईभक्तांचा सन्मान करण्यासाठी साईबाबा संस्थान कडून पास घेतानाच साई भक्तांना लाडू प्रसाद देऊन पास वितरित करावा यामुळे शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना तिरुपती देवस्थानच्या धर्तीवरच हा उपक्रम जलद गतीने सुरू केल्यास आणखी दानपेटी दानात वाढ होईल साईबाबा संस्थानला विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात दानराशी उपलब्ध होणार आहे साईबाबा संस्थान साईभक्त हितासाठी भोजन आरोग्य निवास वैद्यकीय सुविधा आदी उपक्रम राबवत असते त्यामुळे या सर्व धरतीवर या नवीन उपक्रमाची सुरुवात त्वरित सुरू करावी अशी मागणी केली असून तसे पत्र देखील साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व उपकार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांना दिले आहे. याबाबतीत साईबाबा संस्थाने देखील लगतच्या काळात सकारात्मक विचार करेल असे सांगितले आहे.

# साहेबराव घाडगे पाटील यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ७० ७० वृक्षांचे आरोपण

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** त्रिमूर्ती शैक्षणिक संस्थेचे त्रिमूर्ती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय घोगरगाव ता. नेवासा येथे संस्थेचे संस्थापक साहेबराव घाडगे पाटील यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून विद्यालयामध्ये पत्रकार बांधवांच्या हस्ते ७० वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे होते. तसेच व्यासपीठावर पत्रकार दिलीप लोखंडे, बापूसाहेब नवले , निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे जिल्हा कार्यकारणी सदस्य अर्जुन राऊत, विलास धनवटे, प्राचार्य संतोष जावळे सर, उपप्राचार्य संगीता झिंजुर्डे मॅडम, बाळासाहेब आव्हाड आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाचे जिल्हा कार्यकारणी सदस्य पत्रकार अर्जुन राऊत यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विशद करून सध्याच्या काळात वृक्षारोपण शिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. मानवाने स्वतःच्या भौतिक सुखासाठी निसर्गाचा ऱ्हास केला असून पाणी, जल, हवा सर्व दूषित व प्रदूषित होत आहे. यामुळे मानवाचे जगणे दिवसेंदिवस मुश्किल होणार असून वृक्षरोपण व व त्याचे संवर्धन हा एकच पर्याय माणसा पुढे आहे. त्याची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी. तसेच सध्याचे युद्ध हे पर्यावरण संरक्षणासाठी असून आपल्या अस्तित्वासाठी ते सर्वांना जिंकायचे आहे असे ते म्हणाले. यावेळी बापूसाहेब नवले म्हणाले की वृक्षारोपण या सुंदर उपक्रमाचे विद्यालयाने आयोजन केले असून अशा उपक्रमांची गरज असल्याचे व्यक्त केले. यावेळी पत्रकार व मान्यवरांच्या हस्ते ७० वृक्षांचे रोपण करण्यात आले. घोगरगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये अशी दर्जेदार शैक्षणिक शाखा व सर्व सोयीनुक्त वसतिगृह असल्याबद्दल तसेच शाळेचा स्वच्छ परिसर, टापटीपणा व शाळेची प्रगती व व्यवस्थापन याचे सर्व पत्रकार बांधवांनी कौतुक केले. या वृक्षारोपणाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य यांचा निसर्ग सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संतोष जावळे यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी एस. आर. काळे सर, मनेष वेताळ सर, नितीन साळवे सर, जयश्री छल्लारे, ललिता गारूळे,सविता आव्हाळे, वृषाली तुवर , वनिता नानेकर, जगताप मॅडम, कवठाले मॅडम, दिवे मॅडम, संभाजी गारुळे, कौटे सर, राम कुलभेय्या, त्रिभुवन सर, सरोदे सर, सावंत सर, अनिल पटारे, कांबळे सर, पूजा ढोकणे आदीसह शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सर्वांचे आभार अमोल बहिरट सर यांनी मानले.



# राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे असणार असून, किनारपट्टीवर बहुतांश ठिकाणी, तर घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच देशभरात २७ जुलैपर्यंत पावसाचा जोर राहणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पावसासाठी महाराष्ट्रासह देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले आहे. गुजरातच्या किनारपट्टीपासून केरळच्या किनारपट्टीपर्यंत हवेच्या कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे अरबी समुद्रातून वेगाने बाष्पयुक्त वारे किनारपट्टीच्या दिशेने येत आहे. वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे घाटमाथा ओलांडून पाऊस मध्य महाराष्ट्रापर्यंत दाखल झाला आहे. पुढील पाच दिवस किनारपट्टीवरील बहुतांश ठिकाणी, घाटमाथ्यावरील तुरळक ठिकाणी मुसळधार असणार आहे. उर्वरित भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. भारतीय हवामान विभागाने दोन आठवड्यांचा सुधारित अंदाज व्यक्त केला असून, २५ जुलैपर्यंत देशभरात चांगला पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. संपूर्ण पश्चिम किनारपट्टी, घाटमाथा, विदर्भ, ईशान्य भारत आणि मोसमी पावसाचे प्रमुख प्रभाव क्षेत्र असलेल्या मध्य भारतात चांगला पाऊस पडण्याचा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# ठेकेदाराच्या कधी-मधी चकरा : शहरात जागोजागी कचरा !

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णी शहरातील ज्या भागात वाहन जात नाही तेथे लोट गाडीने कचरा संकलन करणे गरजेचे आहे, कचरा ठेकेदाराचे कोणतीही वाहन शहरात फिरत नाही, न प च्या घंटा गाड्या कागदोपत्री दाखवून देखावा केला जात आहे. ठेकेदारास काही वाहन नगरपंचायत शेंदुर्णीने पुरवलेल्या वाहनावर न प ने जीपीएस सिस्टम सुद्धा लावलेले नाही, त्यामुळे सध्या कोणत्या शिफ्टमध्ये कोणती गाडी कुठे फिरते? हे कळत नाही. नगरपंचायत मध्ये शिपाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांचा मागच्या काळात मृत्यू झाला होता, सदर महिलेचा नगरपंचायत किंवा ठेकेदार यांनी त्यांचा विमा उतरविला नसल्याने त्यांच्या परिवारावर आज उपासमारीची वेळ आलेली आहे, याला जवाबदार कोण? आणि मृत्यू झालेल्या त्या सफाई कर्मचारी महिलेला कोणती मदत ठेकेदाराने व नगरपंचायतने केली नसल्याने संतापाचे वातावरण निर्माण झालेले आहे, मक्तेदाराने सर्व मजूर नागरीकाचा / चालकाचा विमा या ठेकेदार किंवा नगरपंचायतने उतरविला नसल्याचे समजलेआहे. नगरपंचायत व्यवस्थापनाने मक्तेदाराकडून घनकचरा व्यवस्थापना संबंधीचे अटी शर्तीचे भंग झालेला असल्यावर सुद्धा सदर मक्तेदाऱ्याकडून शेंदुर्णी शहराची कागदोपत्री कचरा संकलन करण्याचे काम मुख्याधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने शेंदुर्णी शहरात सुरू आहे,

बकचरा संकलनच्या बाबतीत संबंधित मक्तेदाराने कोणतेही मनुष्यबळ येथे पुरविलेले नाही नगरपंचायतच्या कर्मचाऱ्यांमार्फत शहरात कचरा उचलण्याचे भासविले जाते, जे कर्मचारी काम करतात त्यांना जखमेचे बँडेज ,ड्रेस कोड, सुरक्षा साहित्य, मास्क, हँडग्लोज इत्यादी साहित्य दिले जात नाही , गेल्या पाच वर्षात शेंदुर्णी शहरातील नागरिकांनी असले साहित्य सफाई कामगारांच्या शरीरावर कधी त्यांच्या सोबत बघितलेले नाही आणि कोणतेही मक्तेदाराने ते पुरविलेले नाही , जाब विचारणारे नगराध्यक्ष-नगरेवक यांचे कार्यकाळ संपल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी यांना प्रशासक नेमले आहे त्यामुळेच की काय घनकचरा ठेकेदाराकडून दररोज कारारनाम्यातील अटी शर्तीचा भंग नगरपंचायत यांच्या आशीर्वादाने होत असतो तरीही मक्तेदाराचे बिल न चुकता दर दोन-तीन महिन्यांनी अशा सुविधा न पुरविणाऱ्या मक्तेदाराचे बिल मात्र प्राधान्य क्रमाने वितरित केले जात असल्याचे समजते. या साठी शिवसेना शेंदुर्णी शहर शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार असल्याचे सांगितले..



# सोयगाव तालुक्यातील नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा : मा.सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा नुकत्याच झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात महायुती सरकारने राज्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध शासकीय योजना घोषित केल्या असून यातील अनेक योजनांची अंमलबजावणी देखील सुरू झाली आहे. या योजनांचा सिल्लोड, सोयगाव तालुक्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली असून या योजने अंतर्गत महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यामध्ये दरमहा १५०० रू. जमा होणार आहे. जास्तीत जास्त माता-भगिनींना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सावळदबारा , सोयगाव व सिल्लोड तालुक्यात शिवसेनेच्या पार्टीच्यावतीने गावा-गावात महिलांची नाव नोंदणी केली जात आहे. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेअंतर्गत सात एचपी क्षमतेपर्यंतच्या शेतीपंप धारक शेतकर्यांना मोफत वीज दिली जाणार आहे. तसेच शेतीसाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा आहे.

व्हावा यासाठी मागेल त्याला सौरऊर्जा पंप योजने अंतर्गत राज्यातील ८ लाख ५० हजार शेतकर्यांना सौरऊर्जा पंप देण्यात येणार असून राज्यासह सोयगाव व सिल्लोड तालुक्यातील असंख्य शेतकर्यांना या योजनेचा लाभ मि ळणार आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणार्या योजनांकरिता कर्जावरील हमीची मर्यादा ३० कोटी रूपयांवरून ५०० कोटी रूपये करण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणार्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या म ागासवर्ग, तसेच इतर मागासवर्ग या प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षण देण्यात येणार असून याचा शासन निर्णय सोमवारी निर्गमीत करण्यात आला असून व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने सदरील ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल सभापती धरमसिंग दारासिंग चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे आभार मानले

# शेतकऱ्यांना पीक विमा भरण्याचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील महिलांना महिन्याला पंधराशे रुपये देणाऱ्या लाडकी बहीण या योजनेची घोषणा केली आहे. गावागावात घराघरातील महिला पुरुष या योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्राची जमवा जमव करत आहेत.लाडकी बहीण योजनेच्या नादात मात्र पीक विम्याची अंतिम तारीख जवळ येत असून ही पिक विमा भरण्यास शेतकऱ्यांला विसर पडल्याच चित्र सोयगाव तालुक्यात दिसत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये विविध नवीन योजनांची घोषणा केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये मानधन दिले जाणार आहे.या योजनेचा ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्राची जमवा जमव करतांना महिला पुरुष व्यस्त दिसत आहेत.लाडकी बहीण योजनेच्या नादात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपल्या खरिपाचा पिक विमा भरण्यास विसर पडला की काय असं चित्र दिसून येत आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा विमा भरण्याची अंतिम तारीख १५ जुलै आहे.सरकारच्या वतीने शेतकऱ्यांचा एक रुपयांमध्ये पिक विमा काढला जात आहे.सोयगाव तालुक्यात ७० टक्केच शेतकऱ्यांनी अद्याप पिक विमा भरला आहे.विमा भरण्याची मुदत दोन दिवसच राहीलेली आहे.मात्र ऑनलाइन केंद्रावर शेतकरी पिक विमा भरताना दिसत नाहीत.

लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यासाठी महिलांना मार्गदर्शनाची गरज आहे. अर्ज कुठे भरायचा कसा भरायचा कागदपत्र कोणती लागणार आहेत या संभ्रमात महिला आहेत तरी अर्ज भरण्यासंदर्भात सखोल माहिती देण्यासाठी व अर्ज भरता वेळी त्यांची आर्थिक लुट होणार नाही.याची काळजी घेण्यासाठी प्रत्येक गावामध्ये महिलांसाठी सरकारच्या वतीने मदत केंद्र सुरू करण्याची गरज आहे.किवा आशा सेविका अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. सध्या खरिपाचा पिक विमा भरणे सुरू आहे प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा अर्ज सीएससी केंद्रावर भरल्या जात आहे. पिक विमा भरण्यासाठी केवळ एक रुपया लागत असला तरीही. ग्रामीण भागातील येथील सीएससी केंद्र चालक एका अर्जासाठी शेतकऱ्याकडून विमा भरुन घेत आहेत.एक अर्ज भरण्यासाठी सीएससी चालकाला कंपनीकडून ४० रुपये मिळत असून. शेतकऱ्याकडून अधिकच्या पैशाची लुट केली जात आहे.अशा सीएससी केंद्र चालकावर कारवाई करण्याची मागणी काही शेतकऱ्यांतुन होत आहे.

# टेम्पो-मोटार अपघातात चार जणांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गावरील आडगाव शिवारात शुक्रवारी रात्री टेम्पो-मोटारीची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाले. टायर फुटल्याने भरधाव टेम्पो समोरून येणाऱ्या मोटारीवर धडकला. अपघातात मोटारीचा पूर्णत चक्काचूर झाला. महामार्गावरील भगवान चक्रधर स्वामी मंदिराजवळ हा अपघात झाला. खत वाहतूक करणारा टेम्पो रात्री नाशिकहून ओझरच्या दिशेने निघाला होता. टेम्पोचे टायर फुटल्याने चालकाचा ताबा सुटला आणि टेम्पो समोरून येणाऱ्या ब्रिझा मोटारीवर आदळला. त्यात मोटारीतील रहेमान तांबोळी (४८), अरबाज तांबोळी (२१, दोघे लेखानगर, सिडको) या मामा-भाच्यासह सज्जू पठाण (४०) व अक्षय जाधव (२४, दोघे इंदिरानगर) यांचा मृत्यू झाला. टेम्पो चालक बापू अहिरे आणि सहचालक सचिन म्हस्के हे गंभीर जखमी झाले आहेत.



# कमलनयन बजाज रुग्णालयात एकाच दिवशी हृदय, यकृत प्रत्यारोपण

## नांदेडच्या ब्रेन डेड रुग्णाकडून अवयव दान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नांदेड जिल्ह्यातील एका ब्रेन डेड झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांनी घेतलेल्या अवयव दानाच्या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगरमधील एका रुग्णाला हृदय तर मुंबईहून उपचारासाठी आलेल्या रुग्णाला यकृत मिळाले. कमलनयन बजाज रुग्णालयात एकाच दिवशी या अवयवांच्या प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या.

केवळ १० टक्के हृदयाची कार्यक्षमता असलेल्या ४६ वर्षांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल पुरुष रुग्णाला हृदयाची नवी धडधड होऊन पुन्हा जगायला मिळेल असे कधी वाटले नव्हते. रुग्णाने यावेळी हृदय मिळेल या शाश्वत आशेने रुग्णालयातच राहण्याची विनंती केली. त्यांना कमलनयन बजाज रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि त्यांनी झेडटीसीसीमध्ये नोंदणी केली. मुंबईतील यकृत निकामी झालेल्या आणखी एका रुग्णाने कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये नोंदणी केली आणि ते देखील यकृत प्रत्यारोपणाची आतुरतेने वाट पाहत होते.

दरम्यान, २ जुलै २०२४ रोजी नांदेडमधील एका ब्रेन डेड रुग्णाच्या कुटुंबीयांनी अवयव दान करण्यास संमती दिल्याने अचानक आशेचा किरण निर्माण झाला. आता काळाविरुद्ध खरी शर्यत सुरू झाली. ३ जुलै रोजी पहाटे कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या डॉ. आनंद देवधर, डॉ. बालाजी आसेगावकर, डॉ. शिवाजी तौर यांच्या पथकाने हृदय आणण्यासाठी तर यकृत आणण्यासाठी मुंबईहून आलेल्या डॉ. अनुराग श्रीमल यांच्या पथकाने दिल्लीस्थित एअर ॲम्ब्युलन्समधून अवयव घेण्यासाठी उड्डाण केले. त्याचबरोबर अन्य तीन पथके या प्रक्रियेत सक्रिय सहभागी झाली होती. संपूर्ण सरकारी यंत्रणा आणि उत्तम सहकार्यामुळे पथकांनी नांदेडला पोहोचून वेळेत अवयव बाहेर काढले आणि पुन्हा कमलनयन बजाज रुग्णालयात आणण्यात आले. याच पथकाने दोन रुग्णांना हृदय आणि यकृत हे अवयव प्रत्यारोपित केले, ज्यामुळे रुग्णांना नवसंजीवनी मिळाली.

एकाच दिवशी दोन गुंतागुंतीचे अवयव प्रत्यारोपण करण्याची मराठवाडा विभागातील ही पहिलीच वेळ आहे. अवयवांच्या उपलब्धतेची वेळ अशाश्वत असते. अशा गुंतागुंतीच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी उत्कृष्ट पायाभूत सुविधा, अत्यंत समर्पित, कुशल आणि पूर्ण बांधिलकी आणि समन्वयासह एक सुजाण पथक आवश्यक असते, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला कमलनयन बजाज रुग्णालयाचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय रोटे, झेडटीसीसीचे संस्थापक डॉ. सुधीर कुलकर्णी, वरिष्ठ हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अजित भागवत, पोटविकार व यकृताशी निगडित आजार तज्ज्ञ डॉ. गौरव रत्नपारखी, शैक्षणिक, संशोधन आणि अवयव प्रत्यारोपण विभागाचे प्रभारी डॉ. मिलिंद वैष्णव, अतिव दक्षता विभागप्रमुख डॉ. विनोद गोसावी, भूलशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बालाजी आसेगावकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आजघडीला दोन्ही रुग्ण पूर्णपणे बरे झाले असून त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात येत आहे. कमलनयन बजाज रुग्णालयाच्या अत्यंत कुशल आणि समर्पित प्रत्यारोपण संस्थेचे परिपूर्णतेत रूपांतर करण्याच्या सर्व प्रयत्नांबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो, असे सीईओ जॉर्ज फर्नांडिस यांनी नमूद केले.

# शिवसेना शिंदे गट पक्ष सदस्यता नोंदणी अभियानाला मुखेड येथे प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात शिवसेना पक्षाची भक्कम बांधणी करणार असून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. तालुक्यात शिवसेना कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभारणार असून गाव तिथं शाखा आणि शाखा तिथं शाखा प्रमुख यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानद्वारे तालुक्यात आगामी निवडणुकी समोर विक्रमी सदस्य नोंदणी करणार असल्याचे शिवसेना तालुका प्रमुख बालाजी कबनुरकर यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतुन महाराष्ट्रभर शिवसेना सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. शिवसेनेचे उपनेते तथा मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जाधव, माजी. खा. हेमंत पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुखेड येथे सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी मुखेड येथे कार्यक्रमात बालाजी पाटील बोलत होते. याप्रसंगी प्रभाकर इंगळे तांदळीकर मुखेड - कंधार विधानसभा संघटक,मारोती आमनर, बालाजी कबनुरकर, सचिन रिंदकवाले, रवि गंदपवाड, विलास चौहान, शंकर जांभळीकर, जी.बी. कांबळे, सतीश डाकुरवार, संभाजी मुद्देवाड, सचिन भिसे, संजय मुद्देवाड, केशव पाटील उपस्थित होते. तालुक्यात जी.प. सर्कल निहाय सदस्य नोंदणी करण्यात येणार असून प्रत्येक गावात जावून सदस्य नोंदणी अभियान करण्यात येणार आहे. प्रत्येक शिवसैनिक यांनी अंग झोकून पक्ष बांधणीसाठी कामाला लागावे असे आवाहन कबनुरकर यांनी यावेळी सांगितले.

# नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन द्या

## फुलंब्री परिवर्तन आघाडीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शहरातील नागरिकांना मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे व शहरात अग्निशामक दलाचे वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे या मागणीचे निवेदन गुरुवार 11 जुलै रोजी निवेदनाद्वारे फुलंब्री परिवर्तन आघाडी तर्फे नगर पंचायत चे प्रशासक तथा मुख्याधिकारी ऋषीकेश भालेराव यांना देण्यात आली. सदर निवेदनाची प्रत औरंगाबाद जिल्हाधिकारी, फुलंब्री तहसिलदार, फुलंब्री पोलीस निरीक्षक यांना ही देण्यात आली आहे. तर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की फुलंब्री शहरातील नागरिकांना मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे ज्यात १) फुलंब्री शहरात जामा मस्जीद कडे जाणाऱ्या रोड चे सिमेंट रस्ता तयार करणे व नागरे गल्ली ते जामा मस्जिद च्या पायरा पर्यंत भुमिगत सिमेंट गटारी किंवा नाली



तय्यार करण्यात यावे. २) कदीर नाना नगर ते अफजल मस्जीद पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर सिमेंट कॉँक्रीटचे रोड बनविण्यात यावे. ३) शहरातील सर्व कब्रस्तान करीता संरक्षण भिंत निर्माण करणे , स्ट्रीट लाईट लावणे, आवश्यक त्या कब्रस्तान करीता सिमेंट कॉँक्रीटचे रोड बनविण्यात यावे व कब्रस्तान चे सुशोभीकरण करण्यात यावे. ४) नगर पंचायत अंतर्गत अग्निशामक दल विभागाची स्थापना करुन शहरा करिता दोन अग्निशमक दलाचे वाहन तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे. ५) पानवाडी पुल ते ईदगाह पर्यंत सिमेंट कॉँक्रीटचे रस्ता तयार करण्यात यावे. ६) हजरत सय्यद जमालशहावली दर्गा परिसरात साचत असलेल्या घान कचरा व मृत फेकलेल्या जनावरांची विल्हेवाट लावून विटंबना थांबवण्यात यावे. ७) शहरातील बंद पडलेल्या व लोकांनी अतिक्रमण केलेल्या पाण्याचे हातपंप चालू करण्यात यावे. ८) खुलताबाद ते सिल्लोड महामार्गावरील बंद पडलेले स्ट्रीट लाईट तात्काळ चालू करण्यात यावे. ९ ) अब्दुल कादर कॉलनीत गल्लीत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकावी व रस्ते दुरुस्त करावे. सदरील नागरी सुविधांची येथील नागरिकांना अत्यंत आवश्यकता असल्याने वारंवार या बाबत मागणी होत आहे म्हणून शहरातील सदरील भागात विकास काम करुन नागरीकांना मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा सदर प्रकरणी न्याय मिळवण्याकरिता फुलंब्री परिवर्तन आघाडीच्या वतीने नगर पंचायत कार्यालय समोर जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही संबंधित प्रशासनास निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या वेळी नफिस पटेल, इमरान खान, अजय गंगावणे, इस्माईल खान, अकबर शहा, वसिम पटेल, राजु बागुल, बशिरोद्दीन चिस्ती, बबलु सय्यद, जावेद खान, सरफराज पटेल, संकपाळ यांची उपस्थिती होती.




# केशव सावंत यांच्याकडून जानकापूर येथे विकासकामांची पाहणी

## गावकऱ्यांनी रस्त्याची मागणी करताच स्वखर्चातून रस्ता करण्याचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** महाराष्ट्र राज्याचे लाडके आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री धाराशिव तानाजीराव सावंत साहेब यांचे पुतणे केशव सावंत यांनी जानकापूर येथे झालेल्या विकास कामाची पाहणी केली. यामध्ये पारगाव ते जानकापूर डांबरी रस्ता, जानकापूर येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये सभा मंडप, गावांतर्गत सिमेंट रस्ता, तसेच जनकापुरते पवार वस्ती, व जानकापूर ते कोकने वस्ती रस्ता मजबुतीकरणच्या कामाची पाहणी केशव सावंत यांनी केली. यावेळी गावातील नागरिकांनी इतर वस्तीलाही रस्ते



करण्याची मागणी केली.केशव सावंत यांनी तात्काळ कुठल्याही शासकीय निधीची वाट न पाहता स्वखर्चातून रस्ता करण्यासाठी यंत्रणा दिली. त्यामुळे गावातील नागरिकांनी आभार व्यक्त केले. यावेळी केशव सावंत यांच्यासोबत शिवसेना तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, उप तालुका प्रमुख विकास तळेकर, लिंबराज वायसे, बाबासाहेब आटोळे, राजा कोळी, तानाजी कोकाटे, महेश कोकणे, बाबासाहेब आटोळे, भगवान वायसे, मेघराज बराते, शरद पवार, आदी गावातील नागरिक उपस्थित होते.

# वन्यजीव रक्षक, सर्पमित्रांना वनविभागामार्फत अधिकृत ओळखपत्र द्या

## पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्रा मध्ये असे कित्येक सारे वन्यजीवरक्षक व सर्पमित्र आहेत ते आपल्या जीवाची पर्वा न करता वन्यजीव व सर्प वाचवायचे काम करत आहेत. वन विभागाबर राहून कित्येक विषारी सर्प पकडून त्यांना जीवदान देत आहेत व वना मध्ये मुक्त करता आहेत. पण सर्प किव्हा कोणता हि वन्य जीव पकडताना त्याच्या जीवाला कोणत्याही प्रकारचा धोका झाला किंवा त्या सर्पमित्राला आपला जीव गमवावा लागला तर त्याचे कुटुं उघड्यावर पडेल त्यासाठी महाराष्ट्र वन विभागाने जीवन विमा, मेडिक्लेम, वन विभागा तर्फे अधिकृत वन्यजीव रक्षकाचे सर्पमित्राचे ओळख पत्र किमान दिले पाहिजे अशी मागणी पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुशील विभुते हे वन विभागा कडे हि मागणी लवकरच करणार आहेत आपण पाहतोय कित्येक



वर्ष सर्पमित्र अहो रात्र काम करून साप वाचवत आहेत लोकं मध्ये जाऊन साप बदल जनजागृती करीत आहे. शेती साठी आपल्याला साप किती गरजेचे आहेत हे सर्वाना सापाचे महत्व लोकांपरेन पोचवत आहेत मेडिसिन क्षेत्रात पण सापाची किती गरज आहेत हे देखील सर्पमित्र लोकांना समजून सांगत आहेत त्या मुले सापांना मारण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहेत. काही ठिकाणी सर्पमित्राची का गरज पडते तर साप अडचणीत आहेत त्याला मारता येत नाही अशा वेळी सर्पमित्राची आठवण होते पण शहरी भागात व ग्रामीण भागात अजून पण साप भीती पोटी मारले जात आहेत ग्रामीण भागात कित्येक लोकांच्या घरी पोपट वन्य प्राणी डांबून ठेवलेल्या अवस्थेत आहेत ते प्राणी व पक्षी सोडवाचे काम सर्पमित्र करीत आहे पण त्या मुले त्या सर्पमित्राची स्थानिक पातळीवर दुश्मनी वाढत आहेत त्या साठी वन विभागाने त्याला अधिकृत सर्पमित्र किव्हा वन्यजीवरक्षक चे ओळखपत्र देणे गरजेचे आहे. सर्प पकडताना अनेक सर्पमित्राना आपला जीव गमवावा लागला अशा जीवघेन्या घटना टाळण्या- साठी व सर्पमित्राना विमासंरक्षण वनविभागा मार्फत देण्यात यावे यासाठी पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुशील विभुते यांनी सर्व महाराष्ट्रातील सर्पमित्राना ओळखपत्र देण्याची मागणी सर्पमित्र संघटनेच्या वतीने करीत आहे.

# शिवशंकर पाटील यांना 'कृषी-भूषण' पुरस्कार जाहीर

## 14 जुलै रोजी कोल्हापूर येथे पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** आपल्या कार्यातून "शेतकरी नेते" म्हणून आपली नव्याने ओळख निर्माण करणारे शिवशंकर पाटील कलंबरकर यांना दै.रोखठोकने "कृषी-भूषण" पुरस्कार जाहीर केला आहे.दिनांक 14 जुलै वार रविवार रोजी पुरस्काराचे वितरण कोल्हापूर येथे होणार आहे.

शेतकऱ्यांच्या पीककर्जाचा विषय असो,पीकविम्याचा विषय असो,नुकसानभरपाईचा विषय असो की कार्यालयात त्यांची होणारी अडवणूक असो.अश्या प्रत्येक मुद्दावरून शिवशंकर पाटील यांनी निवेदन,पाठपुरावा,आंदोलन -मोर्चा काढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. शेतकऱ्यांची होणारी अडवणूक थांबवली.शेतकऱ्यांच्या



प्रश्नांसोबत मंजूर,निराधार,अपंग यांच्या प्रश्नांसाठी देखील ते सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करतात.सामान्य माणूस व गोर-गरिबांच्या हक्कासाठी प्रत्येक सामाजिक संघटनेच्या आंदोलन-मोर्चात ते सक्रिय सहभागी असतात.

विशेषतः मुखेड तालुक्यात त्यांनी कमी वेळात आपली स्वच्छ व विश्वासू ओळख निर्माण केली आहे.अन्यायग्रस्त शेतकरी व सामान्य माणूस न्यायासाठी शिवशंकर पाटलाकडे विश्वासाने जातो.या प्रश्नांसोबत ते विद्यार्थी व महिलांच्या प्रश्नावर देखील काम करतात. "सामान्य माणसांच्या हक्कासाठी काम करणारा प्रामाणिक माणूस म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे." काम करणाऱ्या माणसाला पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्थरातून अभिनंदन केले जात आहे.

# मातृभूमी, सैनिकांचा सन्मान करणे आपले कर्तव्य आहे : जाधव

## भारतीय सैन्यदलातून सेवानिवृत्त अनिल वने यांचा कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयात सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात नुकतेच भारतीय सेनादलातून मेजर या पदावरून प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त मेजर अनिल वणे यांनी भारतीय सैन्य दलात 17 वर्षे देशातील जम्मू- लेह लद्दाख, भुज, गुजरात देशाच्या विविध राज्यात देशसेवा केली आहे. ते याच महिन्यात सैन्यदलातून निवृत्त झाले. देशाचे रक्षण केल्याचा अभिमान असल्याने त्यांचा आदर्श शाळेतील नव्या उमेदीच्या तरूण पिढीने घ्यायला हवा,या हेतूने तसेच सेवानिवृत्त सैनिकाप्रती आणि भारतीय सैन्यात आपली सेवा देणाऱ्या तमाम सैनिकांप्रति आपली कृतज्ञता व्यक्त होईल,म्हणून त्यांचा सन्मान करण्याचे जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांनी ठरविले होते. शाळेच्या वतीने सेवानिवृत्त सैनिक अनिल वने यांचा सत्कार करण्यात आला.घरोघरी विविध सण, उत्सव साजरे होत असतात. मात्र देशाच्या सीमेवर लढणाऱ्या जवानांना कुठलाही सण नाही की उत्सव नाही, देशाची सुरक्षा करणे हेच एकमेव ध्येय त्यांच्यासमोर असते.असे सचिव सागर जाधव यांनी म्हटले. देश रक्षणासाठी आपल्या आयुष्य ज्यांनी खर्ची घातले अशा सैनिकाप्रती आपण कृतज्ञ असले पाहिजे व त्यांचा वेळोवेळी सन्मान करणे हे आपल्या प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे असे सांगितले या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांनी भारत मातेचा जयघोष करून सेवानिवृत्त सैनिकास मानवंदना दिली. या कार्यक्रमासाठी सचिन सुरडकर, फिरोज शहा, सुभाष घोडके व गावकरी उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पाटील पर्यवेक्षक देविदास चौधरी वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.सूत्रसंचालन प्रदीप संनसे यांनी केले. आभार देवदास चौधरी यांनी मांडले .



# प्लास्टिकमुक्त चंद्रपूरसाठी मनपा ॲक्शन मोडवर

## सलग तिसऱ्या दिवशी व्यापाऱ्यांवर कारवाई : ५०० किलो प्लास्टिक जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** महानगरपालिका उपद्रव शोध पथकास मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे भानापेठ येथील हाजी दादा हासम चिनी अँड सन्स या दुकानावर कारवाई करून ५०० किलो प्लास्टिक जप्त केले आहे तसेच संबंधित दुकानदाराकडुन १५ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. सदर कारवाईत प्रतिबंधित स्वरूपाचा मोठा प्लास्टिक साठा आढळल्याने दंड वसुल करण्यात आला असुन दुकानात पुन्हा प्लास्टिक आढळल्यास पोलीस तक्रार करण्याची सक्त ताकीद देण्यात आली आहे.

दोन दिवसांपूर्वीच स्थानिक सराई मार्केट जवळील आरको गोडाऊन येथे धाड टाकुन केलेल्या कारवाईत ५०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असुन ५६ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला होता प्लास्टिक बंदीसाठी मनपा मार्फत उपद्रव शोध पथक तयार करण्यात आले असुन सदर पथकाद्वारे पालिका क्षेत्रातील बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणाऱ्या सर्व प्रतिष्ठाने, दुकानांवर कारवाई केली जात आहे.प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यास दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी दिलेले असुन प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाअंतर्गत मनपाच्या तीनही झोननिहाय कारवाईत संयुक्तपणे मोहीम राबविली जात आहे. प्लास्टिक पिशव्यांची माहीती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असुन दिलेली माहीती खरी निघाल्यास ५ हजारांचे बक्षिस दिल्या जात आहे.आतापर्यंत अनेकांनी मनपाच्या या योजनेचा लाभ घेतला आहे. बंदी असलेले प्लास्टिक कॅरी बॅगचा साठा, विक्री व वापर करणे तत्काळ बंद करण्याचे आवाहन आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले असुन अन्यथा सक्त कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. प्लास्टिक मुक्ती साठी चंद्रपूर मनपा अकॅशन मोड वर आल्याने चंद्रपुरात प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणार्याचे धाबे चांगलेच दणाणले आहे .

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेची मुदत वाढविण्यात यावी : सचिन राजूरकर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या वर्षीपासून लागु केलेली आहे. सदरील योजनेकरीता अर्ज भरण्याची मुदत हि 15 जुलै 2024 ठेवण्यात आलेली आहे.परंतु या योजनेचा लाभ घेतांना प्रवेश झालेल्या महाविद्यालयाकडून बोनाफाईड प्रमाणपत्र व अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी/शिक्का आवश्यक आहे. अनेक अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर न झाल्याने व काही अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले असले तरी शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया अद्याप झालेली नसल्याने विद्यार्थ्यांनी बोनाफाईड प्रमाणपत्र व प्राचार्यांची सही आणावी कुठून असा प्रश्न उपस्थित होतो. व अशा तांत्रिक कारंणामुळे अनेक गरजु विद्यार्थी या योजनेच्या लाभापासून वंचीत राहून त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेची 15 जुलै 2024 पर्यंत असलेली मुदत वाढविण्यात यावी आणि तसेच शासनाचे दिनांक 9 मार्च 2015 चे शासन परीपत्रक असताना सुद्धा विद्यार्थ्यांकडून शपथपत्रावर व स्वयघोषणापतत्रावर नोटरी करून मागण्यात आले आहे ही अट रद्द करावी अशी मागणी राष्ट्रीय ओबिसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांनी पत्राद्वारे इतर मागस व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे आणि संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, पुणे यांचेकडे केली आहे.

राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आमदार संजय गायकवाड यांच्या लक्षवेधी सूचनेवर विधानसभेत उत्तर देताना शेती व पगाराचे उत्पन्न ग्राह्य धरू नये अशी केंद्र सरकारला विनंती करणार आहे, असे उत्तर दिले . परंतु केंद्र शासन मिनिस्ट्री ऑफ पर्सनल पब्लिक अँड पेन्शनर्स विभागाणे सन 8 सप्टेंबर 1993 ला क्रीमिलेअर बाबत अटी व शर्ती बनविल्या त्या शर्ती अजूनही अबाधित आहे त्यात आजही कोणताच बदल करण्यात आला नाही आहे, फक्त दर तीन वर्षांनी क्रिमीलेअरची उत्पंन मर्यादा वाढत असते 13 सप्टेंबर 2017 ला क्रीलेअरची मर्यादा 8 लक्ष केली होती ती अजूनही तेवढीच आहे आणि वर्ग दोन ,तीन व चार चे शेती व पगारापासून मिळणारे कर्मचऱ्यांसाठी उत्पन्न झिरो पकडायचे आहे . केंद्र सरकारने क्रीमीलेरच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्यासाठी दिनांक 8 मार्च 2019 ला केंद्र सरकार मधील निवृत्त सचिव बी . पी . शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनविली होती परंतु राष्ट्रीय ओबीसी महासंघ व इतर ओबीसी संघटनाच्या आंदोलना नंतर ती कमिटी रद्द करण्यात आली आहे , लक्षवेधीला उत्तर देताना राज्याच्या ओबीसी मंत्री क्रीमिलेअर बाबत माहिती विधान सभागृहात बरोबर देत नसेल तर ओबीसी जनतेच काय भल होणार !

**सचिन राजूरकर, महासचिव राष्ट्रीय ओबीसी महासंघ**

# विधानसभेच्या पार्श्वभूमीवर धुळ्यात शिवसैनिक निर्धार मेळावा

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** धुळे शहरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपनेते रवींद्र मिरलेकर यांच्या उपस्थितीत शिवसैनिक निर्धार मेळावा संपन्न झाला.

विधानसभा निवडणुकीत जिंकायचे असेल तर युती शिवाय पर्याय नाही असे स्पष्ट मत शिवसेनेचे उपनेते रवींद्र मिरलेकर यांनी धुळ्यात झालेल्या "होय भगवा फडकवणारच" या शीर्षकाखाली घेतलेल्या निर्धार मेळाव्यात केले. धुळे शहराची जागा चार ते पाच हजार मतांनी पडते तर ग्रामीणमध्ये 67 हजारा मतांनी आपण मागे आहोत त्यामुळे शिवसेना नेत्यांसह शिवसैनिकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे असा नाही निर्लेकर यांनी या मेळाव्यात बोलताना दिला. धुळे शहरातील कानुश्री मंगल कार्यालय येथे शनिवार दिनांक 13 जुलै रोजी होय भगवा फडकवणारच या शीर्षकाखाली शिवसेना उभा टाचा निर्धार मेळावा पार पडला या मेळाव्याला मंचावर रवींद्र मिरलेकर यांच्यासह शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील माजी आमदार अशोक धात्रक प्राध्यापक शरद पाटील माजी महापौर भगवान करणकार हिलाल माळी डॉक्टर सुशील महाजन अतुल सोनवणे किरण जोंधळे महेश मिस्तरी धीरज पाटील गंगाधर माळी माजी नगरसेविका सुनंदा बडगुजर बबन थोरात ललित माळी हरीश माळी हेमा हेमाडे भरत मोरे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुखेड विधानसभा येणाऱ्या निवडणूक चर्चेत राठोड पिछाडीवर तर पाटील पुढे !

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** विधानसभेच्या निवडणुका केंव्हा जाहीर



होतील हे सांगणे कठीण असेले, तरी त्याचे पडघम राजकारण्यांमध्ये आतापासूनच वाजायला लागले आहेत.

माजी जिल्हा परिषद सदस्य बळवंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या नावासमोर समर्थकांकडून भावी आमदाराची पोस्टरे सोशल मीडियावर जोरदार झडकत असल्याने संपूर्ण तालुक्यात राजकीय वातावरण तापत असल्याचे दिसून येत आहे. बळवंतराव पाटील बेटमोगरेकर हे गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे हम पांच या भुमेकेत निस्वार्थ पणे काम करत मुखेड तालुक्यात भाजपाचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात त्यांचा खारीचा वाटा आहे. मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मोठ्या मताधिक्याने कॉंग्रेस उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी पराभव केल्याने आमदार डॉ.तुषार राठोड व राठोड समर्थकांकडून बळवंत पाटील बेटमोगरेकर यांना डावल्याण्याचे काम सध्या मुखेड भाजपात दिसून येत आहे. खासदार वसंतराव चव्हाण यांच्याशी बळवंतराव पाटील बेटमोगरेकरांचे दाजी व इवई असे दुहेरी नातलग असल्याने ते लोकसभा निवडणुकीत कोणत्याही प्रचारसभेत दिसून आले नाही असे राठोड समर्थकांकडून आरोप केला जात असले तरी त्यांनी यापूर्वी भाजपाशी एकनिष्ठ राहुन आपलेच चुलत बंधू माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या विरुद्ध भुमिका घेऊन अनेक निवडणुकीत सहभागी झाले होते. हे मात्र आमदार डॉ.तुषार राठोड व राठोड समर्थकांनी विसरू नये असे बळवंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या समर्थकांकडून सांगितले जात आहे. बळवंतराव पाटील बेटमोगरेकर हे राज्य सहकारी बँकेचे माजी संचालक तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष स्व.माधवराव पाटील बेटमोगरेकर यांचे चिरंजीव असून त्यांना पूर्वीपासूनच राजकीय वारसा असल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही प्रस्थापितांना शह देण्यासाठी तिसरा पर्याय म्हणून बळवंतराव पाटील बेटमोगरेकर मैदानात उतरून आपले वडील स्व. माधवराव पाटील बेटमोगरेकर यांचे स्वप्न साकार करतील असे तालुक्यातील जनतेतून सांगितले जात आहे. तसेच स्व.माधवराव पाटील बेटमोगरेकर यांच्या राजकीय कार्यकाळात जिल्ह्यातील व तालुक्यातील अनेक दिग्गज नेते यात माजी मंत्री मधुकरराव घाटे, नागनाथराव रावनगावकर व त्यांचे पुतणे माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्यासह सभापती मष्णाजी पाटील,राम पाटील शिकारेकर, शिवलिंग पाटील कामजळगेकर,गुंडेराव पाटील चोंडीकर ही नेते मंडळी देखील स्व.माधवराव पाटील बेटमोगरेकर यांच्या सहकार्याने वेगवेगळ्या पदांवर विराजमान झाले होते. यासाठी बळवंतराव पाटील बेटमोगरेकरांना ही निवडणूक सोपी जाण्याची शक्यता जनतेतून वर्तवली जात आहे. बळवंतराव पाटील बेटमोगरेकरही या निवडणुकीत सज्ज असल्याने त्यांच्या समर्थकांकडून भावी आमदार या नावाचे अनेक पोस्टरे सोशल मीडियावर जोरदार झडकत असल्याने तालुक्याचे राजकारण तापत असल्याचे दिसून येत आहे. मुखेड - कंधार विधानसभा मतदारसंघ सर्वसाधारण गटाला सुटल्यास भाजप पक्षाकडून निवडणूक लढविणार असुन पक्षाने तिकिट नाकारल्यास अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे बळवंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी दै. आधुनिक केसरी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# साक्री रोडचा चेहरा मोहरा बदलणार : आ.फारुख शाह

## साक्री रोडजवळ डांबरी रस्त्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** धुळे शहरातील चारहीबाजूचे शहरात प्रवेश करणारे रस्ते आमदार फारुक शाह यांच्या प्रयत्नाने पूर्ण झाले असून आमदार फारुक शाह यांच्या प्रयत्नाने सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे अंतर्गत एस आर पी पेट्रोल पंप ते सुरत बायपास पर्यंतच्या ५.४५ कोटी रुपये खर्चाच्या कामाचे शुभारंभ आमदार फारुक शाह यांचे हस्ते करण्यात आले. धुळे शहरातील कॉलनी भाग तसेच शहरातील संपूर्ण रस्त्याचे कामाचे नियोजन एका ब्ल्यू प्रिंट द्वारे तयार करून शहरातील प्रवेशद्वार असलेले पारोळा रोड चौफुली ते प्रकाश टॉकीज तसेच चाळीसगाव चौफुली पासून ते श्रीराम पेट्रोल पंप तसेच गुरुद्वार पासून ते संतोषी माता पर्यंतचे रस्त्यांसाठी व शहरातील कॉलनी भागातील रस्त्यांसाठी आजपर्यंत आमदार फारुक शहा यांनी करोडो रुपयांच्या निधी आणून या रस्त्यांचे काम मार्गी लावलेले आहे. आ.फारुख शाह यांनी धुळे शहर हद्दीतील साक्री रोड साठी सुमारे २० कोटीचा निधी मंजूर केला होता.त्यात मनपा ते विद्यावर्धिनी महाविद्यालय पर्यंत रस्त्याचे



डांबरीकरण पूर्णत्वास आलेले आहे.त्याच्यात एक भाग म्हणून आज पाच करोड ४५ लाख रुपये खर्चाचा कामाचा एस आर पी पेट्रोल पंप पासून ते सुरत बायपास पर्यंतच्या रस्त्याचे कामाचे शुभारंभ आमदार फारुक शहा यांच्या हस्ते करण्यात आले धुळे शहराला एक दूरदृष्टी असलेल्या आमदारांमुळे शहरातील मूलभूत सुविधा साठी विशेष प्रयत्न करून आजपर्यंत शहराचा विकास करण्यात आलेला आहे शहरातील प्रमुख समस्या असलेल्या रस्ते पाणी गटरी याव्यतिरिक्त धुळे शहरातील घरपट्टी रद्द करून आमदार फारुक शहा यांनी एक अभूतपूर्व काम केलेले आहे आज या रस्त्याच्या कामाच्या शुभारंभ प्रसंगी आ.फारुख शाह यांचे सोबत मिलिंद बैसाणे,डॉ.दीपश्री नाईक,डॉ.बापुराव पवार,प्यारेलाल पिंजारी,बाबुराव नेरकर,इकबाल शाह,डॉ.शराफत अली,बाळासाहेब सिसोदे,तुळशीराम पाटील,हाशिम अन्सारी,अनिस शाह,फकिरा बागवान,रियाज शाह,आसिफ शाह व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता धर्मेंद्र झाल्टे,कनिष्ठ अभियंता विकास लोकरे आणि या भागातील नागरिक तसेच कार्यकर्ते नगरसेवक व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न.पं. कार्यालयात कचरा ओतला जाईल

## खंडाळा शहरातील घन कचराप्रश्नी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** खंडाळा शहरातील घन कचरा व कचरा डेपोवरील कचरा विलगीकरण ची व्यवस्था पुर्णपणे कोलमडली असून यास खंडाळा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व आरोग्य समिती पूर्णपणे जबाबदार असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदन देत करण्यात आलेला आहे.याप्रकरणी लक्ष न दिल्यास नगरपंचायत कार्यालय व दालनात कचरा ओतला जाईल.असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे.यावेळी निवेदन देताना पक्षाचे खंडाळा शहर अध्यक्ष महेंद्र गाढवे,ओबीसी खंडाळा शहर अध्यक्ष सागर गुरव,अल्पसंख्याक खंडाळा शहर अध्यक्ष अमन आतार,खंडाळा शहर उपाध्यक्ष सुमित गायकवाड, औद्योगिक सेल खंडाळा शहर अध्यक्ष शंतनु गाढवे,खंडाळा शहर युवक अध्यक्ष प्रथमेश खंडागळे,सोशल मिडिया खंडाळा शहर अध्यक्ष अशिष वायदंडे,सामाजिक न्यायआघाडी खंडाळा शहर निलेश खुडे आदींसह इतर उपस्थित होते. मुख्याधिकारी यांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करताना दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,गेले दोन अडीच वर्षापासुन नगरपंचायतमध्ये अंत्यत गलीच्छ पध्दतीने कामकाज चालु असुन, त्यास काही एकदोन पदाधिकारी व आपण स्वतः पुर्णपणे जबाबदार असलेचे दिसुन येते. पदाधिकाऱ्यांचे ऐकणेमुळेच की काय? सद्या न्याय मिळवणे कामी नागरिकांनी नगरपंचायत प्रशासना विरुध्द न्यायालयात धाव घेतली आहे.ही बाब अंत्यत लाजीरवाणी आहे पदाधिकाऱ्यांच्या मर्जीतल्याच व्यक्तींना ठेका देणेसाठी आपण आपले पदाचा गैरवापर केला असुन, त्याची फलनष्पिती आता दिसु लागली आहे.आपण जर जबाबदार अधिकारी म्हणून वेळीच निर्णय घेतले असते तर निवेदन देणेची ही वेळ आलीच नसती. यासाठी आम्ही पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले असुन त्याची उत्तरे वजा खुलासा आम्हांस मिळाला पाहीजे.१.कचरा गोळा व वर्गीकरण करणाऱ्या ठेकेदाराची मुदत संपलेली असताना सुरूवातीला ठेका देताना जी पध्दत अवलंबली ती निविदा पध्दत न राबवता.त्याला मुदत वाढ देण्याचा आपला व एक दोन पदाधिकाऱ्यांचा आग्रह का आहे ? मुदत संपलेली असतानाही ठेकेदार काम का करीत आहे ? त्याला कोणते आश्वासन कोणी दिले आहे काय ? असा कारभार नियमबाहय नाही काय ? २.नगरपंचातीने संबंधित ठेकेदारास दोन घंटा गाडया व एक ट्रॅक्टर भाडयाने दिला आहे.त्यापैकी एक गाडी गेले तीन महिन्यापासुन नगरपंचायत हद्दीतील चर्मकार ओढयाजवळ बंद अवस्थेत बेवारस स्थितीत पडून आहे ? याबाबत आपण ठेकेदारस लेखी पत्र देवून नगरपंचायत नियमाप्रमाणे ठरलेल्या अटी शर्तीप्रमाणे दंड आकारला आहे काय ? व एक घंटा गाडी बंद असलेने शहरवाशियांची गैरसोय होवून कुचंबना झाली त्यास जबाबदार कोण ? सेवा पुरवता येत नसेल तर नागरीकाकडून स्वच्छता कर आकारणेचा आपणास अधिकार आहे काय ? ३.घंटा गाडी बंद असलेले ट्रॅक्टरव्दारे शहरातील कचरा उचलला जातो त्याचे ओला व सुका कचऱ्याचे विलगीकरण कसे होते ? शिवाय ट्रॅक्टर गल्ली बोळातुन जात नसलेने,नागरिकांना पायपीट करणे त्रास देणेबा आपणास काय अधिकार आहे ? ४. ठेक्यात दररोज शौचालये साफ करणेचे असताना गटारे साफ करणेचे असताना ती साफ केली जात नाहीत.त्यामुळे शहरात डेंगूसारख्या साथीने थैमान घातले आहे.नगरपंचायतीला सर्व कर देवूनही दवाखान्याला नागरिकांना का खर्च करावा ? ५. कचरा डेपोवर कचऱ्याचे एवढे मोठे ढिग झालेत की शेजारी असणाऱ्या हरेश्वर डोंगराला सुध्दा आपला प्रतिस्पर्धी उभा राहतोय की काय अशी भिती वाटू लागली असावी, त्या ढीगाचे आपण काय करणार ? का कुणाच्या तरी दबावाखाली पदाधिकाऱ्यांची मर्जी संभाळत आपल्या पदाची प्रतिष्ठा पणाला लावणार ? ६. ठेकेदारास वर्षातील संपूर्ण दिवस काम करावयाचे असताना,त्यास रविवारी सुट्टी कशी दिली जाते ? त्या रविवारच्या सुट्टीच्या दिवसाचे टेंडर प्रमाणे दर दिवसाचे १६००/- रूपये होतात व महिन्याचे ६४०००/- होतात, त्यास ते फुकट का दयायचे ? का त्यालाही कोणी भागीदार आहेत ? सदरची जबाबदारी आरोग्य कमिटी निष्क्रीय असलेचा ठपका ठेवून वरिष्ठांना अहवाल दिला आहे का ? ठेकेदारास काळया यादीत टाकणेबाबत आपण काय करणार ? आम्हांस खात्रीशीर मिळालेल्या माहीतीवरून व उपलब्ध कागदपत्रावरून आपण ठेका देताना चुकीची पध्दत वापरून इतर ठेकेदारांना वगळुन आपणास हव्या असणाऱ्या ठेकेदारास ठेका दिला.याबाबत वाई जिल्हा सत्र न्यायालयात अन्य एका ठेकेदाराने खंडाळा प्रशासनाविरूध्द तक्रार दाखल केली.त्याचा निकाल आपले कामाचा परिपाक म्हणून खंडाळा नगरपंचायतीस रू. एक लाखाचा दंड ठोठावला आहे. यात खंडाळा शहराची बदनामी झाली.ती स्वच्छ कारभार न केलेने झाली आहे.ती भरून निघणार का? सदरची केस न्यायालयात चालु होती? याबाबत नगरपंचायत सभागृहास माहीत आहे का ? त्याबाबत वकील देणेकामी ठराव झाला होता काय ? असे बरेच प्रश्न उपस्थित रहात असून त्याची उत्तरे आपणास द्यावी लागतील.असे सुध्दा निवेदनात म्हटलेले आहे.पुढे असे ही सांगण्यात आलेले आहे की,आपण सभागृहातील काही ठराविकच पदाधिकाऱ्यांचे ऐकुन कामकाज करीत असलेचे आमचे निदर्शनास आले असून शहरात तशी चर्चा ही चालु आहे.तुमच्या अशा कामाचे वृत्तीस आळा बसावा.तसेच निवदेन मिळालेनंतर चार दिवसात आमचे पक्षाचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करावी.अन्यथा आपणास कोणतीही पुर्व कल्पना न देता कचरा डेपोवरील कचरा ट्रॅक्टर ट्रॉलीव्दारे आणून नगरपंचायत कार्यालय व आपले दालनात ओतला जाईल याची नोंद घ्यावी.असा इशारा निवेदनातून देण्यात आलेला आहे.

# सटाणा तालुक्यातील एटीएम चोर ग्रामस्थांमुळे पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** आतापर्यंत एटीएम फोडून त्यातून रक्कम लंपास केल्याच्या घटना घडल्या आहेत. परंतु, चक्क संपूर्ण एटीएम यंत्रच चोरून पोबारा केल्याची घटना सटाणा तालुक्यातील लखमापूर येथे घडली. महत्वाचे म्हणजे चोरलेले एटीएम गाडीत घालून पळून जात असताना चोरट्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जागरूक ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या हवाली केले. हे चोरटे सद्यस्थितीत छत्रपती संभाजीनगर पोलिसांच्या ताब्यात असून लवकरच त्यांना सटाणा पोलिसांच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सटाणा शहरासह तालुक्यातून एटीएम यंत्र फोडून त्यातील लाखो रुपयांच्या रकमेवर डल्ला मारण्याच्या घटना यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत. परंतु, थेट एटीएम यंत्रच चोरून नेल्याची घटना तालुक्यातील लखमापूर येथे घडली. गुरुवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत प्रफुल्ल पवार यांनी सटाणा पोलिसात तक्रार दिली.



गुरुवारी पहाटे एक ते सकाळी सात या वेळेत लखमापूर बस स्थानकाजवळील एटीएम केंद्र चोरण्यात आले. या एटीएममध्ये एक लाख ७५ हजार ८०० रुपये एवढी रक्कम होती. या रकमेसह संपूर्ण एटीएम यंत्र चोरून नेल्याप्रकरणी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सटाणा पोलिसांकडून तपास सुरू असतानाच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील तलवाडा परिसरात हेच एटीएम यंत्र गाडीतून पळवून नेणाऱ्या दोघांना स्थानिक शेतकऱ्यांनी शिताफीने पकडले आणि पोलीस येईपर्यंत बांधून ठेवल्याचे पुढे आले. विष्णू आकात (२९, सातोना, जालना) व देवा तावडे (२०, पुंडलिक नगर,जालना) अशी संशयितांची नावे आहेत. त्यांचा एक सहकारी फरार झाला. चोरट्यांना पकडल्यानंतर पोलिसांना फोन लावताच चोरटे झटका देत पळाले. एकाने विहिरीत उडी घेतली. त्याला नागरिकांनी दोरखंडाने बाहेर काढले. तर दुसऱ्याला पाठलाग करून पकडले. शिऊर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून या दोघा संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्या ताब्यातून चारचाकी वाहन, एटीएम यंत्र ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मुखेड तहसील कर्मचाऱ्यांचे आंदोलन; नागरिकांची हेळसांड

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** राज्यातील सर्व महसूल कर्मचारी तसेच तहसील कार्यालय मुखेड येथील महसूल कर्मचारी विविध मागण्यांसह दिनांक १० जुलैपासून बेमुदत संपावर गेले असून या आंदोलनास पाठिंबा देत मुखेड कार्यालयातील महसूल कर्मचारी सुद्धा बेमुदत संप पुकारला असून यामुळे तहसील कार्यालयात नागरिकांची हेळसांड होताना दिसत होती. महसूल विभागाचा सुधारीत कृतीबंध दांगट समीतीच्या अहवालातील शिफारशीनुसार कोणत्याही संवर्गातील कर्मचारी कपात न करता लागू करण्यात याबा, मराठवाडा विभागातील अव्वल कारकून/मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार या पदावर पद्दोन्नती तात्काळ देण्यात यावी, महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ लागू करण्यात यावा, नायब तहसिलदार संवर्ग हा राजपत्रीस संवर्ग असून सुध्दा त्याची वेतनश्रेणी वर्ग तीन संवर्गाची देण्यात आलेली आहे ती बदल करून ४८००/- करण्यात यावी, कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित पणे प्राधिकारपत्रावर काढण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, महसुल सहाय्यक व तलाठी ही पदे जिल्हास्तरीय व समकक्ष अहंताधारी असूनही महसुल १९००/- व तलाठी यांचा ग्रेड २४००/- आहे. त्यामुळे महसुल सहाय्यक यांचा ग्रेड पे २४००/- करण्यात यावा, महसुल विभागात सेवा नियमित होणेसाठी महसुल सहाय्यक व तलाठी यांना विभागीय दुय्यम सेवा परिक्षा व पदोन्नतीसाठी महसुल अहर्ता परिक्षा ह्या दोन परिक्षे ऐवजी एकच परिक्षा पद्धत करण्यात यावी, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतरच्या त्याच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून उंचावून देण्यात यावे अशी तरतुद असतांनाही अव्वल कारकून पदावरील पात्र कर्मचाऱ्यांचे सुधारीत वेतन निश्चिती करावी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील लिपीक टंकलेखक (महसुल सहायक) संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नती केवळ 'महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम, १९९९ 'मधील तरतुदीनुसार सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी, महसुल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची सेवापुस्तिका लेखाधिकारी वेतन पडताळणी पथक यांचे ऐवजी समक्ष असलेल्या महसुल विभागातीलच नियुक्त लेखाधिकारी यांना वेतन पडताळणीचे अधिकारी



प्रदान करणे बाबत, 'अव्वल कारकुन' या पदाचे नामांतरण करून 'सहाय्यक महसूल अधिकारी हे पद करावे, महसुल विभागातील सुधारीत आकृतीबंध मंजुर होईपर्यंत पुरवठा विभागातील पदे भरण्यात येऊ नयेत, चतुर्थश्रेणी शिपाई कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असतांना तलाठी संवर्गामध्ये २५ टक्के पदोन्नती देण्यात यावी आणि कोतवाल पदांना चतुर्थश्रेणी ड दर्जा देण्यात यावा, कोतवाल पदोन्नती करत असतांना पद्दोत्रती कोटा वाढविण्यात यावा, अभया विविध मागण्यासाठी महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. यावेळी संदीप भुरे जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर इलतेपवार (तालुका अध्यक्ष) चंदा पवार (सचिव) परमेश्वर वारे (उपाध्यक्ष) विशाल पेंडकर, मोईन शेख, एम एम सरवरी, प्रशांत लिंबेकर वांगीकर मॅडम, वाडीकर मॅडम, यु डी मुकाडे, रुपेश मुधोळकर, उषा सुभेदार, मनीषा पानपट्टे, संदिप राठोड यांच्यासह अनेकजण संपात उपस्थित आहेत.




## विविध मागण्यांसाठी महसुली कर्मचाऱ्यांचे आंदोलन; बेमुदत कामबंदचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** महसूल विभागाचा आकृतीबंध तत्काळ लागू करावा यासह विविध मागणीसाठी महसूल शाखेच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. महसूल कर्मचाऱ्यांनी दि.१० जुलै बुधवार रोजी काळाफिती लावत कामकाज केले. गुरुवारी निर्देशने तर आज दि.१२ जुलै शुक्रवार रोजी लेखणी बंद आंदोलन केले आहे. राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या झेंड्याखाली येथील महसूल कर्मचाऱ्यांनी आंदोलन छेडल्याने नागरिकांची गैरसोय होणार आहे.

दरम्यान सविस्तर वृत्तांत असे की महसूल विभागाच्या सुधारित आकृतिबंधाच्या शिफारशीनुसार कोणत्याही संवर्गातीत कर्मचारी कपात न करता लागू करण्यात यावा, मराठवाडा विभागातील अव्वल कारकून, मंडल अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती तत्काळ देण्यात यावी. नायब तहसीलदार संवर्ग बदलून वेतनश्रेणी चार हजार ८०० रुपये करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे प्राधिकार पत्रावर काढण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा. महसूल सहाय्यक, तलाठी ही पदे जिल्हास्तरीय व समकक्ष अर्हताधारी असूनही महसूल सहाय्यक यांचा ग्रेडपे १,९०० व तलाठी यांचा ग्रेड २,४०० आहे. त्यामुळे महसूल सहाय्यकांचा ग्रेड पे २,४०० करण्यात यावा. महसूल विभागात सेवा नियमित होण्यासाठी महसूल सहाय्यक, तलाठी यांना विभागीय दुय्यम सेवा परीक्षा व पदोन्नतीसाठी महसूल अर्हता परीक्षा या दोन परीक्षांऐवजी एकच परीक्षा पद्धत करण्यात यावी. अव्वल कारकून पदावरील पात्र कर्मचाऱ्यांचे सुधारित वेतन निश्चित करावे महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील लिपिक टंकलेखक संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नती केवळ महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियमामधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. सेवापुस्तिका लेखाधिकारी वेतन पडताळणी पथकाऐवजी महसूल विभागातील नियुक्त लेखाधिकारी यांना वेतन पडताळणीचे अधिकारी प्रदान करावे. अव्वल कारकून या पदाचे नामांतरण सहाय्यक महसूल अधिकारी असे करावे आदी मागण्यांसाठी आंदोलन छेडल्याचे संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल आंबेराव व तालुका उपाध्यक्ष मनोज कारंजकर यांनी सांगितले.

## देशात आता ‘सीए’च्या वर्षांत तीन वेळा परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अधिकाधिक विद्यार्थ्यांना संधी मिळण्यासाठी सीएच्या (सनदी लेखापाल) वर्षांत तीनवेळा परीक्षा घेण्याचा निर्णय इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाने (आयसीएआय) घेतला आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाली असून २०४७ पर्यंत देशात ४० लाख सीए करण्याचे लक्ष्य असल्याची माहिती आयसीएआयच्या सेन्ट्रल कौन्सिलचे सदस्य व ‘बोर्ड ऑफ स्टडीज’चे चेअरमन डॉ. राजकुमार अडुकिया यांनी दिली. ‘आयसीएआय’च्या अकोला भेटीप्रसंगी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी अकोला शाखेचे चेअरमन सुमित आलिमचंदानी, सचिव हिरेन जोगी व सीए रमेश चौधरी आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. राजकुमार अडुकिया यांनी परीक्षा पद्धतीत झालेल्या बदलावर सविस्तर माहिती दिली. बारावीनंतर सीए होण्यासाठी ‘आयसीएआय’च्यावतीने सीए ‘फाउंडेशन’, सीए ‘इंटरमिजिएट’ व सीए अंतिम परीक्षा घेतली जाता. आतापर्यंत या तिन्ही परीक्षा वर्षांतून दोनवेळा घेतल्या जात होत्या. यावर्षीपासून सीए ‘फाउंडेशन’, सीए ‘इंटरमिजिएट’ या दोन परीक्षा वर्षांतून तीनवेळा घेतल्या जाणार आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांना संधी मिळावी व तणावमुक्त होऊन त्यांनी परीक्षेला सामोरे जाण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. सीए अंतिमची परीक्षा सध्या वर्षांतून दोनवेळाच होणार असून आगामी एक ते दोन वर्षांत ती परीक्षादेखील तीन वेळा घेतली जाईल, असे डॉ. राजकुमार अडुकिया यांनी सांगितले. सीए ‘फाउंडेशन’ची दरवर्षी सरासरी दीड लाख विद्यार्थी परीक्षा देतात. सीए ‘इंटरमिजिएट’साठी अडीच लाख परीक्षार्थी असतात. बारावीत शिकणारे विद्यार्थीदेखील नोंदणी करून सीए ‘फाउंडेशन’ची परीक्षा देऊ शकतील. मात्र, त्यांना मुदतीमध्ये बारावी उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार नवीन २० हजार सीए झाले आहेत, असे देखील डॉ. अडुकिया म्हणाले. सीए शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ‘बोर्ड ऑफ स्टडीज’ शैक्षणिक साहित्य निर्माण करीत असून अभ्यासक्रम तयार केला जातो. या शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून पहिल्याच प्रयत्नात विद्यार्थी यशस्वी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक साहित्यात वारंवार बदल करून अद्ययावत केला जात आहे. त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होत असल्याचेही डॉ. अडुकिया यांनी सांगितले. सीए इंटरमिजिएटच्या परीक्षेमध्ये देशातील पहिल्या ५० विद्यार्थ्यांमध्ये अकोल्यातील एकूण चार विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. अकोल्यातील विद्यार्थ्यांची कामगिरी अतिशय कौतुकास्पद असल्याचे डॉ. राजकुमार अडुकिया म्हणाले. यावेळी युग सचिन कारिया, ४५ वा क्रमांकावरील यश शैलेंद्र पाटील, ४७ वा यश मनोज देशमुख व ४८ वा पीयूष प्रवीणसिंग मोहता या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.



## धुळे मनपाने चौकशी करून भिंत पाडावी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील चितोड रोडवरील म्हाडा कॉलनी मधील मिलच्या भिंतीजवळ आमचे प्लॉट नं. १० हे घर असून आमच्या घराच्या पाठी मागील असलेल्या प्लॉट नं. ११ सौ. प्रमिला शिवाजी मदने घरमालकाने आमच्या घराच्या पाठीमागील भिंतीचा संपुर्ण प्लास्टर खरवडून काढून ठेवला आहे. यामुळे घराच्या मागील बाजुची पूर्णता बिकट अवस्था झाली आहे. या संदर्भात महानगर पालिका आयुक्तांसह संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार केली आहे.अशी माहिती माजी पो. अधिकारी हनुमंत शिंदे,आशा हनुमंत शिंदे यांनी साक्री रोडवरील पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

धुळे शहरातील चितोड रोडवरील म्हाडा कॉलनी मधील मिलच्या भिंतीजवळ प्लॉट नं. १० च्या घराची पाठीमागील भिंतीचा प्लास्टर मागील ११ नंबर घरमालकाने पाडून नवीन बांधकाम करत आहेत. या संदर्भात महानगर पालिका आयुक्तांसह संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार केली गेली आहे. मात्र या तक्रारीची अद्याप दखल घेण्यात आली नाही. तसेच आम्ही या संदर्भात नोटीसही पाठविली आहे. मात्र नोटीस ही संबंधित व्यक्तीकडे पाठविण्यात आली नाही. तसेच यासंदर्भाची नोटीस आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी इंजि. राजदिप यांच्याकडे देवून ती नोटीस संबंधित व्यक्तीकडे देण्यास सांगितले होते. मात्र इंजि. कडून ही नोटीस देण्यात आली नाही. तसेच नगर रचना विभागामधील इंजि. सोनवणे यांनाही यासंदर्भात माहिती देण्यात आली. मात्र यांच्याकडूनही म्हणावे तसे उत्तर मिळाले नाही. आपण यासंदर्भाची चौकशी करुन सदरची भिंत पाडण्यात यावी नवीन प्लास्टर करुन देण्यात यावी महापालिकेच्या नियमाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी देखील त्यांनी केली.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर